सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह
सोलापूर
रविवार, १२ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ६७ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विनम्र अभिवादन



राजमाता जिजाऊ माँसाहेब भोसले यांची तारखेप्रमाणे आज जयंती

विनम्र अभिवादन



स्वामी विवेकानंद यांची आज जयंती. हा दिवस राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

# रामलला प्राणप्रतिष्ठेचा वर्धापनदिन सोहळा प्रारंभ

## अयोध्येत तीन दिवस चालणार कार्यक्रम

**अयोध्या, ११ जानेवारी-**

अयोध्येत रामललाच्या प्राणप्रतिष्ठेचा प्रथम वर्धापनदिन सोहळ्याला तिथीनुसार शनिवारपासून प्रारंभ झाला. यासाठी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येत भाविक अयोध्येत दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. आजपासून सुरू झालेला हा भव्य धार्मिक महोत्सव १३ जानेवारीपर्यंत चालणार आहे.

यजुर्वेदाच्या मंत्रोच्चारात या प्रथम वर्धापनदिन सोहळ्याला आजपासून प्रारंभ झाला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते रामललाचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर दुपारी १२ वाजून २० मिनिटांनी महाआरती झाली. त्या पाठोपाठच राम ललाला ५६ प्रकारच्या पक्वान्नांचा नैवेद्य दाखविण्यात आला. रामलला जिथे विराजमान आहे, त्या गर्भगृहाला विविध रंगाच्या फुलांनी सुशोभित करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना या शुभ पर्वाच्या शुभेच्छा दिल्या. रामललाच्या पहिल्या प्राणप्रतिष्ठेच्या वर्धापनदिनानिमित्त मी देशवासीयांना मनापासून शुभेच्छा देत आहे. शेकडो वर्षांचा त्याग, बलिदान आणि संघर्षानंतर उभारण्यात आलेले हे राम मंदिर आपल्या संस्कृती आणि अध्यात्माचे महान प्रतीक आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर म्हटले आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही त्यांच्या समाजमाध्यम मंच असलेल्या एक्सवर 'जय जय श्री राम' असा जयघोष केला आहे. तीन दिवस चालणाऱ्या या भव्य महोत्सवाच्या काळात, जे मागील वर्षी २२ जानेवारी रोजी रामललाच्या प्राणप्रतिष्ठेला उपस्थित राहू शकले नाही, त्या सर्वांना सहभागी होता येणार आहे. याशिवाय, ११० महत्त्वपूर्ण व्यक्तींनाही या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे.







**रामललाच्या प्राणप्रतिष्ठेचा पहिला वर्धापनदिन सोहळा तिथीनुसार शनिवारपासून अयोध्येत प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी असंख्य भाविकांनी हा सोहळा पाहण्यासाठी गर्दी केली होती. बाजूला रामललाची मनमोहक मूर्ती**



## सोलापुरातील चार हुतात्मा यांना विनम्र अभिवादन!

**सोलापूर :** शहराने पारतंत्र्यात दि.९ ते १२ मे १९३० दरम्यान चार दिवस स्वातंत्र्य अनुभवले. क्रांतिकारी असा लढा उभारला. इंग्लंडचे तख्त हादरल्याने सोलापुरात मार्शल लॉ पुकारला होता. अखेर क्रांतिकारी आंदोलन प्रकरणी सोलापुरातील मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन या चार स्वातंत्र्य सेनानींना येरवडा तुरुंगात फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सोलापुरातील ते अमर हुतात्मे झाले. तोच १२ जानेवारी दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो.

सविस्तर वृत्त पान ५ वर





## चिनी मांजाने तरुणाचा चिरला गाल

**अकोला, ११ जानेवारी**

जिल्ह्यात मकरसंक्रांतीनिमित्त पतंगबाजीला सुरुवात झाली आहे. पतंग उडवताना मांजाच्या वापराला बंदी असू,न त्यासंदर्भात प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. तरी मांजाचा वापर होत असल्याचे दिसून येत आहे. आकोट शहरात १० जानेवारीला अकोला मार्गावरून दुचाकीने जाणाऱ्या तरुणाचा चिनी मांजामुळे गाल चिरल्याची घटना समोर आली.

यात दुचाकीचालक गंभीर जखमी झाला. महेंद्रसिंग रामसिंग ठाकूर असे जखमी तरुणाचे नाव आहे. दुचाकीने अकोला मार्गावरून जात असताना अचानक चायनीज मांजाने त्याच्या डोक्याला वेढा घातला. यात त्याच्या डाव्या गालाला दुखापत झाली. याप्रकरणी ठाकूर यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर ते उपचारासाठी दवाखान्यात गेले. आकोट शहरातील काही विक्रेते छुप्या पद्धतीने चिनी मांजाची विक्री करीत असल्याचे चित्र राजरोसपणे सुरू असून, नागरिकांकडून कारवाईची मागणी करण्यात येत आहे. *(तभा वृत्तसेवा)*

## दीड लाखाची लाच घेताना सरकारी वकिलाला अटक

**ठाणे :** रत्नागिरी जिल्ह्यातील एका खटल्यात कंपनीला निर्दोष मुक्त करण्यात मदत करण्यासाठी दीड लाख रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली सरकारी वकिलाला अटक करण्यात आली. तक्रारीच्या आधारे एसीबीने चिपळूणमध्ये सापळा रचला आणि गुरुवारी लाच घेताना रंगेहाथ पकडले.

# संजय राऊत यांना कामं उरली नाहीत

## देवेंद्र फडणवीस यांचा खा. राऊतांवर घणाघात

**नागपूर, ११ जानेवारी**

संजय राऊत यांना कामं उरलेली नाहीत. ते सकाळी उठतात आणि मीडियासमोर काहीही वक्तव्य करतात. त्यांच्या प्रत्येक वक्तव्यावर प्रतिक्रिया द्यायला मला वेळ नाही. मी त्यांच्यासारखा रिकामटेकडा नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राऊतांच्या टीकेवर उत्तर दिले.

काल एका कार्यक्रमात मुख्यमंत्री म्हणाले होते की, आधी उद्धव ठाकरे मित्र होते, आता राज ठाकरे मित्र आहेत. यावर उबाठाचे खा. संजय राऊत यांनी 'कोण कुठे जाणार, हे देवेंद्र फडणवीस ठरविणार नाही, त्यांनी आमचा पक्ष फोडला' असे वक्तव्य केले. यासंदर्भात शनिवारी मुख्यमंत्री फडणवीस यांना विचारले असता, त्यांनी त्यांचे मत व्यक्त केले. त्याच्या मतावर मत व्यक्त करायला मी बांधील नाही, ते रोजच मत व्यक्त करतात, ते रिकामटेकडे आहेत, मी रिकामटेकडा नाही, अशा कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका महाविकास आघाडी म्हणून नाही, तर स्वबळावर लढणार, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. मुंबईपासून नागपूरपर्यंत सर्वच महानगरपालिका, जिल्हा परिषद व नगरपरिषदेच्या निवडणुका स्वबळावर लढविणार असल्याचेही राऊत बोलले आहेत, यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांना विचारले असता, त्यांनी एकत्रित लढावे, वेगळे लढावे, त्यांची आघाडी राहणार की तुटणार, याकडे आमचे लक्ष नाही. महाराष्ट्राला प्रगतीकडे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुढच्या सर्व निवडणुकांमध्ये जनतेचा आशीर्वाद आमच्यासोबत राहणार, असा विश्वासाही फडणवीस यांनी व्यक्त केला. *(तभा वृत्तसेवा)*







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### सैकिया, भाटिया यांची अधिकृतपणे निवड आज

**मुंबई :** रविवारी येथे होणाऱ्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या विशेष सर्वसाधारण सभेत (एसजीएम) देवजित सैकिया आणि प्रभतेज सिंग भाटिया यांची अनुक्रमे बीसीसीआय सचिव आणि कोषाध्यक्ष म्हणून अधिकृतपणे निवड करण्यात येणार आहे. बीसीसीआयचे निवडणूक अधिकारी अचल कुमार जोती यांनी मंगळवारी उमेदवारी यादी जाहीर केल्यानंतर रिक्त पदांसाठी सैकिया व भाटिया हे एकमेव उमेदवार होते. जय शाह यांनी १ डिसेंबर रोजी आयसीसी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून सैकिया बीसीसीआयचे अंतरिम सचिव म्हणून काम पाहत आहेत. बीसीसीआयच्या घटनेनुसार रिक्त असलेले कोणतेही पद ४५ दिवसांच्या आत एसजीएम बोलावून भरले पाहिजे आणि रविवारची बैठक त्या कालावधीतच आहे, जी ४३ व्या दिवशी होणार आहे. महाराष्ट्र सरकारमध्ये विद्यमान आशिष शेलार यांनी अलीकडेच कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर भाटिया यांनी कोषाध्यक्ष पदासाठी नामांकन दाखल केले. आयसीसी अध्यक्ष जय शाह एसजीएमला विशेष आमंत्रित म्हणून उपस्थित राहतील.

### प्रतिस्पर्ध्यावर थुंकल्याबद्दल ईपीएल फुटबॉलपटूवर बंदी

**माद्रिद :** नॉर्विच सिटीच्या विंगर बोर्जा सॅन्झला प्रतिस्पर्ध्यावर थुंकल्याबद्दल सहा सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे आणि १४,७४९ डॉलर्स दंड ठोठावण्यात आला आहे, असे चॅम्पियनशिप संघाने शुक्रवारी सांगितले. या हंगामात नॉर्विचचा सर्वाधिक गोल करणारा सॅन्झने ७४ व्या मिनिटाला गोल नोंदवून आपल्या संघाला २-१ असे आघाडीवर नेले असताना तो प्रतिस्पर्धी संघाच्या ख्रिस मेफॅमवर थुंकला. या सामन्यात नॉर्विच सिटीने सुंदरलॅण्ड संघाचा पराभव केला. सॅन्झने आरोप मान्य केला आणि त्यानंतर स्वतंत्र नियामक आयोगाने त्याच्यावर निर्बंध लादले, असे एफएने शुक्रवारी एका निवेदनात म्हटले आहे. एफएच्या घोषणेनंतर सॅन्झने जाहीर माफी मागितली. प्रतिस्पर्ध्यावर थुंकणे माझ्यासाठी पूर्णपणे अनैतिक आहे आणि त्या क्षणी माझी प्रतिक्रिया अस्वीकार्य होती. मला या कृतीबद्दल मनापासून पश्चात्ताप आहे आणि मी संपूर्ण जबाबदारी घेतो, असे २३ वर्षीय स्पॅनिश खेळाडूने एका निवेदनात म्हटले आहे.

### तमिम इक्बालची पुन्हा एकदा क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

**ढाका :** बांगलादेशचा दिग्गज क्रिकेटपटू तमिम इक्बालने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तो दुसऱ्यांदा क्रिकेटासून दूर गेला आहे. त्याची पहिली निवृत्तीची घोषणा जुलै २०२३ मध्ये एका भावनिक पत्रकार परिषदेत झाली होती,



बांगलादेशच्या तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांच्या हस्तक्षेपानंतर त्याने २४ तासांत हा निर्णय मागे घेतला. बांगलादेशचा सलामीवीर फलंदाज तमिम इक्बालने आपल्या देशासाठी क्रिकेटच्या सर्व स्वरूपात ३८७ सामने खेळले. १५,१९२ धावा करून त्याने आपल्या कारकिर्दीचा शेवट केला. तो यष्टिरक्षक-फलंदाज मुशफिकुर रहीम नंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये बांगलादेशसाठी सर्वाधिक धावा करणारा दुसरा फलंदाज आहे. तमिम इक्बालने फेसबुकवर निवृत्तीची घोषणा केली. मी बऱ्याच काळापासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. ते अंतर कायम राहील. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील माझा अध्याय संपला आहे, असे तो म्हणाला. आता चॅम्पियन्स चषकासारखी मोठी स्पर्धा येत असल्यामुळे मी कोणाचेही लक्ष वेधून घेऊ इच्छित नाही, असेही तमिम म्हणाला.

### वानखेडे स्टेडियमचा सुवर्ण महोत्सव सोहळा

**मुंबई :** मुंबई क्रिकेट संघटनेतर्फे १९ जानेवारी रोजी वानखेडे स्टेडियमच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असून मुंबईचे दिग्गज क्रिकेटपटू व भारतीय संघाचे माजी कर्णधार या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. या सोहळ्याची सुरुवात १२ जानेवारीपासून होणार असून, १९ जानेवारीला होणाऱ्या मुख्य कार्यक्रम होणार आहे. भारत रत्न सचिन तेंडुलकर, सुनील गावस्कर, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, रवी शास्त्री, अजिंक्य रहाणे, दिलीप वेंगसरकर व डायना एडल्जी यांच्यासह मुंबईचे महान क्रिकेटपटू आणि भारतीय संघाचे कर्णधार वानखेडे स्टेडियमच्या या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होणार आहेत. यावेळी वानखेडे स्टेडियमच्या क्रीडा संस्कृतीतील महत्त्वपूर्ण योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदिरा बेदी व प्रसन्न संत करणार आहेत. कार्यक्रमात अवधूत गुप्ते व अजय-अतुल यांच्या विशेष सादरीकरणांसह नेत्रदीपक लेसर शोही होणार आहे, असे एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले. यावेळी एका कॉफी टेबल बुकचे प्रकाशन होणार आहे. तसेच वानखेडे स्टेडियमच्या परंपरेचा गौरव करण्यासाठी एक विशेष टपाल तिकीट देखील जारी केले जाणार आहे.

# इंग्लंडविरुद्ध मालिकेसाठी शमीचे पुनरागमन

### सॅमसन संघात कायम, पंतला वगळले

**मुंबई, ११ जानेवारी**

भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान टी-२० मालिका २२ जानेवारीपासून सुरू होणार असून या मालिकेत पाच सामने खेळवले जाणार आहे. तब्बल एक वर्षानंतर वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचे या मालिकेसाठी भारतीय संघात पुनरागमन होत आहे. पाच सदस्यीय राष्ट्रीय निवड समितीने ऋषभ पंतला वगळण्याचा निर्णय घेतल्यामुळे इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी भारताच्या टी-२० संघात संजू सॅमसनची निवड झाली आहे.

दीर्घकाळ दूर राहिल्यानंतर वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करत असताना सूर्यकुमार यादव संघाचे नेतृत्व करत राहील. फिरकी गोलंदाजी करणारा अष्टपैलू अक्षर पटेल उपकर्णधारपदाची जबाबदारी सांभाळेल.

ध्रुव जुरेल हा दुसरा यष्टिरक्षक-फलंदाज असेल, तर नितीश कुमार रेड्डीला ऑस्ट्रेलियातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल टी-२० संघात स्थान देण्यात आले आहे.

अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निवड समितीने इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे,



२२ जानेवारीपासून पाच टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने आणि त्यानंतर तीन एकदिवसीय सामने होणार आहेत. जरी मात्र आयसीसी चॅम्पियन्स चषकासाठी भारतीय संघाची घोषणा झालेली नाही. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील संघ इंग्लंडविरुद्धची मालिका जिंकण्यासाठी सज्ज आहे.

**भारत वि. इंग्लंड मालिकेचे वेळापत्रक**

२२ जानेवारी, सायंकाळी ७.०० वाजता, ईडन गार्डन्स, कोलकाता येथे पहिला टी-२० सामना, २५ जानेवारी, सायंकाळी ७.०० वाजता, एम. ए. चिदंबरम स्टेडियम, चेन्नई येथे दुसरा टी-२० सामना, २८ जानेवारी, सायंकाळी ७.०० वाजता, सौराष्ट्र क्रिकेट संघटना स्टेडियम, राजकोट येथे तिसरा टी-२० सामना, ३१ जानेवारी, सायंकाळी ७.०० वाजता, महाराष्ट्र क्रिकेट संघटना स्टेडियम, पुणे येथे चौथा टी-२० सामना, २ फेब्रुवारी, सायंकाळी ७.०० वाजता, वानखेडे स्टेडियम, मुंबई येथे पाचवा टी-२० सामना.

**वन-डे मालिकेचे वेळापत्रक**

६ फेब्रुवारी, दुपारी १.३० वाजतापासून, विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, नागपूर येथे पहिला वन-डे सामना, ९ फेब्रुवारी, दुपारी १.३० वाजतापासून, बाराबती स्टेडियम, कटक येथे दुसरा वन-डे सामना, १२ फेब्रुवारी, दुपारी १.३० वाजतापासून, नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद येथे तिसरा वन-डे सामना.

**भारतीय टी-२० संघ**

सूर्यकुमार यादव (कर्णधार), संजू सॅमसन (यष्टिरक्षक), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, रिंकू सिंग, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल (उपकर्णधार), हर्षित राणा, अर्शदीप सिंग, मोहम्मद शमी, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, वॉशिंग्टन सुंदर व ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक).

एकदिवसीय संघ आणि आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी संघ आदर्शपणे राहील, तरी भारतासाठी टी-२० संघाची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील टी-२० संघात खूपच तरुण खेळाडू आहेत, ज्यात प्रतिभावान सुपरस्टार खेळाडूंचा समावेश आहे.

मोहम्मद शमी भारताकडून शेवटचा २०२३ च्या अहमदाबाद येथे झालेल्या विश्वचषक अंतिम सामन्यात खेळला होता, त्यानंतर घोट्याच्या दुखापतीमुळे त्याला शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याने संघाच्या बाहेर जावे लागले. (वृत्तसंस्था)

# भारतीय महिलांचे वन-डे मालिका जिंकण्याचे लक्ष्य

### युवा खेळाडूंकडून अधिक दमदार कामगिरीची अपेक्षा

**राजकोट, ११ जानेवारी**

रविवारी येथे भारत आणि आयर्लण्ड महिला संघादरम्यान दुसरा एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. तीन सामन्यांच्या मालिकेत विजय मिळवण्यासाठी पहिल्या सामन्यात युवा खेळाडूंनी केलेल्या कामगिरीपेक्षा अधिक दमदार कामगिरी करण्याची अपेक्षा आहे.

अनुभवहीन भारतीय महिला संघाने पहिल्या एकदिवसीय सामन्यात आपला विजय साजरा केला. भारताने ६ गड्यांनी विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. कर्णधार स्मृती मंधानाने आपला उत्तम फॉर्म कायम राखत ४१ धावांची दमदार खेळी केली, तर विजयासाठी धावांचा पाठलाग करताना प्रतीका रावल आणि तेजल हसबनीस १०० पेक्षा जास्त धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. त्यांची कामगिरी संघासाठी मोठी प्रेरणा आहे, विशेषतः नियमित कर्णधार हरमनप्रीत कौरला या मालिकेत

**भारत-आयर्लण्ड महिला दुसरा वन-डे सामना**

**स्थळ :** सौराष्ट्र क्रिकेट संघटना स्टेडियम, राजकोट
**वेळ :** सकाळी ११ वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

विश्रांती देण्यात आल्यानंतर तिला संघातून वगळण्यात आले आहे. वेस्ट इंडीजविरुद्धच्या गत मालिकेत सर्वाधिक बळी टिपणारी वेगवान गोलंदाज रेणुका सिंगलाही या मालिकेसाठी विश्रांती देण्यात आली.

रेणुकाच्या अनुपस्थितीत युवा गोलंदाज तितस साधूने पहिल्याच स्पेलमध्ये आक्रमक गोलंदाजी केली. सायली सतघरेनेही प्रभावित केले व सायमा ठाकोरने १० षटकांचा स्पष्ट स्पेल टाकला. फिरकी गोलंदाज प्रिया मिश्राने झटपट दोन बळी टिपले व उपकर्णधार दीप्ती शर्मानेही मोलाची भूमिका बजावली.

न्यूझीलंडविरुद्ध यापूर्वी भारतीय संघाचे नेतृत्व करणाऱ्या स्मृती मंधानाने अनुभवहीन संघाचे उत्कृष्ट व्यवस्थापन केले. या वर्षाच्या अखेरीस घरच्या मैदानावर होणाऱ्या वन-डे विश्वचषकापूर्वी व्यवस्थापन बेंच स्ट्रेंथवर समाधानी असेल.

भारतीय गोलंदाज आयर्लण्डला २०० धावांच्या आत रोखण्यासाठी व सामना संपवण्यासाठी आपली योजना प्रभावीपणे राबवण्याचा प्रयत्न करतील. आयर्लण्डकडून पहिल्या वन-डे सामन्यात कर्णधार गॅबी लुईसने ९२ धावांची शानदार खेळी केली, परंतु तिला मधल्या फळीकडून साथ मिळाली नाही. पॉलने संधीचा फायदा घेत अर्धशतकही झळकावले. भारताला आव्हान देण्यासाठी आयर्लण्डला इतर फलंदाजांकडून अधिक दृढनिश्चयाची आवश्यकता असेल.

आयर्लण्डची गोलंदाजीचा विभाग सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे. गत वन-डे सामन्यात ३ बळी घेणाऱ्या एमी मॅग्वायर शिवाय उर्वरित गोलंदाज महागडे व निष्प्रभ ठरले व भारताने १५ षटके शिल्लक ठेवत विजयाचे लक्ष्य गाठले. आयर्लण्डला भारताविरुद्ध पहिला महिला एकदिवसीय विजय मिळवण्यासाठी आपल्या कामगिरीत सुधारणा करण्याची आवश्यकता असेल. (वृत्तसंस्था)

# मानस गायकवाड व विरेश शरणार्थी यांची उल्लेखनीय कामगिरी

## आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा : स्वरलक्ष्मी नायर व प्रथमेश शेरला यांना आंतरराष्ट्रीय कँडिडेट मास्टर पदवी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

मदुराई येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत सोलापूर चेस अकॅडमीच्या तेरा वर्षीय आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त मानस गायकवाड याने उत्कृष्ट खेळ करत दहापैकी साडेसहा गुण प्राप्त केले व २१०० पेक्षा कमी रेटिंग गटात तिसरा क्रमांक प्राप्त करत रु. ४०००० चे रोख पारितोषिक पटकाविले. चेन्नई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तेरा वर्षाखालील राष्ट्रीय विजेत्या विरेश शरणार्थी याने देखील नेत्रदिपक कामगिरी करत दहापैकी सहा गुण प्राप्त आपल्या आंतरराष्ट्रीय गुणांकनात ९८ गुणांची वाढ करत कॅटेगरी गटात दुसरा क्रमांक व रोख रक्कम आठ हजार मिळविले.

स्पेन व फ्रांस येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत स्वरलक्ष्मी नायर हिने देखील आंतरराष्ट्रीय गुणांकनात २४० गुणांनी वाढ करत महिला कँडिडेट मास्टरचा निकष पूर्ण करत उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच तेरा वर्षांखालील महाराष्ट्र राज्य विजेता प्रथमेश शेरलाने १५ व १३ वर्षाखालील राष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट खेळ करत अनुक्रमे तिसरे व






दुसरे स्थान पटकावले. त्याने ११ फेऱ्यांपैकी ९ गुण मिळवले ज्यामध्ये त्याने सध्याचा सब-ज्युनियर चॅम्पियन आंतरराष्ट्रीय मास्टर इलमपारथी ए.आर. (रेटिंग-२४५७), माजी ११ वर्षाखालील राष्ट्रीय विजेता फिडे मास्टर जी. आकाश यांच्यावर प्रभावी विजय मिळवला व आयएम वाझ एथन (रेटिंग: २३७०) यांच्याशी बरोबरी साधली. त्याला १५ वर्षाखालील गटात रोख बक्षीस म्हणून ५८००० रुपये तर १३ वर्षाखालील गटात ६०००० रुपये आणि आकर्षक ट्रॉफी मिळाली.

त्याने १६७ एलो गुण देखील मिळवीत फिडे यादीत २२०० एलो रेटिंगचा निकष पूर्ण करत कँडिडेट मास्टरचा पदवी प्राप्त केली आणि आगामी आशियाई आणि जागतिक युवा स्पर्धेत प्रथमेश भारताचे प्रतिनिधित्व देखील करेल. वागीश स्वामिनाथन याने बिलो १८०० गुणांकन स्पर्धेत चमकदार कामगीरी करत १३ वर्षाखालील गटात तिसरा क्रमांक मिळवीत सायकल पारितोषिक पटकाविले.

या स्पर्धेत भारतासह २२ देशांतील १५९ अव्वल खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. सोलापूरच्या मानसने स्पर्धेत आकर्षक खेळ करत इंडोनेशियाची वुमन इंटरनॅशनल मास्टर डायजेंग थेरेसा, ओरिसाचा श्रेयांश पटनायक तमिळनाडूचा फिडे मास्टर राम अरविंद, कॅन्डीडेट मास्टर भरत कल्याण, वेस्ट बंगालचा फिडे मास्टर सौरथ विश्वास, तेलंगणाचा फिडे मास्टर के. रामू यांना पराभूत केले. तर रशियाच्या आंतरराष्ट्रीय मास्टर स्लिझेव्हस्की अलेक्झांडरचा डाव बरोबरीत सोडविला. मानसने त्याच्या आंतरराष्ट्रीय गुणांकनात १४३ गुणांनी वाढ केली. स्पर्धेत आंतरराष्ट्रीय मातब्बर खेळाडूंच्या सहभागामुळे पहिल्या फेरीपासूनच विजेतेपदासाठी जोरदार रस्सीखेच पहावयास मिळाली.

स्पेनच्या सनवे सीजेस आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवात स्वरलक्ष्मीने आपल्या खेळाची चुणूक दाखवत मेक्सिकोच्या आंतरराष्ट्रीय मास्टर लुईस कार्लोसविरुद्ध पोलंडच्या फिडे मास्टर प्निक्झेक मरेक, जर्मनीचा ग्रँडमास्टर वोग्ट लोथर यांच्याशी बरोबरी साधली. तसेच अमेरिकेच्या हरीश नीरज, अझरबैजानच्या महिला आंतरराष्ट्रीय मास्टर इब्राहिमोवा सबिना व स्पेनच्या फिडे मास्टर जोस रॅमनविरुद्ध सुरेख खेळ करत विजय प्राप्त केला. या स्पर्धेत ४२ देशातील ग्रँडमास्टर, आंतरराष्ट्रीय मास्टर यांच्यासह एकूण २६७ मानांकित खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. विरेशने ग्रँडमास्टर शाम निखिल व ग्रँडमास्टर शामसुंदर तसेच किर्गिस्तान व मंगोलियाच्या आंतरराष्ट्रीय मास्टर टोलोगॉन सेमेटीव अजिबिलेग उर्तसैख यांच्याशी बरोबरी साधली.

बुद्धिबळ या खेळामध्ये आंतरराष्ट्रीय कँडिडेट मास्टर ही पदवी आहे. ही पदवी जागतिक बुद्धिबळ संघटने मार्फत दिली जाते. एखाद्या खेळाडूने आंतरराष्ट्रीय स्तरावर २२०० किंवा त्यापेक्षा अधिक क्लासिकल रेटिंग मिळवल्यास तर महिलांसाठी २००० चे क्लासिकल रेटिंग प्राप्त करून हि पदवी प्राप्त होते. मानस, विरेश, प्रथमेश, स्वरलक्ष्मी व वागीश यांना सोलापूरचे आंतरराष्ट्रीय पंच व नामवंत राष्ट्रीय प्रशिक्षक सुमुख गायकवाड व आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त उदय वगरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच ग्रँडमास्टर अभिजित कुंटे, आंतरराष्ट्रीय मास्टर अनुप देशमुख, द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त रघुनंदन गोखले यांचेदेखील विशेष मार्गदर्शन लाभले.

खेळाडूंनी मिळविलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापुर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, सचिव सुमुख गायकवाड, उद्योजक रवींद्र जयवंत तसेच ग्रँडमास्टर अभिजित कुंटे, अशोक भाऊ जैन, महाराष्ट्र चेस असोसिएशनचे सचिव निरंजन गोडबोले, अध्यक्ष परिणय फुके यांनीदेखील कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

# विचारास कष्टाची जोड दिल्यास यशप्राप्ती हमखास : बंडगर

### ह. दे. प्रशाला क्रीडा स्पर्धा पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा -**
**सोलापूर दि.११ जानेवारी-**

विचारास कष्टाची जोड दिल्यास हमखास यश प्राप्त होते. मोबाईलपासून दूर रहा. वाचण्याची आवड जोपासावी, मोठ्या व्यक्तींची चरित्रे-आत्मचरित्रे वाचावीत, महान व्यक्तींनी यश संपादन करताना किती परिश्रम घेतले याची माहिती घ्यावी, असे आवाहन राष्ट्रीय लॉन टेनिस खेळाडू संध्याराणी बंडगर यांनी व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक मंडळी पुणे संचलित हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय सोलापूरच्या वतीने क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्सन करताना त्या बोलत होत्या.

शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्या




दीपा फाटक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले. प्राचार्या दीपा फाटक यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना स्पर्धेमध्ये जिंकणारे व हरणारे दोन्ही व्यक्ती किंवा संघ महत्त्वाचे आहेत असे सांगून खेळातील सांघिक शक्ती, निर्णय शक्ती महत्त्वाचे असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी कलागुणांना वाव द्यावा, शिक्षणाबरोबर अन्य क्षेत्रातही आपले नाव चमकवावे याकरिता परिश्रम घ्यावे असे विचार मांडले.

यावेळी पर्यवेक्षक हणुमंत मोतीबने, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार, बी. डी. बनसोडे, ए. सी. राऊत, क्रीडा शिक्षक प्रा. प्रमोद चुंगे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. परितोषिक वितरण यादी वाचन प्रा. संतोष बिराजदार यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले. प्रा. सुमित गाडेकर यांनी आभार मानले.



# बटरफ्लाय स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

बटरफ्लाय इंग्लिश मिडीअम स्कूल येथे क्रीडा महोत्सवाची सुरूवात झाली. कार्यक्रमास मैदानी-राज्य क्रीडा मार्गदर्शक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गणेश पवार तसेच सोलापूर जिल्हा व शहर सेपकटकरा असोशिएशन अध्यक्ष संजय सावंत हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. संस्थेचे विश्वस्त राजेंद्र मायनाळ हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी संस्थेचे खजिनदार शंकर पाटील व उपाध्यक्ष शरद नागांवकर उपस्थित होते. प्रशालेच्या माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका डॉ. रश्मी कुंभार व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रश्मी पुर्वत यांच्या अधिपत्याखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. क्रीडा मोहोत्सवाचे उदघाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. सूत्रसंचालन प्रशालेच्या सहशिक्षका सौ. रूपाली तमण यांनी केले प्रास्ताविक साधना पाटील यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय कोमल सोनकांबळे व स्वप्ना शिंदे यांनी करून दिला.

आभार वृषाली गडहिरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडाशिक्षिका रफिया लंगोटे व क्रीडा प्रशिक्षिका आरती मलजी यांचे विशेष योगदान लाभले.

# खो-खोच्या प्रचार-प्रसारासाठी 'तरुण भारत'चे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे यांची निवड

## पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा : तोरसकर व कदम यांचीही वर्णी

**नवी दिल्ली, दि.११ जानेवारी -**

नवी दिल्ली येथे १३ ते १९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेसाठी खो-खोचा ग्रामीण ते जागतिक स्तरापर्यंत डिजिटल, सोशल मीडिया व वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रचार-प्रसार आणि प्रसिद्धीसाठी महाराष्ट्र खो खो असोसिएशनच्या तिघांची निवड झाली आहे.

यात सोलापूरच्या दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक व महाराष्ट्र खो खो असोसिएशनच्या प्रसिद्धी समितीचे चेअरमन अजितकुमार संगवे यांचा समावेश आहे. त्यांच्या निवडीबद्दल सोलापूर दैनिक तरुण भारतचे समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, संपादक प्रशांत माने, सोलापूर अॅम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले.

श्री. संगवे यांच्यासह महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सहसचिव बाळासाहेब (बाळ) तोरसकर (मुंबई), प्रसिद्धी समितीचे सदस्य भूषण कदम (पुणे) यांचीही वर्णी लागली आहे. सर्वांना महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांनी शुभेच्छा दिल्या.

### अल्प परिचय



**भूषण प्रकाश कदम (प्रसिद्धी समिती सदस्य ) :** प्रवर्तक म्हणून निवड. फोटोग्राफर. १२ वर्षे खेळ आणि महाराष्ट्र खो-खो असोसिएशनकरिता खेळाचा प्रचार प्रसार प्रवर्तक म्हणून काम. माजी प्रसिद्ध समिती सचिव, महाराष्ट्र खो-खो असोसिएशन. पुणे जिल्हा खो-खो असोसिएशन व महाराष्ट्र खो-खो असोसिएशन कुमार/कुमारी गटाकरिता निवड समिती सदस्य म्हणून काम. मुक-बधिर विद्यार्थ्यांना खो-खो प्रशिक्षण देऊन खेळाची आवड निर्माण करण्याचे कार्य केले. गरजू ग्रामीण भागातील खेळाडूना खो-खोचे मार्गदर्शन.



**अजितकुमार बापूराव संगवे (प्रसिद्धी समिती चेअरमन) :** राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते खो-खोपटू. राष्ट्रीय खो-खो पंच. राष्ट्रीय सुवर्णपदक विजेत्या किशोरी खो-खो संघाचे प्रशिक्षक. महाराष्ट्र खो-खो असोसिएशन प्रसिद्ध समितीचे सदस्य व सचिव म्हणून कार्य. सोलापूर खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य. महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे प्रसिद्धी समितीप्रमुख.



**बाळासाहेब शिवाजी तोरसकर (सहसचिव) :** खेळ आणि समाजकार्य यांचा सुरेख संगम साधत खो-खोच्या क्षेत्रात आपले स्थान अधोरेखित केले. राष्ट्रीय खो-खो पंच. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या प्रसिद्ध समितीचे चेअरमन म्हणून कार्य. मुंबई खो-खो संघटना उपाध्यक्ष. मुंबई व महाराष्ट्रात खो-खोच्या प्रसिद्धीसाठी महत्वाची भूमिका. वेगवेगळ्या वर्तमानपत्रात खेळासाठी विविध लेख प्रसिद्ध. मुंबईत झालेल्या एकमेव राष्ट्रीय खो-खो स्पर्धेचे संयोजन सचिव.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# तीन, चार महिन्यात पंढरपूर कॉरिडॉरचे काम सुरु होणार

## मुख्यमंत्री फडणवीस; नागपूर येथे मुलाखतीत फडणवीसांचे सूतोवाच, आषाढी यात्रेवेळी भूमिपूजन होणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जानेवारी-**

वाराणसी, उज्जैनच्या धर्तीवर येत्या तीन ते चार महिन्यात पंढरपुरात कॉरिडॉर करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी दिली. त्यामुळे येत्या आषाढी एकादशीला विठुरायाच्या महापूजेसाठी मुख्यमंत्री पंढरपुरात आल्यावर त्यांच्या हस्ते पंढरपूर किंवा विठ्ठल कॉरिडॉरचे भूमिपूजन होणार याबद्दलचे संकेत मिळत आहेत.

राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर येथे आयोजिण्यात आलेल्या एका कार्यक्रमात दैनिक तरुण भारतचे प्रबंध संपादक तथा ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेतली. त्यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॉरिडॉरबाबतची सविस्तर माहिती दिली. पंढरपूर ही राज्याची दक्षिण काशी म्हणून ओळखली जाते. राज्यातील नव्हे तर देशातील हे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटी होऊन अधिक भाविक येथे येत असतात. यामुळे त्यामुळे विठुरायाच्या दर्शनासाठी येथे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात म्हणून नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात दैनिक तरुण भारतचे प्रबंध संपादक विवेक घळसासी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना वाराणसी, उज्जैन येथे कॉरिडॉर झाले आहे. आता पंढरपूरचे कॉरिडॉर केव्हा सुरू होणार असा प्रश्न विचारला. त्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडवणीस म्हणाले, गेली दहा वर्षे आम्ही केवळ पंढरपूर कॉरिडॉरची चर्चाच करतो आहे. सध्या विठ्ठल मंदिराचे सुशोभिकरण करण्याचे काम सुरू आहे. कार्तिकी यात्रेच्या वेळी उपमुख्यमंत्री असताना आपण त्या कामाचे भूमिपूजन केले होते. यासाठी १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर मंदिराचा कायापालट होणार आहे. पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण विठ्ठल मंदिराला पुरातन लूक देण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. लवकरच संपूर्ण विठ्ठल मंदिराला आलेला पुरातन लूक भाविकांना पहावयास मिळणार आहे.

दरम्यान पंढरपुरात पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. यामुळे येणाऱ्या भाविकांना चांगल्या प्रकारे सुविधा मिळाव्यात यासाठी पंढरपुरात कॉरिडॉर करण्यात येणार आहे. मात्र गेल्या दोन वर्षापासून याबाबत आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. आता सर्व निवडणुका पार पडल्या असून येत्या दोन ते तीन महिन्यात पंढरपुरात कॉरिडॉर करण्याचे काम सुरू होणार आहे.

नागरिक व्यापारी भाविक महाराज मंडळी यांना विश्वासात घेऊन कॉरिडॉर करण्यात येणार आहे असे मुख्यमंत्री फडवणीस यांनी सांगितले. यामुळे तीन ते चार महिन्यात हे काम सुरु करणार आहे. या तीन ते चार महिन्यातच वारकरी सांप्रदायातील महाकुंभमेळा अर्थात आषाढी यात्रा असते. या यात्रेच्या वेळी आषाढी एकादशीची विठुरायाची शासकीय महापूजा राज्याचे मुख्यमंत्री सपत्नीक करीत असतात. त्यामुळे पंढरपूर किंवा विठ्ठल कॉरिडॉरचे भूमिपूजन येत्या आषाढी यात्रेच्या वेळी होणार असल्याचे देखील संकेत मिळत आहेत.



### देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिले होते संकेत

दरम्यान विधानसभा निवडणुकीनंतर मुंबई येथे भाजपाच्या कोअर कमिटी बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीदेखील पंढरपूर कॉरिडॉर हा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीमप्रोजेक्ट असून पंढरपुरात कॉरिडॉर करण्याबाबत केंद्र सरकार पुढाकार घेणार असल्याचे देखील यावेळी अर्थमंत्री सीतारामन यांनी सांगितले होते.

### राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांकडूनदेखील संकेत

राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन हे नुकतेच पंढरपूर दौऱ्यावर आलेले होते. त्यावेळी पंढरपूर कॉरिडॉर बद्दल त्यांना विचारले असता पंढरपूर कॉरिडॉर बाबत लवकरच आपणाला गोड बातमी ऐकावयास मिळेल असे सूतोवाच त्यांनी देखील केलेले होते.

### मन की बातद्वारे पंतप्रधानांनी केले होते आवाहन

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीर्थक्षेत्र पंढरपूरकडे लक्ष केंद्रित केले असून मन की बात कार्यक्रमात तीर्थक्षेत्र पंढरपूरला देशातील नागरिकांनी एकदा तरी भेट द्यावी असे आवाहन देखील त्यांनी केले होते.

---

## संक्षिप्त वृत्त

### डॉ. महादेव ढगे यांना पीएचडी पदवी प्रदान

**बार्शी, दि. ११ जानेवारी-**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने शुक्रवार, दि. १० जानेवारी रोजी २० व्या पदवी प्रदान समारंभाचे आयोजन करण्यात आले. या समारंभात डॉ. महादेव अशोक ढगे यांना महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आणि या कार्यक्रमाचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. समारंभात विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर आणि आय.सी.टी. मुंबईचे कुलपती प्रा. जे. बी. जोशी उपस्थित होते. याप्रसंगी अनेक विद्यार्थी, पालक आणि मान्यवर मंडळींनी हजेरी लावली. डॉ. महादेव ढगे यांनी Study Of Customer Satisfaction of Hospital Services In Solapur District (Maharashtra) या विषयावर संशोधन केले आहे. त्यांच्या या महत्त्वपूर्ण कार्यासाठी डॉ. ए. ए. शेख यांचे मार्गदर्शन लाभले. या संशोधनाद्वारे रुग्णालयीन सेवांमध्ये सुधारणा घडवण्यासाठी महत्त्वपूर्ण उपाय सुचवले गेले आहेत. राज्यपालांच्या हस्ते पदवी स्वीकारताना डॉ. महादेव ढगे यांचा हा क्षण त्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक मोठा गौरव ठरला. त्यांच्या या यशामुळे कुटुंब, मित्र परिवार आणि मार्गदर्शकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदनजी जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, जॉईन सेक्रेटरी अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे यांनी पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.



### बार्शीमध्ये राष्ट्रीय सडक सुरक्षा अभियान उत्साहात

**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

नेहरु युवा केंद्र सोलापूर, क्रांती बहुउद्देशीय संस्था बेलगाव, बार्शी शहर पोलीस स्टेशन व उपप्रादेशिक वाहन बार्शी यांच्यावतीने राष्ट्रीय सडक सुरक्षा अभियान अभियानांतर्गत राष्ट्रीय रस्ता सुरक्षा मोहीम दि. ११ जानेवारी रोजी, बार्शी बसस्थानक आगार या ठिकाणी राबविण्यात आली. रस्त्यावर आपली स्वतःची व इतरांची काळजी सर्व वाहनचालकांनी घ्यावी, दुचाकी वापरताना हेल्मेटचा वापर करावा, चार चाकी वाहनात बसल्यानंतर शीटबेल्ट वापरावा, वेग मर्यादित ठेवावा, अपघाताचे नियम पाळून अपघात टाळावे अशा प्रकारचे आवाहन यावेळी बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले. तसेच बार्शी आगार व्यवस्थापक मधुरा जाधवर यांनी देखील यावेळी उपस्थितांना वाहतुकीच्या नियमाबद्दलचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, बार्शी आगार व्यवस्थापक मधुरा जाधवर, सहाय्यक वाहतूक अधीक्षक विजय हांडे, क्रांती बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष धिरज शेळके, पोलीस जाणीव फाउंडेशनच्या शुभांगी बोंडवे, आतिश पालखे, आकाश नाईक सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, आधार लेखाकर गिरीश नवले यांच्यासह वाहन चालक, वाहक, मेकॅनिकल तसेच प्रवासी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक वाहतूक निरीक्षक मंगेश दहीहांडे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार वरिष्ठ लिपीक पुरुषोत्तम वाघूलकर यांनी केले.

### पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुलासाठी दोन गुंठे क्षेत्राला बांधकाम परवाना द्यावा

**अन्यथा २६ जानेवारी रोजी उपोषणाचा इशारा**

**सांगोला, दि. ११ जानेवारी-**



सांगोला नगरपालिका हद्दीमध्ये पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुलाला दोन गुंठ्यापर्यंत बांधकाम परवाना व वापर परवाना देण्यात यावा व गोरगरिबांना घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी शासनाने प्रयत्न करावा अशी मागणी सांगोला नगरपालिकेचे मा. बांधकाम समितीचे सभापती सतीश भाऊ सावंत यांनी केली असून जर पाठीमागे ज्या पद्धतीने ग्रीन झोन मध्ये बांधकाम परवानगी दिली त्याच पद्धतीने ग्रीन झोन मध्ये बांधकाम परवानगी द्यावी अन्यथा २६ जानेवारी २०२५ रोजी सांगोला तहसील कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचे लेखी निवेदन संबंधित मंत्री महोदय व संबंधित अधिकाऱ्याला दिले आहे. सांगोला येथे शासनाच्यावतीने महाराष्ट्र भर गोर-गोरीबांसाठी व ज्यांना घरे नाहीत त्यांच्यासाठी पतंप्रधान आवास योजनेतून घरकुले बांधून देणे सुरू केले आहेत. या घरकुल योजनेमध्ये अनेकांना पैसे नसताना सुध्दा स्वतःची जागा असली तरी त्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्याचा शासनाने प्रयत्न केला. शासनाने गोरगरींबांसाठी चालू केले.

### ॲड. अविनाश जाधव यांची मुंबई येथे सहाय्यक सरकारी वकील म्हणून नियुक्ती

**बार्शी, दि. ११ जानेवारी-**



बार्शी वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. अविनाश जाधव यांची बांद्रा, मुंबई येथे सहाय्यक सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली आहे. ऍड. अविनाश जाधव यांचे आतापर्यंतचे वकिली क्षेत्रातील कार्य अतिशय उल्लेखनीय ठरले आहे. वकिली क्षेत्रासोबत सामाजिक कार्यात देखील जाधव यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. तसेच बार्शी न्यायालयच्या नूतन इमारतीच्या कार्यात देखील त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल बार्शी शहर व तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे.

---

## वाल्मिक कराडकडून उपरीतील शेतकऱ्यांची फसवणूक

**पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ जानेवारी-**

सध्या खंडणीच्या प्रकरणात अटकेत असलेला बीड येथील नेता वाल्मीक कराड याने सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली या तीन जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कोट्यावधी रुपयाची फसवणूक केली असल्याचे उघड झाले आहे. याबाबत पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात कराडवर गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे

वाल्मीक कराड यांनी सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली या तीन जिल्ह्यातील १४० शेतकऱ्यांना हार्वेस्टिंग मशिनचे अनुदान मिळवून देतो असे म्हणून प्रत्येकी ८ लाख रुपये असे एकंदर ११ कोटी २० लाख घेतले. मात्र पैसे घेऊन नऊ महिने झाले तरीही अनुदान शेतकऱ्यांना मिळाले नाही. यामुळे वाल्मिक कराड यांनी फसवणूक केली असल्याचे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. याबाबत पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात पंढरपूर तालुक्यातील उपरी येथील दिलीप नागणे या शेतकऱ्याने वाल्मिक कराड याच्या विरुद्ध फसवणुकीची तक्रार केली आहे. नागणे यांनी कराड याच्या विरोधात पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. वाल्मीक कराड याचे एक एक कारनामे आता समोर येऊ लागले आहेत. त्यामुळे इतके दिवस बीड, परळी पुरतेच वाल्मीक कराडचे असलेले लोन आता पंढरपूरसह सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यात देखील पोहचल्याची नागरिकांमधून चर्चा रंगू लागली आहे.

## सुशील कराड, त्याच्या दोन साथीदारांविरुद्ध जिल्हा न्यायालयात फिर्याद दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जानेवारी-**

सुशील वाल्मीक कराड व त्याच्या दोन साथीदारांविरुद्ध एका महिलेने सोलापूर जिल्हा न्यायालयातील जिल्हा व सत्र न्यायाधीश जे. जे. मोहिते यांच्या न्यायालयात खाजगी फिर्याद दाखल करण्यात आली आहे.



सोलापूर येथे राहणारी महिला, तिचा पती व तिचे दोन मुले हे परळी येथे राहण्यास होते. परळी येथे राहत असताना तिचा पती हा सुशील वाल्मीक कराड यांच्या ट्रेडर्स मध्ये कामास होता. सुशील कराड हा तिच्या पतीस तू दोन बल्कर ट्रक, दोन कार व जागा कसे काय कमावला म्हणून मारहाण करून रिवॉल्व्हरचा धाक दाखवून तिच्या पतीकडून दोन बल्कर ट्रक, दोन कार, दोन दुचाकी व पीडीतेच्या नावे असलेला प्लॉट हा अनिल मुंडे यांच्या नावावर करून बळजबरीने घरातून उचलून नेऊन कोणतेही पैसे न देता खरेदी केला. तसेच तिचे अडीच तोळ्यांचे सोने हे परळी येथील बालाजी टाक ज्वेलर्सला बळजबरीने विकायला लावले व त्याचे आलेले पैसे सुशिल कराड याने घेतले. तसेच तिच्या लहान मुलीस देखील मारहाण केली, अशा आशयाची तक्रार वजा सविस्तर फिर्याद/तक्रार पीडित महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली होती. एमआयडीसी पोलिसांनी फिर्यादीची दखल घेतली नाही म्हणून त्या महिलेने सोलापूरचे पोलीस आयुक्त यांच्याकडे सविस्तर लेखी तक्रार केली. परंतु पोलीस आयुक्त यांनी देखील त्याची दखल घेतली नाही.

त्यावर त्या महिलेने सोलापूर शहरातील एमआयडीसी पोलीस स्टेशन, सोलापूर पोलीस आयुक्त, सोलापूर व बीडचे पोलीस अधीक्षक व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना रजिस्टर पोस्टाने तक्रार तसेच तक्रारीच्या अनुषंगाने असलेले कागदपत्रे पोस्टाने पाठवून दिली. तरी देखील कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने तक्रारी अर्जाची दखल घेतली नाही व आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद केला नाही. त्यामुळे त्या महिलेने सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात खाजगी फिर्याद वजा तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे विविध कलमान्वये पोलिसांना सुशील कराड, अनिल मुंडे, गोपी गंजेवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात आदेश पारित करण्याची विनंती केली. त्यावर न्यायालयाने आरोपीचे म्हणणे मागविले असून आरोपींनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. आरोपींचे वकील नसल्यामुळे चौकशीस १३ जानेवारी रोजी याची पुढील सुनावणी होणार आहे. याप्रकरणात पीडितेतर्फे ॲड. विनोद सूर्यवंशी, ॲड. श्रीकांत पवार, ॲड. मधुकर व्हानमाने हे काम पाहत आहेत. परळी, बीड येथील कारनामे सोलापुरातही पोहोचले आहेत.

---

## भांडणात ढकलून दिल्याच्या कारणावरून बापाने केला मुलाचा खून

**हातीद येथील घटना; आरोपी जेरबंद**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ जानेवारी-**

मुलाची व पत्नीची भांडणे चालू असताना वडील सोडवण्यास गेले असता मुलाने ढकलून दिले याचा राग आल्याने बापानेच १८ वर्षे वय असलेल्या मुलाच्या डोक्यात कुऱ्हाडीने घाव घालून खून केला असल्याची घटना हातीद (ता. सांगोला) येथे शुक्रवार दि.१० जानेवारी रोजी रात्री साडेसात वाजता घडली.

याबाबत अधिक माहिती अशी, हातीद येथील बिरा बंडगर यांचे शिंपीवस्ती शाळेचे पाठीमागे हातीद गावचे हद्दीत असले सामाईक जमीन गट नंबर २७७ मध्ये काटेरी झाडे झुडपे तोडून त्याचा कोळसा तयार करण्यासाठी रामा किसन पवार, गौरी रामा पवार, रोहीदास रामा पवार, सर्व मुळ रा.कुसुबळे आदिवासी वाडी, निजामपुर, ता.माणगांव, जि.रायगड असे कोळसेवाले कुटूंबासह राहणेस आले होते. शुक्रवार दि.१० जानेवारी रोजी साडेसातच्या सुमारास घटनेतील मयत रोहीदास पवार हा त्याची आई गौरी पवार हीस शिवीगाळ व हाताने मारहाण करीत असताना यातील आरोपी वडील रामा किसन पवार हे सोडविणेस गेले असता त्यास मयताने ढकलुन दिले. याचा राग आल्याने आरोपीने त्याचा मुलगा रोहीदास रामा पवार (वय १८) याचे डोकीत कुऱ्हाडीचे घाव घालून त्याचा खुन केला.

याबाबत बिरा बबन बडगर (रा. हातीद) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी रामा किसन पवार (रा. कुसुबळे आदिवासी वाडी, निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड) यास ताब्यात घेवून अटक करण्यात आली असुन त्यास रविवार दि.१२ जानेवारी रोजी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. सदर घटनेचा तपास सोलापूर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, सांगोला पोलीस निरीक्षक भिमराय खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक पुजारी हे करीत आहेत.



## बार्शीतील ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत करडे यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

अनेक वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रामध्ये कार्यरत असलेले, तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडणारे, चंद्रकांत करडे यांचा कळंब तालुका पत्रकार संघाच्यावतीने कै. शिवशंकर (बप्पा) घोंगडे जिल्हास्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

एनडीटीव्हीच्या असोसिएट एडिटर डॉ. कविता राणे, राजकीय विश्लेषक अभय देशपांडे, माध्यम व जनसंपर्क तज्ज्ञ सचिन साळुंखे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. अशोकदादा मोहेकर, धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष चंद्रसेन देशमुख, दैनिक लोकमतचे वृत्तसंपादक धर्मराज हल्लाळे, कळंब तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे, विश्वस्त सतीश टोणगे, बालाजी अडसूळ, शीतलकुमार घोंगडे यांच्यासह कळंब तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच पुरस्कार स्वीकारताना करडे यांच्यासमवेत प्रगतशील शेतकरी बाबा मुकटे, बंधू विक्रमनाना, पत्रकार मित्र गणेश गोडसे आदी मान्यवर उपस्थित होते.

---

## आधी मिटविला शेतकऱ्यांचा वाद... नंतर साजरा केला जन्मदिन

### मंद्रुप पोलीस ठाण्याचे सपोनि मनोज पवार यांची शेतकऱ्यांविषयी तळमळ

**एका दिवसात दहा तक्रारींचा निपटारा**

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**मंद्रुप, दि. ११ जानेवारी-**

मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिन सुरू केला. विशेष म्हणजे शनिवार ११ जानेवारी रोजी सपोनि मनोज पवार यांचा जन्मदिवस. या दिवशी त्यांचा जन्मदिवस साजरा करण्यासाठी आलेल्या नागरिकांना तुमच्या गावातील तक्रार व वाद मिटल्यानंतरच सत्कार स्वीकारतो, असे सांगितले. जन्मदिवसाचे सत्कार स्वीकारण्याऐवजी शेतीच्या बांधाविषयी व इतर आपापसातील वाद मिटविण्यास प्राधान्य दिले. त्यानंतर त्यांनी सत्कार स्वीकारला.



पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेत वेळ व पैसा मोठ्या प्रमाणात खर्च होतो. शिवाय दोन्ही तक्रारदारांना मानसिक त्रास सहन करावे लागतो. पोलीस ठाण्याला आलेल्या तक्रारदारांना न्याय मिळावा व त्यांचा वेळ व पैसा वाया जाऊ नये, यासाठी सपोनि पवार तक्रार निवारण दिन सुरु केला आहे. यावेळी होनमुर्गी, वांगी, मंद्रुप व माळकवठे येथील अनेक दिवसांपासून शेतीच्या बांधाविषयी असणारे तक्रार मिटल्यानंतरच सपोनि मनोज पवार यांनी सत्कार स्वीकारला. शेतकऱ्यांविषयी तळमळ असणारे व शेतीशी नाळ असल्याने मनोज पवार यांनी शेतीसंबंधित वाद मिटविण्यास प्राधान्य देत आहेत.

शनिवारी मनोज पवार यांच्या जन्म दिनी मंद्रुप पोलीस ठाण्यातील दहा तक्रार मिटविण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, हवालदार अविनाश पाटील, हवालदार सचिन मसलखांब यांच्यासह बीट अंमलदारांनी तक्रार मिटविण्यासाठी प्रयत्न केला.

### शेतीविषयी वाद मिटले पाहिजेत

शेतकऱ्यांची आपापसातील वादामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. न्यायालयात प्रकरण गेल्यानंतर वेळ व पैसा वाया जातो, म्हणून जन्मदिनी नागरिकांच्या सत्कारापेक्षा शेतकऱ्यांमधील वाद मिटविण्यास प्रयत्न केला. शेतकऱ्यांनी आपापसातील वाद मिटविल्यास पोलिसांवरील गुन्ह्यांचा बोजा कमी होईल.

**- मनोज पवार, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, मंद्रुप**

## रोखठोक

दिनेश गुणे

# ‘बदल्या’कडून ‘बदला’कडे!...

शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्या जनसंवादाच्या हातोटीने सुमारे तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणाचा बाजच बदलून टाकला होता. कोविड महामारीच्या काळात मुख्यमंत्री या नात्याने समाजमाध्यमांवरील दूरसंवाद यंत्रणेद्वारे राज्यातील जनतेस संबोधित करताना त्यांनी स्वतःकडे राज्याचे कुटुंब प्रमुखपद घेतले होते. जनता हे आपले कुटुंब मानून जनतेस शहाणपणाच्या चार गोष्टी समजावून सांगताना ज्यांनी ठाकरे यांना त्या काळात सातत्याने समाजमाध्यमांवर पाहिले, त्यांना, जगातील सर्व बाबींचे ज्ञान ठाकरेंच्या अंगी एकवटले आहे असाच भासही होत असावा. संजय राऊत या त्यांच्या प्रवक्त्याने त्या काळात घेतलेल्या उद्धव ठाकरे यांच्या मुलाखतीत राऊत यांनी जनतेच्या मनातील तो प्रश्नही ठाकरेंना थेट विचारला होता, हे आजही अनेकांस आठवत असेल. तर, अशा संवादातून बोधपर गोष्टी सांगून स्वघोषित जबाबदारीच्या भावनेतून जनतेस काही सल्ला देतानाच जनतेचे मनोरंजनही करण्याची त्यांची हातोटी महाराष्ट्राच्याच नव्हे, तर एकंदरीतच रूक्ष मानल्या जाणाऱ्या राजकारणासही नवी आणि अनोखी वाटली होती. शिवसेनेत बंड झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्षातील मोठ्या गटाने ठाकरे यांना अखेरचा ‘जय महाराष्ट्र’ केल्यावर मुख्यमंत्रिपदावरून पायउतार होतानाचा क्षण तसे पाहता गंभीरच होता. अशा अवघड परिस्थितीत पदावरून उतरण्याची वेळ राज्याच्या इतिहासात अन्य कोणत्याच मुख्यमंत्र्यावर आली नव्हती, तरीही ठाकरे यांनी समाजमाध्यमांवरून जनतेस उद्देशून केलेल्या अखेरच्या भाषणातही याच शैलीचा वापर करून सत्तेचा निरोप घेतला होता. पक्षाचे अस्तित्वच पणाला लावणाऱ्या त्या अभूतपूर्व फुटीनंतर सरकार अल्पमतात गेल्याने सत्ता टिकविता येणे शक्य नसल्याची जाणीव झाल्यानंतर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा घोषित करताना भावनाप्रधान मानसिक अवस्थेत त्यांनी त्या वेळी सांगितलेली ती लाकूडतोड्याची गोष्ट आठवत नाही असा एकही नागरिक महाराष्ट्रात सापडणार नाही. अशा कथाकथनामुळे राजकारणात रंगत येते हे त्या दिवशी महाराष्ट्रास उमगले आणि राजकारणाची एक नवी संस्कृती राज्यात रुजू घातली. त्यानंतर जेव्हा जेव्हा महाराष्ट्राच्या राजकारणात काही अनपेक्षित वळणे दिसू लागली, तेव्हा तेव्हा अशाच काही गोष्टींचे दाखले दिले जाऊ लागले. म्हणूनच, सध्या राजकारणात जे काही सुरू झाले आहे, ते पाहता, बिरबलाच्या चातुर्यकथांमधील ‘माकडीण आणि तिचे पिलू’ नावाची ती प्रसिद्ध गोष्ट आठवल्याखेरीज राहात नाही. या कथेचे बीज, स्वप्राणापेक्षा अन्य कोणतीच गोष्ट प्रिय नसते या सिद्धांताशी जोडले गेले आहे. जेव्हा प्राण कंठाशी येतात, अस्तित्वाचाच प्रश्न ऐरणीवर येतो, तेव्हा काहीही करून स्वतःस वाचविण्यासाठी कोणीही कोणत्याही थराला जातो, याचे प्रात्यक्षिक बिरबलाने अकबरास करून दाखविले होते आणि त्या प्रात्यक्षिकाची माकडीण ही नायिका होती. एका हौदात माकडीणीस तिच्या पिलासह बांधण्यात आले आणि पाणी सोडून हौद भरण्याची प्रक्रिया सुरू झाली. पाण्याची पातळी वाढत असताना माकडीण आपल्या पिलास वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करत होती, पण जेव्हा पाण्याची पातळी तिच्या गळ्यापर्यंत पोहोचली आणि स्वतःस वाचविणे आवश्यक झाले, तेव्हा तिने आपले पिलू आपल्या पायाखाली घेऊन नाकातोंडात पाणी जाण्यापासून स्वतःचा बचाव केला, अशी ती गोष्ट, राजकारणातील सध्याच्या घडामोडींशी बरेचसे साम्य दाखविते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशातील राजकारणात विरोधकांची अवस्था सध्या त्या पाण्याने भरलेल्या हौदातील माकडीणीसारखी झाली आहे की काय असे वाटण्याजोगे वातावरण राजकारणात पसरले आहे, आणि जे कोणी आपल्यासोबत आपल्या पिलांना वाचविण्याची धडपड करत होते त्यांना आता आपली पिले पायाखाली घेऊन आपले अस्तित्व वाचविण्याची धडपड करावी लागत आहे. ही कसरत अर्थातच, त्यांच्या त्यांच्या राजकीय अस्तित्वाची आहे. म्हणूनच, देशाच्या पातळीवर विरोधकांनी स्थापन केलेली इंडिया आघाडी असो किंवा महाराष्ट्रात ठाकरे, शरद पवार यांनी राज्याची सत्ता काबीज करण्यासाठी काँग्रेससोबत निर्माण केलेली महाविकास आघाडी असो, आता अखेरच्या घटका मोजू लागल्याने, सोबतच्या कोणास पायाखाली घेऊन आपले अस्तित्व वाचविण्याची धडपड सर्वत्र सुरू झाल्याचे स्पष्ट संकेत आता मिळू लागले आहेत. महाविकास आघाडीतील नेत्यांचा बदललेला सूर आणि राजकीय वर्तणुकीत आलेला मवाळपणा हे त्याचे मुख्य लक्षण आहे. अन्यथा, कालपरवापर्यंत विरोधकांच्या महाविकास आघाडीतून फुटणारे फटाके आणि सकाळ-संध्याकाळी वाजणारे भोंगे अचानक शांत झाले नसते. विधानसभा निवडणुकीत दणकून पराभव झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात परिवर्तनाचे हे पर्व सुरू झाल्याने, महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत निर्माण झालेला गढूळपणा संपून आता पाणी नितळ होऊ लागले आहे असे म्हणता येईल. म्हणूनच या परिवर्तनाचे संपूर्ण श्रेय खरे तर राज्यातील मतदारांस द्यावयास हवे. पण तितकाच वाटा सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही आहे. प्रचंड बहुमताने राज्याची सत्ता संपादन केल्यानंतर त्यांनी घेतलेली समंजस भूमिका या परिवर्तनास साह्यभूत ठरली आहे, तर मतदारांनी जागा दाखवून दिल्यामुळे राजकीय अस्तित्व पणाला लागलेल्या विरोधकांस आता आपापली पिले पायाखाली घेऊन आपला बचाव करण्याची वेळ आली आहे. विरोधकांच्या गटातील मातब्बर नेत्यांचा बदललेला सूर आणि त्यांना अचानक होऊ लागलेली राज्याच्या राजकीय संस्कृतीची आठवण हे पाहता, या बदलाचा प्रवास मोठा रंजक म्हणावा लागेल. त्याचा लहानसा आढावा घेताना काहीसे मागे वळून पाहिले, तर हा प्रवास केवळ बदलाचा प्रवास नसून, ‘बदल्याकडून बदलाकडे’ असा सकारात्मक आहे असे म्हणता येईल. महाराष्ट्रातील गढूळ राजकीय वातावरण बदलण्यास आणि सत्ताधारी व विरोधक यांनी सामंजस्याने एकमेकांस



सहकार्य करून राज्याच्या हितास प्राधान्य देण्यास हा बदल उपयुक्त ठरणार असल्याने बदलाचे हे पर्व महत्त्वाचे ठरणार आहे.

द्वेषाच्या आणि बदल्याच्या या राजकारणाची बीजे महाविकास आघाडीच्या सत्ताकाळाच्याही अगोदरपासूनच राज्यात रुजू लागली होती, हे स्पष्ट आहे. त्याआधी पक्षप्रमुख असलेल्या उद्धव ठाकरे यांची अखंड शिवसेना भाजपासोबत सत्तेत सहभागी असूनही, विरोधकांहूनही अधिक प्रखर विरोधाची भूमिका सातत्याने घेत फडणवीस सरकारला अडचणीत आणण्याची कोणतीच संधी ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने सोडली नव्हती. पुढे युतीचा कटोरा फेकून देण्याचे जाहीर केल्यानंतर ठाकरे यांचा भाजपाविरोधाचा सूर तर थेट नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यापर्यंत पोहोचला. ‘सामना’ या शिवसेनेच्या मुखपत्रातून मोदी-शाह यांच्यावर प्रखर हल्ले चढविले जाऊ लागले. राऊत यांनी तर, भाजपाच्या नेत्यांना जाहीरपणे ‘ऑन रेकॉर्ड’ शिवीगाळ केल्याच्या ध्वनिफितीदेखील महाराष्ट्राने ऐकल्या आहेत. सत्ता प्राप्त होताच उद्धव ठाकरे यांच्या फडणवीस द्वेषात बदल्याचे सावटही उमटू लागले. हा द्वेष एवढा पराकोटीचा होता, की फडणवीस यांच्या विरोधात तो व्यक्त करताना, सभास्थानी टरबूज ठेवून खिल्ली उडविण्याचा प्रकारही महाराष्ट्राने त्या काळी एकदा अनुभवला. २०२२ मध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना पार पडलेल्या विधान परिषद व राज्यसभेच्या निवडणुका आजही महाराष्ट्राच्या आठवणीत असतील. तेव्हा तर फडणवीस विरोधाची धार थेट विधान भवनाच्या परिसरात उमटली होती. आत मतदान सुरू असताना हे विरोधक बाहेर अक्षरशः टरबुजे फोडत होते. त्यामुळे आत मते फुटत असल्याची दखल घेण्याचे भानदेखील या विरोधकांस राहिले नाही. यानंतरच शिवसेनेतील ठाकरेविरोधी नाराजी चव्हाट्यावर येऊ लागली होती. तेव्हाचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्याबाबत उद्धव ठाकरे यांना सावधही केले होते, पण मुख्यमंत्रिपदावर असलेल्या ठाकरे यांनी त्याकडे गांभीर्याने पाहिले नाही, असे अजितदादाच म्हणाले होते. देवेंद्र फडणवीस यांची खिल्ली उडविताना महाराष्ट्राच्या राजकीय सभ्यतेच्या संस्कृतीचा ठाकरे गटास विसर पडल्यासारखे वाटण्याजोग्या अशा अनेक घटना त्या काळी घडत असताना फडणवीस यांनी मात्र त्यावर तसेच पलटवार न करण्याचा समंजसपणा दाखविला होता. सत्ता असताना फडणवीस यांना तर तुरुंगात डांबण्याचा कटदेखील मविआमध्ये शिजला होता, असा गौप्यस्फोट पुढे मुख्यमंत्री झाल्यानंतर खुद्द एकनाथ शिंदे यांनीच केला होता. फडणवीस यांची फडतूस म्हणून खिल्ली उडविणारे, एक तर तू राहशील नाही तर मी अशा शब्दांत राजकीय आव्हान देणारे आणि पक्षफुटीसाठी भाजपाला जबाबदार धरून यथेच्छ टीका करणारे उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर मात्र सूर बदलला आणि त्यांचे प्रवक्ते असलेले राऊत यांना राजकीय संस्कृतीचे भानदेखील आले. हा पराभवानंतरच्या अस्तित्वभयाचाच परिणाम म्हणावा लागेल. फडणवीस हे राजकारणातले कच्चे मडके असून कॉपी करून पास होणाऱ्या मुलासारखे आहेत, अशी टीका अगदी काही महिन्यांपूर्वी करणाऱ्या संजय राऊत यांना आता फडणवीस यांच्या परिपक्वतेचा साक्षात्कार व्हावा आणि त्यांनी जाहीरपणे तशी कबुलीही द्यावी, हा कशाचा संकेत मानावा? विधानसभेत विरोधी पक्षनेतेपद मिळेल एवढेही संख्याबळ महाविकास आघाडीला एकत्रितपणे गाठता आले नाही, त्यामुळे या पदाची चिंता सुरू झालेली असताना उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली, त्यांचे अभिनंदन केले तेव्हाची प्रसिद्ध झालेली छायाचित्रे बदल्याकडून बदलाकडचा प्रवास स्पष्ट करण्यासाठी पुरेशी बोलकी आहेत. याच भेटीत, झाले गेले विसरून जा, असे साकडेही ठाकरे यांनी फडणवीस यांना घातल्याच्या बातम्यादेखील त्या भेटीनंतर काही माध्यमांत प्रसिद्ध झाल्या होत्या. परिवर्तनाचे हे पर्व एवढ्या वेगाने पूर्वपदावर आले, त्यामागेही अस्तित्वाचा मुद्दा असावा, अशी चर्चा त्यानंतर सुरू झाली. कारण शिल्लक राहिलेल्या ठाकरे गटातूनही गळती थांबली नव्हती. शिवसेनेची खरी मालकी कोणाकडे या वादावरून एकनाथ शिंदे यांच्या गटास गद्दार म्हणून हिणविताना, जनतेच्या न्यायालयात याचा निवाडा होणार असल्याचा दावा करणाऱ्या ठाकरे यांना निवडणुकीच्या निकालानंतर बसलेला जोरदार राजकीय धक्का हेदेखील परिवर्तनाचे कारण म्हणता येईल. अशा अनेक कारणांतून राजकीय अस्तित्व टिकविण्याच्या भयाचे अंधुकसे दर्शन घडतच गेले असले तरी वर्तमान राजकारणात जे काही घडत आहे, ते महाराष्ट्रातील भविष्यकालीन राजकारणास सकारात्मक दिशा देणारे ठरत आहे, ही समाधानाची बाब म्हणावी लागेल.

महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांची एकमेकांशी वागण्याची एक सुसंस्कृत नीती होती. एकमेकांवर राजकीय आरोप-प्रत्यारोप होत असतानाही सभ्यतेचे संकेत कोणी सोडले नव्हते. बाळासाहेब ठाकरे शरद पवारांना मैद्याचे पोते म्हणायचे आणि पवार हेदेखील बाळासाहेबांना हिंदू खोमेनी म्हणायचे. पण त्यांच्या टीकेत द्वेषभावना उमटलेली महाराष्ट्राने अनुभवली नाही. बाळासाहेबांनी अण्णा हजारेंवरही टीका केली, पण त्यामध्ये निखळ विनोद होता. ती सभ्यता आणि ती संस्कृती मविआच्या सत्ताकाळात रसातळाला गेली, तेव्हाही आपण सभ्यता सोडत आहोत असे कोणास वाटले नाही. हा बदल एवढा विचित्र होता, की सत्ता गेल्यानंतरही मविआच्या नेत्यांकडून फडणवीस यांच्यावर व्यक्तिगत आणि भाजपाच्या अन्य नेत्यांवर असभ्य टीका होत राहिली. जाणते नेते म्हणविणारे शरद पवारदेखील या मोहात गुरफटले होते. समृद्धी महामार्गावरील एका भीषण अपघातानंतर त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेनंतर तर त्यांच्या प्रदीर्घ राजकीय अनुभवावर आणि संस्कारावरही अनेक प्रश्नचिन्हे उमटली होती. अर्ध्या चड्डीवाल्यांच्या हातात देशाची सूत्रे देणार का, असा सवाल संघाचे प्राबल्य असलेल्या ठाणे परिसरातील परांजपे यांच्या जाहीर सभेत करणाऱ्या शरद पवार यांना पक्षाच्या आढावा बैठकीत संघाच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीचे कौतुक करण्याची वेळ यावी हादेखील अस्तित्वभयाचाच परिणाम असावा.

गेल्या काही दिवसांत संस्कृतीची पावले सभ्यतेच्या मूळ वाटेवर येताना दिसू लागली आहेत. शरद पवार संघाचे कौतुक करतात, अकेला देवेंद्र क्या करेगा म्हणत फडणवीस यांच्या क्षमतेवर बोट ठेवणाऱ्या सुप्रिया सुळे यांना फडणवीस यांच्या क्षमतेचे कौतुक करावेसे वाटते, फडणवीस यांच्यावर सातत्याने टीका करणारे संजय राऊतदेखील सूर बदलतात आणि फडणवीस यांचे कौतुक का करू नये, असा प्रतिसवालच माध्यमांना करतात, विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडप्रसंगी आणि नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीवर बहिष्कार घालून असहकाराच्या धोरणाचे संकेत देणारे आदित्य ठाकरे मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सहकार्याची ग्वाही देऊ लागतात, हे सारे बदलत्या परिवर्तनाचे नवे वारे आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांच्या कार्यशैलीची चुणूक दिसू लागल्याने हा बदल स्वीकारणे विरोधकांस भाग पडले असावे. अगोदरच्या विधान परिषद निवडणुका, त्यासोबत झालेल्या राज्यसभा निवडणुका आणि अलिकडेच झालेल्या विधानसभा निवडणुकीत फडणवीस यांनी विरोधकांना आपल्या राजकीय कौशल्याचे दर्शन घडविल्यानंतर हा बदल दिसू लागला असला, तरी फडणवीस मात्र, आपल्या संयमी राजकारणाशी प्रामाणिक आहेत असे दिसते. सत्ता नसताना ज्यांनी आपल्याला असभ्य वागणूक दिली, असभ्य टीका केली, खिल्ली उडविली आणि आपल्याविरोधात कारस्थाने केली, त्यांना माफ करण्याची ग्वाही फडणवीस यांनी दिली आहे. परिवर्तनाच्या नव्या पर्वासाठी हा एक शुभशकुन म्हणावा लागेल. ज्यांनी बदला घेण्याच्या भावनेने हल्ले चढविले, त्यांनाच सोबत घेऊन महाराष्ट्रात बदल घडविण्याचा त्यांचा इरादा स्तुत्य मानावा लागेल. विरोधकांच्या अस्तित्वाच्या भयाने का होईना, महाराष्ट्राची राजकीय संस्कृती पुन्हा सभ्यतेच्या आणि सुसंस्कृततेच्या वळणावर येत आहे, ही राज्याच्या दृष्टीने हिताचीच बाब आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### भारतीय क्रिकेट संघ आणि पराभवाची मालिका

सलग मालिका पराभवामुळे आणि आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद २०२४-२५ शर्यतीतून बाहेर पडल्यामुळे भारतीय चाहत्यांची खूप निराशा झाली. तत्पूर्वी न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या मालिकेत अनपेक्षित पराभव खेळाडूंच्या मनात संशय निर्माण करून आत्मविश्वास कमी करून गेला अन् ऑस्ट्रेलियात त्यावर शिक्कामोर्तब झाले. फलंदाजांनी धावा करण्याऐवजी विकेट वाचवण्याचा प्रयत्न केला. फलंदाजांच्या बचावात आत्मविश्वास नव्हता. आपल्या खेळाडूंकडे असणाऱ्या तंत्राचा वापर अन् लढण्याच्या रणनीतीचा अभाव दिसून आला. फलंदाजीसाठी निर्णायक आणि प्रतिकूल परिस्थिती असताना संयम आणि नांगर टाकण्याच्या भूमिकेचा अभाव. सलामीवीर अन् मध्यम क्रमाच्या फलंदाजांच्या अपयशाची किंमत संघाला मोजावी लागली. एकापाठोपाठ गडी बाद होण्याचा परिणाम संघ कोसळला. दबाव करण्यासाठी धावा थांबवणाऱ्या तिसऱ्या वेगवान गोलंदाजाची स्पष्ट कमतरता जाणवली. फिरकीपटूंना फारसे काही करता आले नाही कारण फिरकीपटूंना खेळपट्टीने मदत केली नाही. स्पिनर-फलंदाजांच्या बाबतीत गोलंदाजी अष्टपैलूंचा चुकीचा समावेश. अत्यंत महत्त्वाच्या मालिकेदरम्यान दिग्गज रविचंद्रन अश्विनची अचानक निवृत्तीची घोषणा. पहिल्या कसोटीत बुमराहच्या नेतृत्वाखाली नियमित कर्णधाराच्या अनुपस्थितीत मोठ्या विजयाची नोंद केली. पण दुसऱ्या कसोटी सामन्यात रोहितने कर्णधारपद सांभाळले पण कर्णधार बदलल्यामुळे मालिकेत संघ आणि कर्णधार म्हणून रोहित यांत नेतृत्व संवाद खंडित झाला. रोहितने दुसऱ्या कसोटीतून संघात प्रवेश केला पण सातत्याने धावा बनवण्यात अपयश आल्यामुळे पाचवी कसोटी निवडीतून स्वतःला वगळले. यशस्वी जयस्वाल आणि विराटने पहिल्या कसोटीत दुसऱ्या डावात शतके झळकावली म्हणूनच आपण पहिला सामना जिंकला. त्यानंतर भारतीय संघाने केवळ चौथ्या कसोटीत चांगली कामगिरी केली कारण युवा अष्टपैलू नितीश रेड्डीने पहिले शतक झळकावले. फलंदाजीत प्रथमच ऑस्ट्रेलियात खेळणाऱ्या यशस्वी जयस्वाल, अष्टपैलू नवखा नितीश रेड्डी अन् गोलंदाजीत विशेषतः बुमराह, सिराज यांनी चांगली कामगिरी केली पण यांच्या व्यतिरिक्त एकाही खेळाडूची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. मुख्यतः रोहित, विराट अपयशी ठरले. म्हणूनच संघाचा दारुण पराभव झाला. निवड समितीकडून ऑस्ट्रेलिया खेळपट्ट्या लक्षात ठेवून खेळाडूंची योग्य निवड करणं अपेक्षित होते. प्रशिक्षक समूहावरही प्रश्न निर्माण झाले आहेत. कारण फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाची योजना रणनीती तयार करण्यात कमी पडले. आता सहा महिन्यांनी इंग्लंडचा दौरा आहे. आता अपयशी खेळाडू रणजी सामने खेळतात की नाही याकडे लक्ष असेल.

**गणेश धर्माजी शेवते**/९०९६१५२९४९

### महिला संरक्षण कायदे संरक्षणासाठीच

आपल्या भारत देशात भारताला आपण भारत माता असे म्हणतो. संपूर्ण जगामध्ये असा एकमेव देश आहे की ज्याला गर्वाने भारत माता असे संबोधले जाते. तर या देशात लढवय्या अनेक माता होऊन गेल्या आहेत. महापुरुषांच्या तोडीस तोड महिलांनी राजकीय, सामाजिक काम करून गेल्या आणि लोकशाहीत पंतप्रधान, राष्ट्रपती झाल्या. देश स्वतंत्र झाल्यानंतर महिलांना संरक्षण मिळावे म्हणून अनेक कायदे सरकारकडून तयार केले गेले आणि महिलांना संरक्षण कवच दिले गेले. तसेच महिलांना अजून जास्त संरक्षण मिळावे म्हणून डोमेस्टिक व्हायोलेशन कायदा २००५ साली पारित केला. हा सगळा ऊहापोह करण्याचा उद्देश एकच आहे की आपल्या देशात महिलांकडे अजूनही अबला नारी म्हणून पहिले जाते. वास्तविक पाहता आज महिला सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहेत.

पण आता महिला अबला नसून सबला झालेल्या आहेत. काही ठिकाणी महिलांना सुरक्षितता मिळावी म्हणून अनेक कायद्याची ढाल दिली आहे. कारण कोणालाही वाटते की आपल्या घरातील महिला भगिनी सुरक्षित राहिली पाहिजे. महिलांनी स्वतःच्या इच्छेप्रमाणे जीवन जगण्याचे वावगे काहीच नाही. पण काही महिला लग्नानंतर सासू-सासरे यांना कमी समजायला लागल्या आहेत. आणि लगेच पतीला घेऊन वेगळे राहायला लागल्या. त्यामुळे घराचे घरपण नाहीसे झाले. मग संसारात भांडण तंटा यात वाढ होऊन प्रकरणे घराचे उंबरठे ओलांडून न्यायालयात आणि पोलिस स्टेशनला जायला लागली. लग्नानंतर चार पाच महिने सुद्धा संसार वादाचा होऊ लागल्याने अनेक जण घटस्फोट घेण्यासाठी न्यायालयात गेले आहेत. या सगळ्या गोष्टी पाहता एक गोष्ट निश्चित लक्षात येते की तडजोड करायला कुणीच तयार नाही. काहीवेळा प्रकरण न्यायालयात जाते. महिलांसाठी सामाजिक काम करणाऱ्या काही चांगल्या संघटना योग्य मार्गदर्शन करतात आणि तुटणारा संसार जोडण्याचा प्रयत्नही करतात. ही खरोखरच चांगली बाब आहे. परंतु काही संघटना विनाकारण महिला भगिनींना भडकविण्याचे काम करतात. खरे तर पती-पत्नीच्या भांडणात बिचाऱ्या लहान मुलांचे खूपच हाल होत असतात.

जर कायदा सगळ्यांना समान असेल तर पोलिस प्रशासन यांनी महिला व पुरुष असा दुजाभाव का करावा हाच प्रश्न निर्माण झाला आहे. आतापर्यंत महिलांनी सासू-सासरे आणि नवरा यांचे विरुद्ध दाखल केलेल्या गुन्ह्याहत शिक्षा झाल्याचे प्रमाण सुद्धा फारच कमी आहे. याचाच अर्थ असा आहे की काही महिला विनाकारण सासू-सासरे आणि नवरा यांना त्रास देण्यासाठी तक्रारी दाखल करतात आणि कायद्याचा गैरवापर करतात. काही ठिकाणी तर पुरुष वर्गाला ब्लॅकमेल करण्याचे प्रकार सुद्धा घडत असतात. आताच्या आधुनिक युगात काही मुलींच्या संसारात तिच्या आईचा हस्तक्षेप जास्त वाढत असल्याचे दिसते. एकंदरीतच महिला संरक्षणासाठी असलेल्या कायद्याचा वापर स्वतःच्या संरक्षणासाठी करायला पाहिजे. आणि त्याचा वापर इतरांना छळ होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### शाकंभरी देवी नवरात्रोत्सव

पौष महिन्यात काही ठिकाणी शुक्ल षष्ठी ते चतुर्दशी तर अन्य ठिकाणी पौष शुक्ल अष्टमी ते पौर्णिमा अशी शाकंभरी नवरात्र पूजेची प्रथा आहे . आश्विन नवरात्राचे कुळाचार व परंपरा यांची पुनरावृत्तीच असते. निर्गुण मूळ रूपाचे सगुणात्मक पूजन यात होते. सर्व पंचायतन देवतांमध्ये हिंदू संस्कृतीत देवीलाही मुख्यत्वेकरून प्राधान्य दिलेले आहे त्याचे या नवरात्रात दर्शन घडते. महाराष्ट्रातील काही देशस्थ ब्राह्मणांची ही कुलदेवता असून काही चांद्रसेनीय कायस्थ भक्त सुद्धा हे नवरात्र मोठ्या भक्तीने साजरे करतात. रायगडमधील मुरुड -जंजिरा येथील चिटणीस -गुप्ते कुटुंबीय आणि त्यांचे सगेसोयरे हा उत्सव जवळजवळ साडेतीनशे वर्षांपासून अविरत करताना दिसतात. देशी परदेशी असलेले कुटुंबीयसुद्धा अनेकदा देवीच्या उत्सव सोहळ्यात आनंदाने भाग घेतात हा कौतुकास्पद आणि श्रद्धेचा विषय ठरतो. या देवीला बनशंकरी असेही म्हणतात. या देवीचे मोठे मंदिर बदामी येथे संस्थानाच्या स्वरूपात बघायला मिळते. दुर्गम नावाच्या दैत्याने घोर तपश्चर्या करून ब्रह्मदेवाकडून वेद मागवून घेतले. ब्राह्मणांना वेदांची विस्मृती झाली त्यामुळे होमहवनादी सर्व बंद होऊ लागले. अर्थात त्यामुळे पावसाचा अभाव होऊन पृथ्वी शुष्क झाली, धान्य फळांची निर्मिती बंद झाली आणि दुष्काळ पडला तेव्हा ब्राह्मणांनी व देवांनी निराहारी राहून भगवतीच्या प्रसन्नतेसाठी उपासना केली तेव्हा अनेक जीवांचा मृत्यू बघून भगवती जगदंबेला त्यांची दया आली आणि ती प्रसन्न झाली व तिने आपल्या अंगातून असंख्य शाक भाज्या उत्पन्न केल्या, पाऊस पडू लागला, परत सुबत्ता निर्माण झाली, दैत्यांचा पराभव झाला. भगवतीने भुकेलेल्यांना भाज्या खाऊ घातल्या. त्यामुळे ती जनता दुष्काळातून वाचली म्हणूनच या देवीला शाकंभरी हे नाव प्राप्त झाले. या देवीने कुमाऊं टेकडीवर (हरिद्वार - केदार रस्त्यावर) एक हजार वर्ष केवळ शाकभाज्या खाऊन तपश्चर्या केली याचा संदर्भ महाभारताच्या वनपर्वात व पद्म पुराणात आढळतो. शाकंभरी सर्वच जातींची देवी आहे. ही देवी कुमारी आहे म्हणूनच नऊ कुमारिकांचे पूजन याही नवरात्रात करण्याची विशेष धार्मिक प्रथा आहे. नवरात्री समापनाच्या दिवशी होमहवन, बलिदान (कोहळ्याचे - शाकाहारी ), पूर्णाहुती करण्याची अनेक कुटुंबांमध्ये प्रथा प्रचलित आहे. म्हणूनच कर्म इतके चांगले करावे आणि पुण्य जमवावे की ते शेवटी आपल्याला पेलेल याची जाणीव ठेवूनच असावे अशा भावनेतून हा उत्सव साजरा होत असतो.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला!

मकर ही एक रास असून सूर्य मकर राशीत प्रवेश करतो त्या प्रक्रियेला संक्रांत म्हणतात. मकर संक्रांतीला तिळ आणि गूळ यांचे मिश्रणातून केलेले पदार्थच का? तर तिळ हे उष्ण आणि स्निग्ध असतात. थंडीत शरीराला उष्णता आणि स्निग्धतेची आवश्यकता असते. तसेच मुळातही उष्णता असल्याने या पदार्थाचे महत्त्व आहे. भूतकाळात झालेल्या कडू आठवणींना विसरून त्यात तिळ आणि गूळ यांचा गोडवा भरायचा असे म्हंटले जाते. संक्रांत हा सण भारतातच साजरा होतो असे नाही तर आशिया खंडातील अनेक ठिकाणी तो साजरा केला जातो. नेपाळमध्ये याला माघी किंवा माघी संक्रांत, थायलंडमध्ये सोन्क्रांत, लाओसमध्ये पी मा लाओ आणि म्यानमारमध्ये थिंगयान असे म्हंटले जाते. भारतात पण याला लोहरी, पोंगल अशी नावे आहेत. गुजरात आणि राजस्थान येथे तर पतंगाचा सण म्हणून ओळखले जाते. यामागे करमणूक हा उद्देश असला तरीही पतंग सकाळी उठून उडविल्याने शरीराला उन लागून भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन डी मिळते.

पण खरे वेध लागले असतात ते आदल्या दिवशीच्या भोगीचे, तिळ लावून केलेल्या बाजरीच्या भाकरीचे, सर्व भाज्या एकत्र करून केलेल्या भाजीचे आणि संक्रांतीच्या तिळगुळाचे. संक्रांतीच्या २-३ दिवस आधी घराघरातून तिळ भाजताना खमंग येणाऱ्या सुगंधाने संपूर्ण घर दरवळते. नवविवाहित दाम्पत्याचा तिळवा करण्यात येतो तसेच बाळाची लूट मुरमुरे, बोरं, वाटण्याच्या शेंगा, चॉकलेट बिस्किटे असे मिश्रण डोक्यावर घालून लूट करतात. नव्या नवरीचे हलव्याचे दागिने घालून काढलेला फोटो नंतर किती वर्ष करमणूक करतो. घरोघरी होणाऱ्या हळदीकुंकवामुळे तिळगुळाबरोबरच सकारात्मक ऊर्जा मिळते आणि वर्षभर पुरते.फक्त संक्रांत आहे म्हणन तात्पुरते ठरवून गोड बोलायचे म्हटले तर किती कठीण होऊन बसेल. जे सहज जन्माला येते ते खरं तर किती सोपं असेल पण सहज बोलणं जगणं सोपं नाही. आपण ते अवघड करून ठेवलं आहे का? ‘सहज फुलू द्यावे फुल, सहज दरवळावा गंध,’ या शांताबाई शेळकेंनी माणसाला उद्देशून म्हटलेल्या ओळी किती समर्पक आहेत... दान, वाण, प्रीती, रीती, मान या गोष्टी सहज व्हाव्यात. फुलणाऱ्या फुलासारख्या आणि नंतर दरवळणाऱ्या सुगंधासारख्या, फारसा गाजावाजा न करता.

ओठावरी राहो नित्य उत्साहाचे गान,<br>
तिळगूळाच्या गोडव्याने नित्य<br>
लाभो तुम्हाला स्नेहभाव दृढतेचे वाण.....

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## प्रासंगिक

प्रमोद मुजुमदार

# रामलला प्राणप्रतिष्ठेची तिथीनुसार वर्षपूर्ती

अयोध्या येथे रामललाच्या मूर्तीची गेल्या वर्षी अर्थात पौष शुक्ल द्वादशी म्हणजे २२ जानेवारी २०२४ रोजी प्राणप्रतिष्ठा विधिवत झाल्यानंतर आता त्या सोहळ्याला एक वर्ष पूर्ण होत आहे. तेव्हापासून सतत अयोध्या आणि नवपुनर्निर्मित राम मंदिराची चर्चा सर्व प्रकारच्या माध्यमातून होत आहे, वाचनांतही येत आहे. पूर्वी होत नव्हती का? तर असे नाही, परंतु अलिकडे ती जरा जास्तच होत आहे आणि त्याला राजकीय नजरेतून पाहिले जात आहे. आज त्रेता युगातील कथा-कहाण्या सांगण्याची आवश्यकता नाही. कारण हिंदूच्या धार्मिक पूजास्थळांवर परकीय शत्रू अर्थातच मुस्लिमांनी देवी-देवतांचा अपमान करून देवस्थाने नष्ट केली.

गत इतिहासाकडे पाहता प्रामुख्याने अयोध्या येथील प्रभू श्रीरामांचे जन्मस्थान समूळ नष्ट करून तेथे वादग्रस्त ढांचा बांधण्यात आला. श्रीरामांचे जन्मस्थान परत मिळावे यासाठी देशव्यापी प्रचंड आंदोलने झाली, न्यायालयातही दाद मागण्यासाठी कायदेशीर लढा लढला गेला आणि स्वतंत्र भारताच्या इतिहासात ही संघर्षाची एक महत्त्वपूर्ण नोंद झाली. आश्चर्य असे की, कायदेशीर लढ्यामध्ये श्रीरामांच्या अस्तित्वाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले होते. असा प्रश्न निर्माण करणारे तत्कालीन काँग्रेस पक्षाचे खासदार सुप्रसिद्ध वकील कपिल सिब्बल होते, हे आपल्या हिंदू समाजाचे दुर्दैव. एकीकडे कायदेशीर मार्गाने न्यायालयांत तर दुसरीकडे रस्त्यारस्त्यांवर हिंदू समाजातील सर्व जाती, धर्म, पंथ, संप्रदाय, भाषा, आपापले भेदाभेद विसरून संघटितपणे रामजन्मभूमीसाठी संघर्षरत होते. वेळोवेळी तत्कालीन केंद्र आणि राज्य सरकारांचे लक्ष वेधण्यासाठी विरोध प्रदर्शन, रामरथ यात्रा, एकात्मता यात्रा, अयोध्येमध्ये कारसेवा व जेल भरो अशी विविध मार्गांनी आंदोलने करण्यात आली. यात अर्थात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनात विश्व हिंदू परिषद आणि भारतीय जनता पक्षासह अन्य समविचारी संस्था-संघटनांचा प्रत्यक्ष सक्रिय सहभाग होता, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. न्यायालयामध्ये कायदेशीर लढाईचे शेवटी सर्वोच्च न्यायालयांत जवळपास ४० दिवस दररोज नियमित सुनावणी होऊन अखेर ९ नोव्हेंबर २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने रामजन्मभूमी अर्थात रामललाच्या बाजूने आपला निकाल दिला.



न्यायालयाच्या निकालाप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अयोध्येत मंदिर बांधण्यासाठी एक न्यास स्थापित केला आणि त्याद्वारे मंदिर निर्माणाचे कार्य अतिशय वेगाने सुरू झाले. गेल्या २२ जानेवारी २०२४ रोजी रामजन्मभूमीवर पुनर्निर्मित मंदिरामध्ये रामलला मूर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत संपन्न झाली. आता या मंदिराच्या परकोटा परिसरात एकूण १८ मंदिरे बांधली जात आहेत. सध्या हे बांधकाम प्रगतिपथावर आहे. यामध्ये दशावतार, शेषावतार, निषादराज, शबरी, अहल्या, संत तुलसीदास, शिव, सूर्य, मां दुर्गा, अन्नपूर्णा, श्रीगणेश, हनुमान आदी मंदिरांचा समावेश आहे. मंदिर निर्माण समितीचे प्रमुख नृपेन मिश्र यांचेनुसार हा मंदिर प्रकल्प जून २०२५ पर्यंत पूर्ण होईल, असा अंदाज आहे.

जन्मभूमी मुक्ती आंदोलनामुळे देशभर हिंदू समाजात नवचैतन्य जागृत करण्याचे काम तसेच संघटित राहिले तर सामूहिकपणे काय करू शकतो, हे देशवासीयांना समजले असे नाही तर या मुक्ती आंदोलनामध्ये प्रत्येक हिंदूचा प्रत्यक्ष सक्रिय सहभाग होता. प्रत्येक कामांत प्रत्येकाने उत्साहाने भाग घेतला, हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. यामागे निश्चितच प्रभू श्रीराम जन्मभूमीवर भव्य मंदिराचे पुनर्निर्माण आणि त्यासाठी गेली सुमारे ५०० वर्षांहून अधिक काळापासूनचा जो संघर्ष आणि नंतर विशेषत्वाने स्वतंत्र भारतात आपल्याच हिंदू समाजातील एका अर्थात काँग्रेस पक्षाच्या श्रीराम विरोधी मानसिकतेच्या विरोधात प्रत्यक्ष रस्त्यावर येऊन आणि न्यायालयात कायदेशीर लढा द्यावा लागला, हे दुर्दैव. परंतु यासाठी संघाने श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या आवाहनानुसार २०२४ मध्ये देशव्यापी गृहसंपर्क अभियान राबविले होते. यात सर्व प्रांतांच्या ५ लाख ७८ हजार ७७८ गावे, ४७२७ नगरांतील १९ कोटी ९८ लाख ४९ हजार ७१ परिवारांपर्यंत संपर्क साधला गेला. यामध्ये संघ स्वयंसेवकांसह ४४ लाख ९८ हजार ३३४ कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला होता. याबरोबर अयोध्या येथे प्राणप्रतिष्ठा समारोहाचे दिवशी म्हणजे २२ जानेवारी २०२४ रोजी संपूर्ण देशभर जवळपास ५ लाख ५९ हजार २३१ ठिकाणी ९ लाख ८५ हजार ६२५ कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले. या कार्यक्रमात २७ कोटी ८१ लाख ५४ हजार ६६५ रामभक्त प्रत्यक्ष सहभागी झाले होते. विविध मंदिरांसह सार्वजनिक ठिकाणी हे कार्यक्रम आयोजित होते. जी मंडळी आपल्या व्यक्तिगत कारणामुळे अथवा वयोमानपरत्वे अयोध्येत जाऊ शकत नव्हते ती सर्व मंडळी या कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सामील झाली होती. देशभर राममय वातावरण निर्माण झाले होते. हिंदू समाजाने आपल्या एकजूट, संघटनशक्तीचा परिचय संपूर्ण देशवासीयांना करून दिला आहे. ही संघटितशक्ती प्रभू श्रीरामांच्या प्रेरणेमुळेच आहे. हिंदू समाज आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा मुकाबला जसा सामूहिक संघटित शक्तीद्वारे करतो तर दुसरीकडे तो समाजातील अनिष्ट प्रथा, जातीय भेदाभेद दूर करण्यासाठी रचनात्मक कार्यात दीनदलित, पीडित, शोषित-वंचिताचे जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांच्या आरोग्याची काळजी, अन्य समाजघटकांबरोबर आणण्यासाठीदेखील सक्रिय भूमिका निभावत आहे, असे दृश्य पाहावयास मिळते. ‘संघटन में शक्ति है...’ याची प्रचीती दिसून येते. अयोध्या येथे तर घरोघरी प्रत्येकाने आपापल्या ठिकाणी मंदिरात, मठांमध्ये, धर्मशाळांमध्ये येणाऱ्या भाविकांसाठी भोजन, चहा-नाश्ता आदींची व्यवस्था केली होती. या कार्यात स्थानिक जैन, बौद्ध, शीख बांधवांचाही सिंहाचा वाटा होता.

राम मंदिर निर्मितीसोबतच आता संपूर्ण अयोध्या आणि आजूबाजूच्या परिसराचा सर्वांगीण विकास आणि त्यासंबंधी विविध प्रकल्प उत्तरप्रदेशच्या योगी सरकारने हाती घेतले आहेत. यात मुख्य रस्ता मार्ग रुंदीकरणासोबतच सुशोभीकरण, साफसफाई, स्वच्छता तसेच रेल्वे मार्ग आणि गाड्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर झाले आहे. अयोध्येचे रेल्वे स्टेशन पाहताना आपणाला जाणवेल की, आपण विमानतळावर आलो की काय? इतके चांगले अत्याधुनिक रेल्वे स्टेशन बांधले असून नवीन विमानतळही बांधण्यात आले आहे. त्याचे ‘महर्षी वाल्मीकि आंतरराष्ट्रीय विमानतळ’ असे नामकरण करण्यात आले. अयोध्या विमानतळ हे देशभरातील प्रमुख मोठ्या महानगरांशी जोडले गेले असून विमान प्रवासी सरळ राम दर्शनाला अयोध्येत येऊ शकतात. दिवसागणिक श्रीराम मंदिर दर्शनाला येणाऱ्या भाविकांची संख्या दररोज लाखोंच्या संख्येत असून आतापर्यत सुमारे साडेचार ते पाच कोटींच्या घरात गेली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

यावर्षी २०२५ मध्ये प्रयागराजला महाकुंभ असल्याने वाराणसी व अयोध्या येथे येणाऱ्या तीर्थयात्रेकरूंची ही संख्या निश्चितच वाढणार आहे. तीर्थक्षेत्र ट्रस्टने दर्शनार्थीसाठी अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक व वृद्धांसाठी व्हीलचेअरची निःशुल्क सोय असून आपले मौल्यवान किमती सामान सुरक्षित ठेवण्यासाठी लॉकरची सोय केली आहे. शिवाय तातडीच्या गरजेसाठी अपोलो हॉस्पिटल आणि आपातकालीन हॉस्पिटलही सुसज्ज करण्यात आले आहे. तीर्थयात्री आणि पर्यटकांची दररोजची वाढती संख्या लक्षात घेता हॉटेल, गेस्ट हाऊसचे नवीन बांधकामही सुरू झाले आहे. यात पंचतारांकित हॉटेलचाही समावेश आहे. सोबत टॅक्सी व्यवसाय वाढत आहे. परिणामतः राज्य सरकारच्या तिजोरीमध्ये जीएसटीच्या रूपाने अतिरिक्त कमाई होऊ लागली आहे. मंदिरासाठी दररोज मातीचे दिवे किंवा पणती यासाठी कुंभारांना काम मिळाले. प्रसाद-फुलांचा व्यवसायही वाढला आहे. मंदिराशेजारी दुकानदारांची रोजची विक्री वाढली आहे. श्रीराम मूर्तीला मोठी मागणी असल्याचे दिसून आले.

९८१११२०१७०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



**सोलापूर : मैत्र फौंडेशनच्या विशेष मित्रांसाठी पुण्यातील निवृत्त प्राध्यापक डॉ. रघुनाथ कुलकर्णी यांनी मारुती सुझुकी इको ही गाडी संस्थेला भेट दिली. गाडीच्या चाव्या सुपूर्द करताना डॉ. कुलकर्णी, मीनल कुलकर्णी, प्राध्यापक अशोक कांबळे उपस्थित होते. वाहनाची सोय झाल्याने आणखी विशेष मित्रांना 'मैत्र'मध्ये सामावून घेता येणार आहे.**

### अज्ञात कारणावरून महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. ११ जानेवारी -**
शहरातील भारतरत्न इंदिरा नगरात अज्ञात कारणावरून महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. नागमणी देविदास म्याकल (वय ५६, रा. भारतरत्न इंदिरा नगर, कुमठा नाका, सोलापूर) असे आत्महत्या करणाऱ्या महिलेचे नाव आहे. १० जानेवारी रोजी रात्री दहाच्या पूर्वी नागमणी म्याकल या महिलेने राहत्या घरातील पत्र्याच्या आडूस साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यावेळी नवरा देविदास म्याकल व शेजारी दिपक गायकवाड यांनी नागमणी यांना खाली उतरवून बेशुध्दावस्थेत सदर बझार पोलिस ठाण्यातील हवालदार जी ई काळे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. ध्रुव गायकवाड यांनी नागमणी यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर** - कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. सुनिल गणेश जतकर (वय ३४, रा. हुडको कॉलनी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १० जानेवारी रोजी रात्री सुनिल जतकर हा अशोक चौक येथून दुचाकीवरून अक्कलकोट रोडकडे जात होता. त्यावेळी शांती चौक येथील एस्सार पेट्रोल पंपापुढे दुचाकी समोर कुत्रा आडवा आल्याने त्यात दुचाकी स्लीप होऊन अपघात झाला. यामध्ये सुनिल जतकर जखमी झाल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### वर्गणीच्या कारणावरून दोघांना मारहाण

**सोलापूर** - वर्गण का देत नाही असे म्हणून दोघांना लोखंडी सळईने मारहाण करण्यात आली.बिस्मिल्ला इक्बाल बागवान (वय ४८) आणि यासिन इक्बाल बागवान (वय २५, रा. अशोक चौक मम ध्ये झोपडपट्टी, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ११ जानेवारी रोजी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास राहत्या घराजवळ बागवान यां वर्गणी का देत नाही असे म्हणून भैय्या धोत्रे व इतर ४ जणांनी लोखंडी सळई, लाकडाने, कायत्याने मारहाण करून जखमी केले. दोघांना जखमी अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### सिव्हीलमधील नर्स शॉक लागून जखमी

**सोलापूर** - सिव्हील हॉस्पीटलमधील बर्न वॉर्डमध्ये नर्स शॉक लागून जखमी झाली. संगिता गणेश कोंतम (वय ३४, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) असे जखमी नर्सचे नाव आहे. ११ जानेवारी रोजी दुपारी सिव्हील हॉस्पीटल येथील बर्न वॉर्डमध्ये स्टाफ रूममध्ये संगीता कोंतम या हात धुण्यास गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी नळाला हात लावल्यानंतर अचानक विजेचा करंट लागून त्या खाली पडून जखमी झाल्या. त्यांना लागलीच शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### रिक्षा पलटी होऊन दोघे जखमी

**सोलापूर** - कुत्रा आडवा आल्याने रिक्षा पलटी होऊन दोघे जखमी झाले.जमीर रशिद शेख (वय २६) आणि नसरीन मुस्तकिन शेख (वय २५, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ११ जानेवारी रोजी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास जमीर व नसरीन शेख हे दोघे रिक्षामधून कुंभारी येथून सोलापूरकडे येत होते. त्यावेळी नविन विडी घरकुलजवळील जमादार वस्ती जवळील पेट्रोल पंपाजवळ रिक्षा समोर कुत्रा आडवा आल्याने त्यात रिक्षा पलटी होऊन दोघे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### सोशल महाविद्यालयाच्या मिसबाह मेहरनी हीस बी.ए. उर्दूमध्ये सुवर्णपदक

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**
आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ केगाव येथे २० वा वार्षिक दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. सोलापूर सोशल आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स महाविद्यालयाच्या उर्दू विभागातील विद्यार्थी मिसबाह मेहर मुसा मन्सूर शेख याला महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आणि कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानूर यांच्या उपस्थितीत 'प्राध्यापक मोहम्मद हनिफ इस्माईल खरादी सुवर्णपदक' प्रदान करण्यात आला. यावर्षी या विद्यार्थिनीने बी.ए. उर्दूमध्ये सर्वाधिक गुण मिळवले. प्रा. मुहम्मद हनिफ इस्माईल खरादी यांच्या स्मरणार्थ हे सुवर्णपदक गेली अकरा वर्षे सातत्याने दिले जात आहे.

उर्दू विभागाने सुरुवातीपासून आतापर्यंत या पदकावर आपला दावा कायम ठेवला आहे. बी.ए. आणि एम. उर्दू विभागातील उर्दू विभागाने आतापर्यंत चौदा सुवर्णपदके मिळवून इतिहास रचला आहे. याशिवाय विभागातील चाळीस विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. तेवीस विद्यार्थ्यांनी उर्दूमध्ये नेट आणि सेट परीक्षा उत्तीर्ण केले आहेत आणि आतापर्यंत सहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. ची पदवी प्राप्त केली आहे. या विद्यार्थ्यांना उर्दू विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. म. शफी चोबदार, उर्दू विभागाचे उपविभागप्रमुख बी. ओ. चेरमन डॉ. गौस अहमद शेख यांच्या मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य ई.जा. तांबोळी व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# ...आणि ते अमर हुतात्मे झाले!

**हुतात्मा दिन : स्वातंत्र्यासाठीचा सोलापुरातील क्रांती समर !**

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**
सोलापूर शहराने पारतंत्र्यात ९ ते १२ मे १९३० दरम्यान चार दिवस स्वातंत्र्य अनुभवले. क्रांतिकारी असा लढा उभारला. ब्रिटिश अधिकाऱ्यांना अक्षरशः पळवून लावले. मंगळवार पेठ पोलीस चौकी आणि गोल चावडी कोर्टही जाळण्यात आले. इंग्लंडचे तख्त हादरल्याने सोलापुरात मार्शल लॉ पुकारला होता. अखेर क्रांतिकारी आंदोलन प्रकरणी दि.१२ जानेवारी १९३१ रोजी सोलापुरातील मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन या चार स्वातंत्र्य सेनानींना येरवडा तुरुंगात फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सोलापुरातील ते अमर हुतात्मे झाले. तोच १२ जानेवारी दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. यंदाच्या १२ जानेवारी २०२५ रोजी चार हुतात्म्यांना फाशी देण्याच्या घटनेला ९४ वर्ष पूर्ण झाली आहेत.

गुजरातच्या कारडी गावात महात्मा गांधी यांना दि.४ मे १९३० रोजी अटक झाल्याची बातमी सोलापुरात ५ मे १९३० रोजी रात्रीच्या सुमारास धडकली. यामुळे सोलापुरातील आंदोलन अधिक तीव्र आणि आक्रमक झाले होते. जिथे समुद्रकिनारा नसेल तेथील लोकांनी दारूबंदीचा प्रचार करावा. ताडीची झाडे काढून टाकावीत. या महात्मा गांधी



यांच्या आवाहनास सोलापुरात प्रतिसाद मिळाला होता आणि सोलापुरातील रूपा भवानी मंदिर परिसरात असलेल्या शिंदीच्या झाडांवर आंदोलकांनी लक्ष केंद्रित केले होते.

माहिती मिळताच ब्रिटिश पोलिसांनी नाकाबंदी केली. इन्स्पेक्टर नॅपेट यांनी तेथील पोलिसांच्या पथकाचे नेतृत्व केले होते. आंदोलकांच्या जमावाने दगडफेक केली. इन्स्पेक्टर नॅपेट यांनी गोळीबार केला. इतकेच नव्हे तर आंदोलकांना अटक केली. आंदोलकांना सोडण्याची पुन्हा आग्रही भूमिका घेण्यात आली.पकडलेल्यांची नावे लिहून घेऊन त्यांना सोडून द्या अशी मागणी मल्लप्पा धनशेट्टी यांनी केली. याच दरम्यान हातात तिरंगा झेंडा घेऊन युवक कार्यकर्ता शंकर शिवदारे हे कलेक्टर नाईट यांच्या दिशेने धावत आले. त्यामुळे कलेक्टर यांच्या जीवितास धोका असल्याचा अंदाज घेऊन सार्जंट हॉल यानी युवा कार्यकर्ता शंकर शिवदारे यांच्यावर गोळी झाडली. या घटनेत शंकर शिवदारे हे पहिला हुतात्मा ठरले.या घटनेमुळे जमाव अधिक संतप्त झाला होता.

### १२ जानेवारी रोजी दिली फाशीची शिक्षा

१२ जानेवारी १९३१ रोजी सकाळी ६ वाजता इंग्रजांनी सोलापुरातील मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन या चार स्वातंत्र्य सेनानींना येरवडा तुरुंगात फाशीची शिक्षा दिली. ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांच्या यात्रा काळातच संक्रांत सणा दरम्यान १२ जानेवारी रोजी फाशीची शिक्षा दिली. चार हुतात्म्यांचे मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात न देता इंग्रज सरकारने त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले. या घटनेची माहिती मिळताच सोलापूरच्या इतिहासात प्रथमच श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त निघणाऱ्या नंदीध्वजाची मिरवणूक रद्द करण्यात आली होती असे सांगण्यात येते. हाच दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो.

### चार हुतात्म्यांचे पुतळे देतात प्रेरणा

सोलापूर शहरात पार्क स्टेडियम जवळ सोलापुरातील मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन या चार हुतात्म्यांचे पुतळे आजही सर्वांना प्रेरणा देत आहेत. '' सरणावरती आज आमुची पेटतांच प्रेते ! उठतील त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते !! असा संदेश देत आहेत. या पुतळा परिसरात ''त्या'' प्रेरक काव्य पक्तिंची कोनशिला लावण्याचा विसर महापालिकेला पडला आहे. चार हुतात्मा पुतळा येथील भित्तीशिल्पांचा माहिती फलक लावण्याची गरज वर्तवली जात आहे.

जमावाने कलेक्टर नाईट यांच्या वाहनाला घेराव घातला. जमावातून बाहेर पडत असताना कलेक्टर नाईट यांनी अचानक पोलिसांना गोळीबार करण्याचा आदेश दिला. यामध्ये तीन जण धारातीर्थी पडले तर अनेकजण जखमी झाले होते. त्यातून सोलापूरकरांम ध्ये मोठा असंतोष निर्माण झाला. त्यानंतर संतप्त झालेल्या जमावाने जवळच्या मंगळवार पेठ पोलीस चौकीवर हल्ला चढवला. या पोलीस चौकीला आग लावली. यात दोन पोलिसांचा मृत्यू झाला. ९ ते १२ मे १९३० दरम्यान चार दिवस स्वातंत्र्य अनुभवले. जुन्या नगरपालिकेवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले होते. सोलापूर गिरण गावातील सुमारे पाच कापड गिरण्यांमधील हजारो कामगारांनी आंदोलनात सहभाग नोंदविला. अखेर इंग्रज सरकारने १२ मे रोजी रात्री मार्शल लॉ पुकारला. सोलापुरातील मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन या चार स्वातंत्र्य सेनानींना मंगळवार पेठ पोलीस चौकी जळीत प्रकरणी अटक करून येरवडा तुरुंगात रवानगी केली. उच्च न्यायालयात चार स्वातंत्र्य सेनानींना फाशीची शिक्षा सुनावली.

## भटक्या कुत्र्यांच्या तावडीत सापडलेल्या दुर्मिळ उदमांजराचा दुर्दैवी मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी**
भटक्या कुत्र्यांच्या तावडीत सापडलेल्या दुर्मिळ उदमांजराचा दुर्दैवी मृत्यू झाला.

८ जानेवारी रोजी सोलापूर शहरातील निराळे लगतच्या भागातील माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ, पुणे प्रणित महेश इंग्लीश स्कुलचे नविन इमारत बांधकामाचे काम चालु आहे. त्याठिकाणी बांधकाम करणाऱ्या बंगाली काम गारांना सकाळी उदमांजर दिसले व त्याठिकाणी दहा ते पंधरा मोकाट कुत्रे त्याला घेरून त्याच्यावर हल्ला करित होते. तेथील कामगारांनी कुत्र्यांना हुसकावुन लावून त्याचे प्राण वाचविले, तरी कुत्र्याच्या हल्ल्यात ते उदमांजर थोडे जखमी होऊन भयभित झाले होते व स्वतः चा बचाव करण्यासाठी बांधकाम साहित्याच्या ढीगाआड दडून बसले होते.

ही घटना वन्यजीवप्रेमी बाळासाहेब शिवशरण यांना समजल्यानंतर त्यांनी तात्काळ वाईल्डलाईफ कॉंझर्वे शन असोसिएशनचे अध्यक्ष अजित चौहान यांना कळविले. चौहान यांनी तात्काळ सोलापुर वनविभागाला कळवून रेस्क्यू व्हॅन बोलावून घेतली. अथक परिश्रमानांतर जखमी उदमांजराला पिंजऱ्यात बंद करण्यात यश आले. या रेस्क्यु कार्यात वन विभागाचे प्रवीण जेऊरे, गणेश निरवणे यांनी सहभाग घेतला. या उदमांजराला पुढील वैद्यकीय उपचारासाठी वनविभागाच्या ट्रांझिट ट्रीटमेंट सेंटरमध्ये दाखल करण्यात आले होते, परंतु त्याच्या पूर्ण शरीरावर कुत्र्यांनी चावा घेतल्याने झालेल्या जखमांमुळे, उपचाराचे प्रयत्न करून सुद्धा शुक्रवारी त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे वनविभागातर्फे कळविण्यात आले.

सोलापूर शहर व परिसरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून यावर कुणाचाच अंकुश राहिलेला नाही. या कुत्र्यांमुळे नागरिकांसोबतच वन्यजीवांच्या जीवलाही धोका निर्माण झाला असून या भटक्या कुत्र्यांचा महापालिका प्रशासन अथवा संबंधित विभागाने त्वरित बंदोबस्त करावा अशी मागणी वन्यजीवप्रेमी व नागरिकांची आहे.

## विद्या हराळे-लांबतुरे यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सातारा, दि. ११ जानेवारी-**
आविष्कार सोशल अँड एज्युकेशन फौंडेशनतर्फे शिरवळ, सातारा येथे दि. ५ जानेवारी २०२५ रोजी प्रमुख पाहुणे केनिया देशाचे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन धावपटू सुवर्णपदक विजेते केनिथ किर्तीजी यांच्या शुभहस्ते आणि संजय पवार, संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, आविष्कार फौंडेशन, सचिव पी.एस. पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सोलापुरातील यमाईदेवी आश्रम शाळेतील शिक्षिका विद्या हराळे -लांबतुरे यांना राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नितीन भरगुडे पाटील, उपाध्यक्ष जिल्हा परिषद सातारा यांनी भूषविले. प्रास्ताविक श्रीमती सुनीता केदार यांनी केले. विद्या हराळे-लांबतुरे या यमाईदेवी आश्रमशाळा, मार्डी, (ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर) येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. विद्या हराळे-लांबतुरे यांना यापूर्वी सन २०२४ मध्ये गुणवंत शिक्षिका पुरस्कार मिळालेला आहे. या कार्यक्रम ाप्रसंगी स्वप्नशील लांबतुरे, कामाजी हराळे, छबुताई हराळे, महेश कारंडे आणि शिक्षकवर्ग उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंदांचे विचार आजही मार्गदर्शक : डॉ. येळेगावकर

**सोलापूर, दि. ११ जानेवारी,**
प्रत्येकाने आपल्या धर्मतत्त्वांचे पालन करीत असताना मानवता हा धर्म प्रमाण मानून इतर धर्मांचा आदर केल्यास दहशतवादाच्या, हिंसाचाराच्या, धार्मिक उन्म ादाच्या वातावरणात जगात शांतता नांदू शकते. विश्व संस्कृती निर्माण होऊ शकते हे विवेकानंदांचे विचार आजही जगाला मार्गदर्शक व उपयुक्त ठरू शकतात, असे प्रतिपादन हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष तथा फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शकडॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.



ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, श्री. बृहन्मठ होटगी शिक्षण संस्था संचलित एसव्हीसीएस अध्यापक विद्यालय व निर्माण बहुउद्देशीय विकास संस्था, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस.व्ही.सी.एस. बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजशेखर हिरेमठ हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रमाता माँ. जिजाऊ, स्वामी विवेकानंद व चार हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्री.बृहन्मठ होटगी शिक्षण संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे, एस.व्ही.सी.एस. अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्य लक्ष्मी पाटील, निर्माण बहुद्देशीय संस्थेच्या अधिकारी नम्रता खरात-नरोटे, अनिकेत नरोटे, फॅमिली प्लॅनिंगचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, मल्लिकार्जुन चिवडशेट्टी, प्रा. एस. ए. शेख, प्रा. बी.जी. कटगिरी, प्रा. अंजुम नदाफ, प्रा. यु.एन. महाजन, प्रा. एस. जी. चव्हाण, प्रा. पी. जी. राजमाने आदी उपस्थित होते. स्वागत प्राचार्य लक्ष्मी पाटील यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन राजशेखर स्वामी व काजल कांबळे यांनी केले. तर आभार सुनिधी गुगवाड यांनी मानले.

### शिवानंद पुरवंत यांचे निधन



**अक्कलकोट, दि. १० जानेवारी-**
तालुक्यातील वागदरी (ता अक्कलकोट) येथील प्रतिष्ठित मसला व्यापारी शिवानंद सिद्रामप्पा पुरवंत (वय ५४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन भाऊ असा परिवार आहे. शनिवारी ११ जानेवारी राजी ११ वाजता वागदरी येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.


### भगवान नाईकनवरे यांचे निधन



**करमाळा, दि. १० जानेवारी-**
शेटफळ (ता. करमाळा) येथील प्रगतशील शेतकरी प्रशांत नाईकनवरे यांचे वडील भगवान तुळशीराम नाईकनवरे (वय ७८) यांचे शनिवारी सकाळी १० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

**CHANGE IN NAME**
I HAVE DECLAIRED THAT MY OLD NAME IS **LALKOT MUNIRAHMED FAKIRAHMEDSAB** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **MUNIR AHMED FAKIRAHAMAD LALKOT**
Resi. - 68 B, Telengi Paccha Peth, Solapur.
**KINDLY NOTE THE SAME.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून Rallways e-procurement वेबसाइट www.Ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवतात. . निविदा क्रमांक SUR/L/T/2024/14 कामाचे नावः- कलबुर्गी (KLBG) रेल्वे स्थानकावरील नवीन PIT लाईनच्या तरतुदीच्या संदर्भात कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. अंदाजे खर्चः- रु. १,७६,९६,८८४.३४/- बोली सुरक्षाः- रु २,३८,५००.००/- पूर्णता पर्लाँडः- १२ महिने. ऑफरची वैधताः- ६० दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळः- ०४/०२/२०२५ १५.०० वाजता.
**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (एस.)**
Apex-52 **मध्य रेल्वे, सोलापूर**
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है




## रोटरी १०० डिजिटल क्लासरूम प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी,**
रोटरी इंटरनॅशनल अंतर्गत रोटरी क्लब सोलापूर व पी.पी. पटेल मेटल पावडर डिव्हिजन यांच्या संयुक्त अर्थसहाय्यातून राबविण्यात येणाऱ्या 'रोटरी १०० डिजिटल क्लासरूम प्रकल्प' चे लोकार्पण शनिवार, ११ जानेवारी २०२५ रोजी गुजरात भवन, सोलापूर येथे दिमाखात पार पडले.

या प्रकल्पांतर्गत, रोटरी जिल्हा ३१३२ च्या ११ जिल्ह्यांतील १०० शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम उभारण्यात येणार आहेत. प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, म ाजी प्रांतपाल स्वाती हेरकल, नियोजित प्रांतपाल सुधीर लातूरे यांच्या शुभहस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. सोलापूर रोटरी परिवाराचा सहभाग आणि मान्यवरांचे विचारमंथन सोलापूर रोटरी परिवारातील सर्व क्लब अध्यक्ष आणि सचिव तसेच अक्कलकोट, तुळजापूर, मंगळवेढा, पंढरपूर येथून मोठ्या संख्येने रोटेरियन उपस्थित होते. संचालक क्षितिज झावरे, पब्लिक इमेज संचालक रवींद्र बनकर यांचीही आवर्जून उपस्थिती होती. माजी प्रांतपाल डॉ. राजीव प्रधान, झुबिन अमेरिया, आणि रोटरी टीम २०२६-२७ चे प्रांतपाल जयेश पटेल सोबत असलेले सर्व रोटेरियनही कार्यक्रमात सहभागी झाले. या सोहळ्यात सर्व मान्यवरांनी आपली मते व्यक्त करत प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी प्रांतपाल जयेश पटेल यांनी 'जयेश-पारूल एंडोमेंट फंड' ची घोषणा करून रोटरी फाउंडेशनच्या निधी वाढीसाठी योगदान दिले.

सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.अक्षय जव्हेरी यांनी कुशलतेने केले, तर आभार प्रदर्शनाची जबाबदारी सचिव ब्रिजकुमार गोयदानी यांनी पार पाडली. डॉ. केदार कहाते, सलाम शेख, राजन वोरा, अतुल चव्हाण, सुहास लाहोटी, संजीव मेंते, यांच्यासह रोटरी टीम २०२६-२७ मधील सर्व रोटेरियन मोठ्या संख्येने उपस्थित होते. तांत्रिक माहिती व भविष्यातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्याची दिशा पुण्याचे श्री. बिरेन धर्मसी यांनी डिजिटल सॉफ्टवेअरविषयी माहिती दिली, तर श्री. कौशिक शहा यांनी एलईडी व इतर उपकरणांविषयी मार्गदर्शन केले. या प्रकल्पामुळे ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध होऊन शिक्षणाचा दर्जा उंचावेल व समाजप्रबोधनाला चालना मिळेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला. 'रोटरी १०० डिजिटल क्लासरूम प्रकल्प' हा २१व्या शतकातील शिक्षण प्रणालीला गती देणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस शहर सोलापूर हद्दीतील आम जनतेस कळविण्यात येते की, डी व सब डी सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पश्चिम मंगळवार पेठ येथील दुकान जागा यांसी सिटी सर्व्हे नं. ३०१०/अ/४ असे असून यांचे एकूण क्षेत्र ४०.३० चौ.मी. असून याचे म्यु.घर नं. ८७८/३ असे असून यापैकी १९.३ चौ.मी. क्षेत्राची शांताबाई सिद्रामप्पा ताडमारे (मयत) व राजशेखर सिद्रामप्पा ताडमारे यांची मालकीची व वहिवाटीची दोन दुकान गाळा दक्षिण मुखी असे असून या दोन दुकान गाळा नंबर ३ यांचे धारक राजशेखर सिद्रामप्पा ताडमारे याच्या मालकी वहिवाटीची दुकान गाळा लोडबेरींग बांधकाम असलेले दुकानजागा त्याची चतुः सिमा खालीलप्रमाणे :-
पुर्वेस - गाळा नं. ४ (धारक- संजयकुमार सिद्रामप्पा ताडमारे)
पश्चिमेस - गाळा नं. २ (मयत शांताबाई सिद्रामप्पा ताडमारे)
उत्तरेस - गायत्री भुवनची जागा दक्षिणेस - रस्ता
सदरची वर नमुद करण्यात आलेली मिळकत राजशेखर सिद्रामप्पा ताडमारे यांच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून त्यांच्या वतीने विक्रीस काढल्याने आमचे अशिलाच्या वतीने खरेदी घेण्याची बोलणी करण्यात आलेली आहे. तथापि सदरच्या मिळकतीबाबत कोणाचेही कसल्याही प्रकारचे तक्रार नसल्याची खात्री दिलेली आहे.
तथापि वर नमुद मिळकतीबाबत कोणाचेही व कोणतेही प्रकारची हक्क व तक्रार तथा गहाण, दान, बक्षीसपत्र, भाडेकरार हक्कपत्र, खाजगी बोजा अथवा बँक बोजा अन्य कोणतेही कर्ज, साठेखत, इसारापावती तथा वहिवाटीचा हक्काबाबत कसल्याही प्रकारची तक्रार असल्यास येत्या ७ दिवसाच्या आत उत्तराने कळविण्यात यावी. मुदतीनंतरच्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
ही जाहीर नोटीस दिली ता. १२/०१/२०२५
सही /-
**आर. जी. जोगदंड**
**ॲडव्होकेट बी.ए.एलएल.बी.**
**२१८/४, साखर पेठ, गोपाल निवास, कन्ना चौक,**
**सोलापूर - ४१३००५ मो. नं. ९४२०७८०१२५**
**आमच्या अशिलातर्फे ॲडव्होकेट**




# समतेची  यात्रा



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
रविवार, १२ जानेवारी २०२५

# भू कैलासपती श्री सिद्धेश्वर महाराज

**बोला...एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र....श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज की जय... हर्र हा जयघोष आता सोलापूर शहरात सर्वत्र घुमण्यास प्रारंभ झाला आहे. कारण, सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षीही सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची गड्डा यात्रा सुरू झालेली आहे. याकाळात अबालवृद्ध भाविक भक्तांना एक वेगळीच धार्मिक, अध्यात्मिक आणि एतिहासिक पर्वणी मिळते. श्रीसिद्धरामेश्वर यात्रा गड्डा यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे. यात्रेचे प्रमुख मानकरी यांच्या घरी दीप प्रज्वलित करून सोलापूरची गड्डा यात्रा सुरू झाली असून प्रत्येक भक्तांना यात्रेची उत्कंठा लागलेली आहे.**

**राजशेखर हिरेबब्बू, यात्रा प्रमुख (९८८१८२९७५६)**

**शब्दांकन : यशवंत गुरव (८८८८६५०७५५)**

श्री शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांनी आजच्या पासून सुमारे ९०० वर्षांपूर्वी जात धर्म यांना थारा न देता सर्वधर्म समभाव दृष्टिकोन ठेवून सर्वांसाठी अध्यात्मिक धार्मिक मार्ग दाखवला. सोळा गावांचे सोनलग्गी असे पूर्वी सोलापूरचे नाव होते. या १६ गावांचा ऋणानुबंध कायम रहावा, यासाठी सिद्धेश्वर महाराजांनी अठरापगड जातींना आध्यात्मिकते मधून एकात्मतेचा संदेश दिला. सोलापूर म्हणजेच त्या काळातील सोनलग्गीमध्ये दुष्काळ पडला तेव्हा, तलाव खोदून सर्वांसाठी पाणी उपलब्ध करून दिले. तेव्हापासून हा सिद्धेश्वर तलाव प्रसिद्ध आहे. एक महान शिवयोगी म्हणून श्री सिद्धरामेश्वर महाराजांची ख्याती सर्व दूर आहे.

उत्तर कसब्यातील हिरेहब्बू यांच्या वाड्यात असणाऱ्या शिवलिंग मंदिरात श्री सिद्धरामेश्वर तपश्चर्येसाठी बसत असत. तासन्तास ते ध्यानधारणेमध्ये मग्न असताना. शेजारीच असणाऱ्या कुंभारवाड्यातील कुंमारवा महाराजांसाठी सडा रांगोळी करत. एके दिवशी कुंमारवाने श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांना लग्न करण्याचे मागणे घातले. मात्र त्यावेळेस महाराजांनी मी एक शिवयोगी असून मी तुझ्याशी लग्न करू शकत नाही, ते सांगितले. मात्र कुमारावा ऐकण्यास तयार नव्हती. यावर महाराजांनी उपाय शोधत माझ्या योगदंडा सोबतच तुझा विवाह सोहळा होईल. मात्र मी लग्न करू शकत नाही असे सांगितले. त्यावर कुमारावाने होकार दर्शवला. त्या काळापासून ते आज तागायत पर्यंत श्री सिद्धेश्वर महाराजांची यात्रा म्हणजेच लग्न सोहळा जानेवारी महिन्यात संपन्न होते. अशी आख्यायिका सांगितली जाते. ब्रिटिश सरकारच्या वतीने देखील या यात्रेला विशेष सन्मान देण्यात येतो. जुन्या कलेक्टर कचेरी समोर सरकारी आहेर या काळात यात्रा प्रमुख आणि मानकरी यांना दिला जातो. त्यामुळे श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची यात्रा म्हणजेच लग्न सोहळा संपूर्ण राज्यभरात प्रख्यात झाला आहे. सिद्धेश्वर महाराजांचा आणि कुंभार कन्येचा लग्न सोहळा धार्मिक विधी संपन्न होतो.






## नंदीध्वजाचे मानकरी

१) राजशेखर हिरेहब्बू
२) मनोज हिरेहब्बू
३) जगदीश हिरेहब्बू
४) संजय हिरेहब्बू
५) संतोष हिरेहब्बू
६) धनेश हिरेहब्बू
७) विनोद हिरेहब्बू
८) विकास हिरेहब्बू
९) सागर हिरेहब्बू
१०) सूरज हिरेहब्बू
१२) ओंकार हिरेहब्बू
११) प्रथमेश हिरेहब्बू
१३) सर्वेश हिरेहब्बू
१४) यश हिरेहब्बू

## असे आहेत श्री सिध्दरामेश्वर यात्रेचे धार्मिक विधी

**१० जानेवारी :** ९०० वर्षांपासून श्री ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांच्या यात्रेच्या धार्मिक कार्यास रुढी परंपरेप्रमाणे ११ जानेवारी पासून सुरुवात होते. सिध्दरामेश्वरांच्या हातातील योगदंड उत्तर कसबा येथील कै. शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यातून श्री मठपती (स्वामी) हा योगदंड शुक्रवार पेठ येथील कै. रामचंद्रप्पा शेठे यांच्या वाड्यात घेऊन जातात. त्याठिकाणी मानकरी हिरेहब्बू आल्यानंतर त्या योगदंडाची विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर होमहवन व हिरेहब्बू यांचे शेटे यांचे वारस ॲड. मिलिंद थोबडे हे पादपूजा करतात. त्यानंतर प्रसादाचा कार्यक्रम होतो. तेंव्हापासून यात्रेचे धार्मिक विधीस सुरुवात होते. ही प्रथा ९०० वर्षांपासून आजतागायात चालत आलेली आहे.

**११ जानेवारी :** रोजी रात्री १२.५ मि. कै शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यात मानाच्या पहिली व दुसरी नंदीध्वजास सांज चढविण्याचा कार्यक्रम होतो. त्यानंतर हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजा होते.

**१२ जानेवारी :** सकाळी ८ वा. कै. शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यात पहिल्या व दुसऱ्या नंदीध्वजाची राजशेखर हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजा होते. पुजा झाल्यानंतर यात्रेस प्रारंभ होतो व त्यानंतर श्री सिध्देश्वर प्रशालेसमोर कलेक्टर कचेरीच्या जुन्या फाटकाजवळ १ ते ७ काठ्या येऊन उभारल्यानंतर सरकारतर्फे देशमुख हे हिरेहब्बू यांना सरकारी आहेर करतात. हा मान ब्रिटीश काळापासून आजतागायत चालू आहे. तेथून हे नंदीध्वज सिध्देश्वर मंदिरात ६८ लिंगापैकी पहिले लिंग अमृत लिंगाजवळ येऊन थांबतात. त्याठिकाणी सातही नंदीध्वज आल्यानंतर हिरेहब्बू व शेटे तैलाभिषेक घालून त्या लिंगाची विधीवत पूजा करतात. पूजा झाल्यानंतर त्याठिकाणी शेटे यांना हिरेहब्बू हे विडा देतात व नंतर देशमुख, मसरे, कळके, बहिरोपाटील, भोगडे, थोबडे, सिध्दय्या स्वामी, मल्लिनाथ जोडभावी, दर्गोपाटील, शिवशेट्टी, गवसणे, इटाणे (पूजेचे मानकरी, झोळीवाले मानकरी) यांना विडा दिला जातो. हा सर्व विड्यांचा मान हिरेहब्बू देतात. व त्यानंतर ६८ लिंगास यन्नीमज्जन (तैलाभिषेकांस) प्रारंभ होतो. पुढे गर्भ मंदिरात श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांचा गदगीस तैलाभिषेक घालून विधीवत पूजा हिरेहब्बू करतात. त्यानंतर ६८ लिंगास तैलाभिषेक (यन्नीमज्जनांस) सुरुवात होते. हे नंदीध्वज सोलापुरातील सर्व ६८ लिंगास प्रदक्षिणा घालून रात्री ९ वा. हिरेहब्बूंच्या वाड्यात परत येतात.

**१३ जानेवारी :** सकाळी ७ वा कै. शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यातून हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पुजा होऊन मिरवणुकीने सिध्देश्वर मंदिरात अक्षता सोहळ्यासाठी संमती कट्याजवळ येतात. येथे सातही नंदीध्वज आल्यानंतर श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांच्या हातातील योगदंडाच्या साक्षीने सुगडी पुजा हिरेहब्बू व देशमुख करतात. त्यानंतर कुंभार यांना हिरेहब्बू यांच्या हस्ते विडा दिला जातो. त्यानंतर श्री तम्मा शेटे संमती मंगल अष्टक हे हिरेहब्बू यांच्या स्वाधीन करतात. व त्यानंतर हिरेहब्बू व देशमुख त्या संमतीची विधिवत पुजा करतात हिरेहब्बू हे शेटे यांना विड्याचा मान देतात. त्यानंतर हिरेहब्बू ते संमती मंगल अष्टक तम्मा शेटे यांच्या स्वाधीन करतात ही रुढी परंपरा चालत आलेली आहे. त्यानंतर हिरेहब्बू देशमुख व तम्मा शेटे संमती कट्टयावर येऊन त्याठिकाणी श्री तम्मा शेटे संमती वाचन करतात. अशाप्रकारे अक्षता सोहळ्याच्या कार्यक्रम पार पडतो. त्यानंतर सातही नंदीध्वज अमृतलिंगाजवळ येतात.त्याठिकाणी हिरेहब्बू व शेटे यांच्या हस्ते अमृत लिंगाची पंचामृत अभिषेक करून विधिवत पुजा होते. त्यानंतर शेटे यांना हिरेहब्बू हे विडा देतात व इतर मानकऱ्यांना विड्याचा मान दिला जातो. त्यानंतर श्रीसिध्दरामेश्वरांच्या गदगीस अभिषेक करून हिरेहब्बू हे विधिवत पुजा करतात. तेथील विड्याचा मान तम्मा शेटे यांना दिला जातो. व पुन्हा नंदीध्वज ६८ लिंगास प्रदक्षिणा घालून परत हिरेहब्बू यांच्या वाड्यात परत येतात.

**१४ जानेवारी :** रोजी सकाळी ९ वा. हिरेहब्बू व देशमूख यांच्या हस्ते पुजा होऊन मिरवणूकीने संमती कट्टयाजवळ येऊन थांबतात व तेथे आल्यानंतर प्रथम श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांच्या योगदंडास करमुटगी लावून त्या योगदंडास स्नान घालतात व नंतर पालखीतील मुर्तीस करमुटगी लावून स्नान घालतात. त्यानंतर १ ते ७ नंदीध्वजांना करमुटगी लावून तलावात स्नान घालताता. त्यानंतर १ ते ७ नंदीध्वजांना करमुठगी लावून श्री सिध्दरामेश्वरांच्या तलावात स्नान घालण्यांत येते. त्यानंतर अमृत लिंगाजवळ हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते गंगा पुजनाचा धार्मिक विधी होतो. त्यानंतर देशमुखांना हिरेहब्बू हे विडा देतात. त्यानंतर गर्भ मंदिरातील श्री सिध्दरामेश्वरांच्या पादुकास करमुटगी लावून ते पादुका धुवून त्यानंतर हिरेहब्बू हे गदगीची (मुर्तीची) आरती करतात. नंतर नंदीध्वज दुपारी १ वा. परत हिरेहब्बू वाड्यात येतात. सायंकाळी ५ वा हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पुजा होऊन मिरवणूकीने जूनी फौजदार चावडी जवळ येऊन थांबतात. त्याठिकाणी पहिल्या नंदीध्वजास नागफणी बांधतात. २ ते ७ नंदीध्वजांस बाशिंग बांधतात. पहिल्या नंदीध्वजास नागफणी बांधल्यानंतर हिरेहब्बूच्या हस्ते पुजा होते. पुजा झाल्यानंतर फडी नंदीध्वज पकडणारे व पहिली नंदीध्वज उचलून देणारे मास्तर यांना मानाचा हार घालण्यांत येतो. सध्या नागफणी नंदीध्वजाचे मानकरी सोमनाथ मेंगाणे यांच्याकडे असून त्यांनी सकाळ पासून उपवास करून तो नंदीध्वज एकट्याने होम मैदानापर्यंत आणतात. हौम मेदानांवर नंदीध्वज आल्यानंतर हिरेहब्बू होमकुंडात उतरतात. त्या होमकुंडात बाजरीचा पेंडीचे तयार केलेल्या कुंभार कन्येस शालू नेसून सौभाग्य अलंकार घालून त्या कुंभार कन्येस मणी, मंगळसूत्र, बांगड्या, जोडवे, हार दंडा घालून त्या कुंभार कन्येस सजवतात, त्यानंतर त्याची विधीवत पुजा करतात. त्यानंतर त्या कुंभार कन्येस हिरेहब्बू अग्नी देतात. त्यानंतर तेथील विड्याचा मान कुंभार यांना दिला जातो. त्यानंतर हिरेहब्बू, पालखी व नंदीध्वज होमांस पाच प्रदक्षिणा घालतात. त्यांनतर तिळगुळाचा कार्यक्रम होऊन नंदीध्वज भगिनी समाजाजवळ येऊन थांबतात व नंदीध्वज आल्यानंतर त्याठिकाणी देशमुखांचा वासरू आणतात. त्यानंतर वासरासमोर सर्व प्रकारचे धान्य व सर्व प्रकारचे विडा सामान ठेवले जाते. हिरेहब्बूंच्या हस्ते भाकणूक सांगतात.

त्यावर्षीचे भविष्य राजशेखर हिरेहब्बू हे सांगतात. त्यानंतर नंदीध्वज मंदिरात येऊन परत मिरवणूकीने रात्री १वा. नंदीध्वज हिरेहब्बूंच्या वाड्यात येतात. व त्यानंतर तेथे फडीचे मानकरी व हिरेहब्बू प्रसाद घेतल्यानंतर सर्व नंदीध्वजधारक व मानकरी यांना येथे महाप्रसादाचा कार्यक्रम होतो.

**१५ जानेवारी :** सायं. ५ वा. हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पुजा होऊन मिरवणुकीने नंदीध्वज होम मैदानावर येतात तेथे शोभेचे दारूकाम झाल्यानंतर नंदीध्वज परत मंदिरात येतात. मंदिरात आल्यानंतर हिरेहब्बू व पालखी श्री सिध्देश्वरांच्या गर्भ मंदिरास पाच प्रदक्षिणा घालतात व त्यानंतर १ ते ५ नंदीध्वज पाच प्रदक्षिणा घालतात व त्यानंतर ६ व ७ वी नंदीध्वज पाच प्रदक्षिणा घालतात. हि आजतागायत रूढी परंपरा चालत आलेली आहे. त्यानंतर रात्री १२ वा. हिरेहब्बूच्या वाड्यात नंदीध्वज पुन्हा परत येतात.

**१६ जानेवारी :** ९०० वर्षांपासून ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांच्या यात्रेचा सांगता समारंभ कप्पड कळी रूढी परंपरे प्रमाणे १६ जानेवारी रोजी होतो. उत्तर कसबा येथील कै शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यातून श्री मठपती स्वामी हे श्री सिध्दरामेश्वरांच्या हातातील योगदंड शुक्रवार पेठेतील देशमुख यांच्या वाड्यात घेऊन जातात. हिरेहब्बू आल्यानंतर त्याठिकाणी श्री देशमुख हे श्री सिध्दरामेश्वरांच्या हातातील योग दंडाची विधिवत पूजा करतात. त्यानंतर होम हवन होऊन हिरेहब्बू यांचे पादपुजा करतात. त्यानंतर प्रसादाचा कार्यक्रम झाल्यानंतर हिरेहब्बू यांना देशमुख यांच्या हस्ते रूमाल, शाल, श्रीफळ हार घालून आहेर करण्यात येतो. त्यानंतर देशमुखांना हिरेहब्बू हे खोबरे खारीक लिंबू याचे आशिर्वाद देतात. व जोकांही यात्रेचे चार दिवस कार्यक्रम सोहळ्यात हिरेहब्बू यांनी भगवे वस्त्र परिधान केलेला असतो. ते भगवे वस्त्र देशमुखांच्या वाड्यातून आल्यानंतर तो अंगरखावस्त्र उतरवतात व त्यानंतर रात्री १०.००वा. हिरेहब्बू वाड्यातून पहिली व दुसरी नंदीध्वज हिरेहब्बुच्या हस्ते पुजा झाल्यानंतर मल्लिकार्जुन मंदिरात येतात व तेथे आल्यानंतर पाचही नंदीध्वज श्री मल्लिकार्जुन गर्भ मंदिरास पाच प्रदक्षिणा घालतात. व पाचही नंदीध्वजाची हिरेहब्बूंच्या हस्ते पुजा झाल्यावर कपड कळीचा कार्यक्रम होतो. हिरेहब्बूच्या हस्ते सर्व भाविकांना खारीकाचा प्रसाद देऊन पाच दिवसांच्या धार्मिक यात्रेचा गोड सांगता समारंभ मल्लिकार्जुन मंदिरात अत्यंत भक्ती भावाने पार पडतो.

## नंदीध्वजाचे मास्तर

**● प्रथम**
१) योगीनाथ कुर्ले, २) गंगाधर कल्याणकर (घटोळे), ३) अशोक साबणे (वाले), ४) सचिन भैरोपाटील, ५) शिवानंद स्वन्ना, ६) सागर स्वामी, ७) सागर हुमाबादकर, ८) शिवानंद कडगंची.

**● द्वितीय**
१) विठ्ठल कोरे, २) अनंत अंजीखाने, ३) परमेश्वर शरणार्थी, ४) सिध्दाराम पारशेट्टी, ५) स्वप्नील दसाडे, ६) विरेश बुगडे

**● तृतीय**
१) रेवणसिध्द माळी, २) कैलास माळी, ३) रितेश सवळी, ४) मल्लिनाथ माळी, ५) गुरूनाथ माशाळकर, ६) वसंत म्हेत्रे, ७) शिवानंद भिमदे, ८) प्रभाकर हेबळे, ९) वसंत म्हेत्रे, १०) शैलेश माशाळकर.

**● चौथे**
१) कुमार शिरसी, २) प्रशांत कुमठेकर

**● पाचवे**
१) विक्रांत बनशेट्टी, २) सोमनाथ मेंडके, ३) राजा जावळे, ४) राहुल कळमणकर, ५) कासू येणेगुरकर

**● सहावे**
१) प्रकाश बनसोडे, २) शिवानंद बनसोडे, ३) संदिप बनसोडे

**● सातवे**
१) मारूती बनसोडे, २) मच्छिंद्र बनसोडे, ३) योगेश बनसोडे, ४) पंकज बनसोडे

**● बर्फी प्रसाद वाटप सेवाधारी**
१) राजशेखर आमणगी, २) राजशेखर भैरोपाटील, ३) सुहास दर्गापाटील, ४) विजयकुमार भोगडे, ५) रवि कोरे, ६) मल्लिनाथ स्वन्ना, ७) बसवचंद्र अमणगी

## कुंभार मानकरी

१. योगीराज शिवलिंग म्हेत्रे-कुंभार
२. मल्लिकार्जुन सिद्रामप्पा म्हेत्रे-कुंभार
३. महादेव शिवलिंग म्हेत्रे-कुंभार
४. रेवणसिध्द मल्लिकार्जुन कुंभार
५. संगण्णा कल्लप्पा म्हेत्रे-कुंभार
६. अशोक महादेव कुंभार
७. सुरेश सिध्दाराम म्हेत्रे-कुंभार

## श्री सिध्देश्वर महायात्रेतील १ ते ७ नंदीध्वजासमोरील विडा घेणारे मानकरी :

- पहिला - बहीरो पाटील राजू
- दुसरा - बाळासाहेब दर्गोपाटील
- तिसरा - रेवणसिध्द मायनाळे
- चौथा, पाचवा- श्री विश्वब्राम्हण समाज कालिका मंदीर सेवा मंडळ ट्रस्ट सोलापूर (सोनार समाज)
- सहावा - प्रकाश बनसोडे
- सातवा - मारूती बनसोडे, मच्छींद्र बनसोडे

## श्री सिध्देश्वर महायात्रेतील (झोळीचे) विड्याचे मानकरी

योगेश इटाणे, अमोगसिध्द माळगे, औदुंबर पुजारी, गंगाधर हिरेमठ, चनगोडा म्हैत्री, पंडीत म्हैत्रे, शरणप्पा कवदे, अंबादास खांडेकर, विश्वनाथ आयगोडे, सुभाष खोबरे, जगदीश कुंभार, गणेश चक्रे, श्रीमंत पुजारी गणेचारी या सर्वांना पुजेचे मानकरी म्हणून हिरेहब्बू हे विड्याचा मान देतात.



## विड्याचे मानकरी

देशमुख, शेटे, मसरे, कळके, बहीरोपाटील, भोगडे, थोबडे, जोडभावी, उंब्रजकर, देगांवकर, वनारोटे, शिंगमहाराज, कल्याणशेट्टी, सिध्दय्या स्वामी, शिवशेट्टी, गवसणे, गणेचारी, मदगिरी, कंटीकर, प्रकाश स्वामी, सुभाष सुतार, योगेश इटाणे, कुंभार, शेटे, दर्गोपाटील, तोग्गी, खोबरे, फाळके, रामचंद्र हक्के, गवई, रेवणसिध्द सिदवाडकर, दिलीपसिंग हजारे, धोंडीबा गवळी, ओनामे, रेवणसिध्द वैद्य, बसवराज कळमणकर, शिंगारे, बुट्टे.



## योगदंड व कुंभार कन्या माता कुमारव्या देवी विवाह सोहळा

श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांचे प्रतिक योगदंड व कुंभार कन्या माता कुमारव्या देवी विवाह सोहळा होतात. उत्तर कसब्यातील कुंभार प्रमुख मानकरी योगीराज म्हेत्रे कुंभार यांचा समावेश आहे. योगीराज शिवलिंग म्हेत्रे-कुंभार हे यात्रेमध्ये कुंभार मानकरीकडून दरवर्षी आपती सेवा बजावतात. श्री सिध्दरामेश्वरांच्या या यात्रा कालावधीत कुंभार मानकरीकडून धार्मिक विधीं होतात.

## धार्मिक विधी असे


मानकरी श्री. मल्लिकार्जुन म्हेत्रे- कुंभार यांचे निवासस्थानी (उत्तर कसबा, कुंभार वाडा, सोलापूर) श्री गणपतीचे व श्री सिध्दरामेश्वरांचे प्रतिमेचे पूजन करून दिवे घालण्याचा कार्यक्रम होईल. त्यानंतर पूर्वापार चालत आलेल्या परंपरेप्रमाणे ५६ नग मातीचे घागरी यात्रेचे प्रमुख मानकरी हिरेहब्बू यांचेकडे सुपूर्द करण्याचा कार्यक्रम मानकरी योगीराज कुंभार यांचेकडून केला जाईल.

तेलाचे घागरीचे विधीवत पूजन मानकरी योगीराज कुंभार यांचे हस्ते करून सदर घागर मानकरी योगीनाथ शिवशेट्टी यांचेकडे ६८ लिंगांना तेलाभिषेक करण्यासाठी सुपूर्द करण्यात येईल. मानकरी मल्लिकार्जुन कुंभार-म्हेत्रे यांचे निवासस्थानी श्री गणपती व श्री सिध्दरामेश्वरांचे प्रतिमेचे पूजन करून पंचामृताने घागरीचे पूजन केले जाईल. त्यानंतर नंदीध्वज मिरवणूक उत्तर कसब्यातीत कुंभार वाड्यासमोर आल्यानंतर मानाच्या पहिल्या नंदीध्वजास खोबरे लिंबूचे हार आणि बाशिंग बांधून नंदीध्वजांचे, श्रींच्या पालखीचे विधीवत पूजन केले जाईल.

त्यानंतर सिद्धेश्वर मंदिराजवळील संमती कट्ट्याजवळ नंदीध्वजाचे आगमन कायद्यानंतर मानकरी योगीराज म्हेत्रे कुंभार यांच्या हस्ते सुगडी दिल्यानंतर श्री.हिरेहब्बू व श्री देशमुख यांचे हस्ते सुगडीपूजन केले जाते. त्यानंतर मानकरी श्री. योगीराज शिवलिंग मोजे कुभार यांना मानाचा विडा दिला जातो. त्यानंतर परंपरेप्रमाणे अक्षता सोहळा संपन्न होईल. होमकट्ट्यावरील लिंगाची विधीवत पूजा मानकरी कुंभार यांचेकडून केली जाईल. संध्याकाळी

नंदीध्वजांचे होम मैदानावर आगमन झाल्यानंतर मानकरी श्री. योगीराज शिवलिग म्हेत्रे-कुंभार यांचेकडून ५ बाजरीचे पेंड्यांना योगीराज कुंभार व मल्लिकार्जुन कुंभार यांच्याकडून कुंभार कन्या माता कुमारव्वा देवीचे प्रतिकात्मक रूप तयार केले जाते. सदर कुंभार कन्या माता कुमारव्वा देवीस श्री सिध्देश्वर देवस्थानकडून मणी, मंगळसूत्र व साडी दिली जाते.

त्यानंतर कुंभारकन्येचा प्रतिकात्मक रूपास श्री.हिरेहब्बू यांच्या हस्ते विधीवत पूजा करून मानकरी श्री.योगीराज म्हेत्रे-कुंभार यांना श्री. हिरेहब्बू यांच्याकडून मानाचा विडा दिला जातो. त्यानंतर पूर्वापार परंपरेप्रमाणे होमविधीचा कार्यक्रम संपन्न होतो.वरील यात्रेच्या काळात समस्त कुंभार परिवाराच्या घरांमध्ये पाच दिवसांचे दिवे घालून पाच दिवसांचा उपवास केला जातो.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### विडी कारखान्यांना किमान वेतनानुसार वेतन अदा करा

**शिवसेना कामगार आघाडीची मागणी**

**अक्कलकोट, दि. ११ जानेवारी-**

विडी कारखान्यांना किमान वेतनानुसार वेतन अदा करण्यास भाग पाडावे अशी मागणी शिवसेना कामगार आघाडी शिंदे गटाकडून करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर यांना देण्यात आले. सोलापूर शहर हे विडी उद्योगाचे शहर म्हणून ओळखले जाते. या विडी उद्योगातील उद्योजकानी येथील काम गारांचे आर्थिक पिळवणूक करून त्यांच्या कामाचे हक्काचे शासनाने ठरवून दिलेले मागील वीस वर्षापासून किमान वेतनाचे दर अदा करत नाहीत .तसेच कामगारांना साप्ताहिक सुट्टी देत नाहीत. साप्ताहिक सुट्टीचा दुप्पट मोबदला देत नाहीत. कामगारांना अत्यंत कमी रकमेवर राबवून घेण्यात येत आहे. देसाई विडी उद्योग कंपनी अक्कलकोट नाका सादुल पेट्रोल पंपाजवळ सोलापूर या विडी कारखानदाराने कामगारांना किमान वेतन दिले नाही. याची चौकशी करून काम गारांना संविधानाने दिलेल्या कामगार अधिकाराची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी शिवसेना कामगार आघाडी शिंदे गट जिल्हाप्रमुख व नवमहाराष्ट्र विडी कामगार व कर्मचारी संघटना संस्थापक अध्यक्ष सायबाण्णा तेगेळी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आली.याबाबतचे निवेदन सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर यांना दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी देण्यात आले. यावेळी सायबाण्णा तेगेळी, शिवसेना कामगार आघाडी अक्कलकोट तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे, सुनंदा शहापुरे नरसय्या गड्डम, अक्कलकोट शहर शिवसेना महिला आघाडी प्रमुख वैशाली हावनूर वर्षा म्हेत्रे लक्ष्मीबाई रामनपल्ली अप्पाशा शंकर शेट्टी , मीना करदास नरसम्मा नागेश गड्डम आदींसह विडी कामगार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### शिंपी समाजाच्या विविध मागण्यांबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**पंढरपूर, दि. ११ जानेवारी-**

राज्यातील समस्त शिंपी समाज बांधवांचे विविध प्रश्न व मागण्यांबाबत समाजातील शिष्टमंडळाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. मुंबई येथे मंत्रालयात मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव श्रीकर परदेशी यांना निवेदन देण्यात आले. पंढरपुरातील संत नामदेव महाराजांच्या स्मारकाचे काम लवकर सुरु करावे यासह शिंपी समाजातील विविध मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य अन्य आयोगाचे अध्यक्ष व अ.भा.संत नामदेव क्षत्रिय एकसंघचे संस्थापक अध्यक्ष ॲड. महेश ढवळे, संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज नामदास, ह.भ.प. निवृत्ती महाराज नामदास, संत नामदेव क्षत्रिय महासंघाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब पाथरकर, ॲड.अजय तल्हार, केशवराज संस्थेचे अध्यक्ष रुपेश खांडके, सचिव धनंजय जवंजाळ, मनोज भांडारकर (जळगाव), नितीन बाविस्कर (शिरपूर), गजेंद्र शिंपी (नंदुरबार), अशोक खैरनार (मुंबई), रुपेश बागुल (मालेगाव), या बरोबरच पंढरपूर येथील शिंपी समाजाचे अध्यक्ष गणेश उंडाळे, खजिनदार शशिकांत जवंजाळ, जयवंत कांबळे, प्रथमेश परांडकर यांच्यासह शिंपी समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.



### विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

**पंढरपूर, दि. ११ जानेवारी-**

श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेच्या दर्शनासाठी आलेल्या विकी दिनेश दहिवाळ या भाविकाचा मोबाईल हरवला होता. संबंधित भाविकांकडून मोबाईलची शोधा शोध होत असताना, पश्चिमद्वार येथील सफाई कर्मचारी छाया कुमार रणदिवे यांना सदरचा मोबाईल मिळून आला असता, त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयात जमा केला व शहानिशा झाल्यानंतर संबंधित भाविकास परत करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. संबंधित भाविक हे बीड येथील रहिवाशी असून, शनिवारी श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आले होते. त्यावेळी त्यांचा मोबाईल मंदिर परिसरात हरवला होता. परंतू, अवघ्या काही तासातच मोबाईल परत मिळाला. संबंधित कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणा बद्दल सर्वांनी कौतुक करून अभिनंदन केले. श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात मोबाईल बंदी असून, मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी भाविकांनी मंदिर समितीच्या अधिकृत मोबाईल लॉकरमध्ये मोबाईल जमा करावा व दर्शन झाल्या नंतर परत घ्यावा. यासाठी पश्चिमद्वार, श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, श्री रेणूकामाता मंदिर, दर्शनमंडप पूर्वगेट इत्यादी चार ठिकाणी अल्प देणगी मुल्य आकारून मोबाईल लॉकरची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे, या सुविधेचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

# मकरसंक्रांतनिमित्त महिला भाविकांच्या दर्शनासाठी सुलभ नियोजन

## पुरुष भाविकांनी मुखदर्शन घ्यावे; मंदिर समितीकडून आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ जानेवारी -**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरामध्ये प्रतिवर्षी प्रमाणे परंपरेनुसार मकरसंक्रांत उत्सव साजरा करण्यात येत आहे. म करसंक्रांतीच्या उत्सवानिमित्त भोगीला म्हणजे १३ जानेवारी रोजी श्री रूक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा पहाटे ३.०० ते ४.३० या वेळेत करण्यात येणार असून, माता व भगिनींना श्री रूक्मिणी मातेस भोगी करावयाची असेल, त्यांनी मंदिरामध्ये पहाटे ०४.३० ते ५.३० या वेळेत करावी. त्यादिवशी पहाटे ०५.३० नंतर श्री रूक्मिणी मातेस पोषाख व अलंकार परिधान करण्यात येतील व सकाळी ०६.३० वाजेपर्यंत दर्शन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

भाविकांच्या सोईच्या दृष्टीने १३ जानेवारी रोजी श्री विठ्ठलाकडील काकडा आरती व नित्यपूजा पहाटे ०४.३० ते ०५.४५ या वेळेत होऊन, पदस्पर्श दर्शन पहाटे ०६.०० नंतर सुरू करणेत येणार आहे.

या बरोबरच १४ जानेवारी रोजी नेहमीच्या वेळेमध्ये मकरसंक्रांती निमित्त श्री रूक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा झालेनंतर श्री रूक्मिणी मातेस अलंकार परिधान केलेनंतर दर्शन सुरू करण्यात येणार आहे. तसेच दि.१५ जानेवारी रोजी नेहमीप्रमाणे श्री रूक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा नेहमीच्या वेळेत करण्यात येणार असून, दिनांक १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांती निमित्त जास्तीत जास्त माता व भगिनींना श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन सुलभ व्हावे, याकरीता पुरूष भाविकांनी शक्यतो मुखदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिरे समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

सदरचा उत्सव मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर तसेच सदस्या शकुंतलाताई नडगिरे व ॲड. माधवीताई निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात येत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.




**याची केली व्यवस्था**

या कालावधीत भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन, दर्शनरांग व्यवस्थापन, कमांडोज नियुक्ती, ऑनलाईन दर्शन बुकींग व्यवस्था बंद, चांगली स्वच्छता व्यवस्था, व्हिआयपी दर्शनावर निर्बंध, पूजेची संख्या कमी करून भाविकांना पुरेसा प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

## सुगड खरेदीसाठी, बांगड्या भरण्यासाठी महिलांची गर्दी

**सदाशिवनगर, दि. ११ जानेवारी-**

महिलांचा मकर संक्रांत हा सण दोन दिवसावर येऊन ठेपला असून या सणासाठी आवश्यक असणारे सुगड व महिलांनी आज आठवडा बाजारात गर्दी केली.

ज्वारीचं कणीस, बोरे, गाजर, हरबरा, भाजी खरेदीसाठी गर्दी झाली होती. ग्रामदैवत व पंढरपूरच्या विठ्ठलाला वाण घेऊन जाण्याची परंपरा अजूनही आहे. घरी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम केला जातो यावेळी आपल्या ऐपतीप्रमाणे वाण लुटण्यात येते.





## ५० कुटुंबियांची पुन्हा हिंदू धर्मात घरवापसी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ जानेवारी-**

विश्व हिंदू परिषद वतीने पालघर जिल्ह्यातील ख्रिश्चन झालेल्या ५० कुटुंबीयांना परत हिंदु धर्मात घरवापसी करण्यात आलेल्या ३८ महिला आणि १२ पुरुष असे ५० जणांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत ब्रह्मांड नायक श्री स्वामी समर्थ महाराजांचा दर्शन घेऊन अक्कलकोटमध्ये जल्लोष साजरा केला.

श्री स्वामी समर्थ महाराजांचा देवस्थानात मंदिर समिती आणि अनछत मंडळ कडून स्वामींचे फोटो देऊन या सर्वांचा सत्कार करून महाप्रसाद देण्यात आला. यावेळी हरेश्वर वनगा पालघर डहाणू, राष्ट्रीय स्वयंसंघ ग्रामविकास सोलापूर जिल्हा मंडळ सदस्य संदीप कटकधोंड, अक्कलकोट तालुका बजरंग दल प्रमुख मदन राठोड, गोरक्षक धर्म रक्षक राहुल वाडे, प्रसन्न गवंडी आदी उपस्थित होते.



## उद्योगपती जयंत म्हैसकर यांच्याकडून ११ लाखांची देणगी

**सीताराम साखर कारखाना, आष्टी शुगरकडून प्रत्येकी ५५० किलो साखर दान**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ जानेवारी-**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरे समितीला उद्योगपती जयंत म्हैसकर यांनी धनादेश स्वरूपात ११ लक्ष रूपयांची देणगी तसेच सिताराम साखर कारखाना व आष्टी शुगर यांच्याकडून प्रत्येकी ५५० किलो साखर दान मिळाल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

म्हैसकर, या दानशूर देणगीदार भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे विभाग प्रमुख राजेश पिटले यांनी श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार, लिपीक योगेश कागदे उपस्थित होते. म्हैसेकर हे मुंबई येथील रहिवाशी आहेत व श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त असून, त्यांनी आतापर्यंत सुमारे एक कोटीपेक्षा जास्त देणगी दिली आहे.

तसेच मंदिर समितीचे श्री संत तुकाराम भवन येथे अन्नछत्र असून, या अन्नछत्रासाठी श्री सिताराम साखर कारखाना, खर्डी व आष्टी शुगर आष्टी, यांचेकडून प्रत्येकी ५० किलो वजनाची ११-११ गोणी साखर दान केली आहे. त्याची किंमत सुमारे ३० हजार इतकी होत असून, या अन्नछत्रामध्ये दैनंदिन सुमारे २५०० ते ३००० भाविक लाभ घेत असतात. या अन्नछत्राला वस्तु, धान्यरूपी देणगी द्यायची असल्यास इच्छुक भाविकांनी श्री संत तुकाराम भवन येथील कार्यालयात संपर्क साधावा.

## आश्रमशाळा जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात नागनहळ्ळी आश्रमशाळेची उत्तुंग झेप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ जानेवारी-**

आश्रमशाळेतील विदयार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन चिकित्सिक, खिलाडू वृत्ती व बौध्दिक क्षमतेचा विकास व्हावा हा उददेश डोळयासमोर ठेवून इतर मागास बहुजन कल्याण सोलापूरच्या सहायक संचालक श्रीम.मनिषा फुले यांच्या मार्गदर्शनाने जिल्हयातील आश्रमशाळेत क्रिडा, सांस्कृतिक, चित्रकला, बुध्दिबळ स्पर्धा व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

सोलापूर जिल्हयातील एकूण ९७ आश्रम शाळा असून त्याचे चार विभाग करुन त्या स्तरावर स्पर्धा संपन्न झाल्या. परमेश्वर प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा कामती ता. मोहोळ येथे जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले होते. प्रत्येक विभागातून प्रथम तीन याप्रमाणे ३६ शाळांनी जिल्हा स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदविला.

माध्यमिक गटातून नागनहळळीच्या जमीर जमादार, जुबेर जमादार व बसवराज आजूरे यांनी Multipurpose griculture Equipment या वैज्ञानिक उपकरणाची निर्मिती केली. त्यास प्रथम क्रमांक प्राप्त झाले. हे उपकरण सौर उर्जेवर कार्यान्वित होत असून शेतातील तण काढण्यासाठी, पिकावरील औषध फवारणीसाठी व शेती कामासाठी वापर करता येते. हे यंत्र रिमोट कंट्रालव्दारे लांब राहून नियंत्रित करता येते. तसेच जे यंत्राव्दारे कार्य चालू आहे ते कॅमेराव्दारे आपल्या मोबाईलच्या स्क्रिनवरती पाहता येते.



उच्च माध्यमिक गटातून विज्ञान शाखेतील जोहा पिरजादे, तस्मिया बागवान व साधना काळे या विदयार्थीनींनी Smart Shoes For Blind Person या वैज्ञानिक उपकरणाची निर्मिती केली. याचा उपयोग सम ाजातील अंध व्यक्तींना पायी चालत असताना पुढे येणारे अडथळयाची माहिती सेन्सरच्या म ाध्यमातून संदेश प्राप्त होतो. यामध्ये जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर केल्याने कुंटुंबातील इतर व्यक्तीना अंध व्यक्ती कोठे आहे याची माहिती मिळते. जिल्हा स्तरावरील चित्रकला स्पर्धे त श्वेता प्याटी या विदयार्थीनीने प्रथम क्रमांक पटकावले. या विदयार्थ्याना विज्ञान शिक्षक प्रा. नवले, प्रा. पाटील, प्रा.वशीम शेख, प्रा. श्रीम. मिठारी, शिक्षक बशेटटी , शिक्षक मोहन गुरव, प्रयोगशाळा सहाय्यक नुरुददीन शेख यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विदयार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेचे सचिव जावेद पटेल, प्राचार्य मुजावर आय. एम., मुख्याध्यापक रईस अहमद शेख व प्रशालेतील सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले.

## मंगळवेढा पोलिस ठाण्यात ४१ अर्ज काढले निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ११ जानेवारी-**

मंगळवेढा पोलिस ठाण्यात आयोजित केलेल्या द्वितीय तक्रार निवारण दिनानिमित्त वरिष्ठ कार्यालयाकडून नागरिकांचे प्राप्त अर्ज शनिवारी अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्या उपस्थितीत ४१ अर्ज निकाली काढण्यात आल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले.

सोलापूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सन २०२५ या नवीन वर्षानिमित्त नागरिकांच्या तक्रारीचे स्थानिक पातळीवरच निराकारण व्हावे या उदात्त हेतूने तक्रार निवारण दिन प्रत्येक शनिवारी आयोजित केला आहे.

त्याप्रमाणे दि.११ जानेवारी रोजी द्वितीय तक्रार निवारण दिन मंगळवेढा पोलिस ठाण्यात साजरा करण्यात आला. या दिवशी वरिष्ठ कार्यालयाकडे शहर व ग्रामीण भागातील ४१ नागरिकांनी आपल्या विविध तक्रारी लेखी अर्जाद्वारे मांडल्या होत्या. हे सर्व अर्ज मंगळवेढा पोलिस स्टेशनकडे प्राप्त झाल्याने त्या अर्जांचा आज अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

यावेळी पोलिस निरीक्षक महेश ढवाण, पोलिस उपनिरीक्षक विजय पिसे, पोलिस उपनिरीक्षक नागेश बनकर, गोपनीय विभागाचे पोलिस हवालदार दिगंबर गेजगे, बोराळे बीटचे पोलिस हवालदार महेश कोळी, पोलिस हवालदार सर्जेराव वाघमोडे, पोलिस अंमलदार खंडप्पा हत्ताळी आदी उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शिक्षक विशाल रेपाळ यांच्या बहुपयोगी विदुषकाची राज्यस्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ११ जानेवारी-**

६ ते ८ जानेवारी दरम्यान वडाळा,सोलापूर येथील ५२व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विशाल विष्णुदास रेपाळ उपशिक्षक जि.प.प्रा. शाळा अलंकापुरी,करकंब यांनी शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेत प्राथमिक शिक्षक गटातून पंढरपूर तालुक्याचे प्रतिनिधित्व केले.

या स्पर्धेत त्यांनी तयार केलेल्या 'बहुपयोगी विदूषक' या साहित्यास जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळाला असून अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाकरिता विशाल रेपाळ यांची निवड झाली आहे.घोकमपट्टीपेक्षा प्रत्यक्ष पाहण्यातून, कृतीतून घेतलेले ज्ञान हे चिरंतन टिकते.हा विचार समोर ठेवून विद्यार्थ्यांना अध्ययनात येणाऱ्या अडचणी व त्यांची आवड लक्षात घेऊन त्यांना कृतीतून समजण्यास सोपे जाईल अशा




विविध संकल्पना या बहुपयोगी विदूषकाम ध्ये आहेत. इयत्ता १ली ते ५वीच्या विद्यार्थ्यांना अवघड वाटणारे गणिताचे सर्व संबोध,संकल्पना,स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या क्लृप्त्या तसेच मराठी व इंग्रजीचे व्याकरण विद्यार्थ्यांना हसत खेळत मनोरंजक पद्धतीने अधिक सोपे करून शिक्षकांना शिकवता येईल,सर्व विद्यार्थ्यांनाही आनंदाने शिकता येईल असे विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य या एकाचं विदूषकामध्ये आहे.

प्रदर्शन पाहायला आलेले आणि सहभागी असलेले सर्व विद्यार्थी व शिक्षकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू हा 'बहुपयोगी विदूषक' ठरला. परीक्षकांनासुद्धा या शैक्षणिक साहित्याने भुरळ घातली.आकर्षक वाटणाऱ्या विदूषकाच्या तोंडापासून पायापर्यंत विविध ठिकाणी असणाऱ्या नाविन्यपूर्ण संकल्पना तितक्याच कल्पकतेने, सृजनशीलतेने, कलात्मकपणे मांडल्याम ुळे सर्व संकल्पनांची उत्साहात प्रश्न उत्तरांची देवाण-घेवाण करत परीक्षकांनी बारकाईने परीक्षण केल्यानंतर या उद्देशीय विदूषकाची राज्यस्तराकरीता निवड करण्यात आली.

**सचिन जगताप यांचा सन्मान**

यापूर्वी मॅजिक बॉक्स, बहुपयोगी रोबोट या शिक्षक रेपाळ यांच्या शैक्षणिक साहित्यास राज्यस्तरावर द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळाला आहे. चौथ्या वेळेस राज्यस्तरावर त्यांच्या साहित्याची निवड झाली आहे. प्रदर्शनातील या यशाबद्दल सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्याकडून ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. पंढरपूर तालुका गट शिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, पेहे केंद्राचे केंद्रप्रमुख दशरथ मोरे, पेहे, करकंब केंद्र व तालुक्यातील शिक्षकांनी विशाल रेपाळ यांचे अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त



### जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये कोनापुरे प्रशाला अव्वल

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद सोलापूर व लोकमंगल महाविद्यालय वडाळा (ता. उत्तर सोलापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ वे सोलापूर जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन सन २०२४-२५ दिनांक ६ ते ८ जानेवारी दरम्यान पार पडले. या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये श्री पंचलिंग शिक्षण प्रसारक मंडळ आहेरवाडी संचलित, श्री मलप्पा कोनापुरे प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी दिनेश निंबणा वाघमारे यांनी बनवलेल्या बहुउपयोगी कृषी यंत्र या उपकरणाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून लोकमंगल प्रतिष्ठानकडून प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, रोख दहा हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याकामी प्राचार्या संध्या कुनाळे, प्राध्यापक गुरुनाथ दिंडोरे, सहशिक्षिका रेणुका बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. विज्ञान प्रदर्शनामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष शिवानंद कोनापुरे, उपाध्यक्ष प्रभाकर दिंडोरे, सचिव गौरीशंकर बाके, खजिनदार भिमाशंकर कोनापुरे, ज्येष्ठ संचालक काशिराया बोरुटे, शिवनिंगपा बिराजदार, फाजल बेग, संगीता कांबळे, प्राचार्या संध्या कुनाळे, पर्यवेक्षक विश्वनाथ गावडे यांनी अभिनंदन केले.

### प्रलंबित शिष्यवृत्तीसाठी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज करा : अदिवासी विकास विभाग

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील शिष्यवृत्ती/फ्रिशीप योजनेंतर्गत प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्याबाबत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत ऑफलाईन अर्ज दि.३१ जानेवारी २०२५ पर्यंत सादर करावेत, अशी माहिती एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी सागर नन्नवरे यांनी दिली. यासाठी आधार नोंदणी न केल्याने महाडीबीटी प्रणालीवर अर्ज नामंजूर झाले आहेत, त्यांचे आधार प्रमाणपत्र सादर करुन ऑफलाईन अर्ज करता येईल. अधिक माहितीसाठी या कार्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) सरतापे व्ही. वाय. (भ्रमणध्वनी क्र. ८६६८७७४२५४) यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.



### पूर्व विभाग वाचनालयाच्या ग्रंथ प्रदर्शनाला १५०१ वाचकांची उपस्थिती

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा, या उपक्रमा अंतर्गत पाच दिवसाच्या कालावधीमध्ये वाचनालयाच्या विणकर सभागृहामध्ये ग्रंथ प्रदर्शनात पाच दिवसात १५०१ वाचकांची उपस्थिती लाभली. लेखक वाचक मेळावा आणि ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य राजेंद्र शेंडगे यांनी केले. या प्रदर्शनामध्ये सौ भू म पुल्ली कन्या प्रशाला आणि कनिष्ठ महाविद्यालय , कुचन प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, श्री नीलकंठेश्वर प्रशाला, श्री चौडेश्वरी प्रशाला, डी आर इंग्लिश मीडियम स्कूल, कै.आ.ह. आब्बा प्राथमिक शाळा इत्यादी परिसरातल्या शाळेच्या विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. अध्यक्ष पांडुरंग दिड्डी म्हणाले, कोणतीही वर्गणी न भरता फक्त रु ५० डिपॉझिट भरून शाळेतल्या विद्यार्थ्यांना सभासद होता येते आणि पुस्तक वाचता येते. ज्येष्ठ विश्वस्त जनार्दन कारमपुरी यांनी वाचनाबद्दलचे आपले मत व्यक्त केले. परिसरा तल्या सर्व शाळांनी भेटी दिल्याबद्दल कार्यवाह अरविंद चिन्नी यांनी त्यांचे आभार मानले.



### द न्यूज प्लस चॅनेलच्या कार्यालयाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

कष्ट, चिकाटी आणि प्रामाणिक पणामुळे द न्यूज प्लस चैनल प्रगतीपथावर जात आहे. अशी प्रशंसा मेट्रो कास्ट नेटवर्कचे सर्वेसर्वा नागेश छाब्रिया यांनी केले. मेट्रो कास्ट नेटवर्क अंतर्गत असलेल्या द न्यूज प्लस चॅनेलच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन मेट्रो कास्ट नेटवर्कचे सर्व्हेसर्वा नागेश छाब्रिया यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी छाब्रिया बोलत होते. याप्रसंगी मेट्रो का नेटवर्कचे प्रमुख सुमुख छाब्रिया तसेच मेट्रो कास्ट नेटवर्कचे संचालक रविंद्र पाटील, जनरल मॅनेजर संतोष परबतराव, चॅनेलचे संचालक तात्यासाहेब पवार, उमाकांत चौंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सातरस्ता येथील द मिलेनियन स्केअर येथील इमारतीत हा कार्यक्रम नुकताच पार पडला. याप्रसंगी द न्यूज प्लस चैनलचे वृत्तसंपादक जयपाल खेडकर, जाहिराती विभागाचे प्रमुख सलीम पटेल, एडिटिंग वसीम शेख, उपसंपादक बालाजी चीटमिल, सहाय्यक मॅनेजर बसवराज बिराजदार, टेक्निकल विभागाचे प्रमुख संतोष चोरमुले, नबीलाल पटेल, उद्धव नगशेट्टी, नागेश खरटमल, रवि साखरे, नितीन भोसले, सुनिल वाघमारे यांच्यासह परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संजय कुलकर्णी तर आभार तात्यासाहेब यांनी मानले.

# बाजार समितीच्या निवडणुकांना भाजपा आमदारांनीच दिला खो

**● नवीन मतदार यादी तयार केल्यानंतरच निवडणूक घेण्याची केली होती मागणी**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.११ जानेवारी-**

राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आपल्या पदाचा पदभार घेतल्यानंतर तातडीने पणन विभागातील अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. या आढावा बैठकीत मंत्री रावल यांनी विविध प्रस्तावांवर सकारात्मक चर्चा केली. तसेच राज्यातील विविध बाजार समित्यांची होऊ घातलेल्या निवडणुकीबाबत देखील आढावा घेऊन, नवीन मतदार यादी जाहीर केल्यानंतरच निवडणूक घेण्याच्या सूचना देखील त्यांनी यावेळी केल्या.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक देखील यापूर्वीच पुढे ढकलण्याचे आदेश पणन विभागामार्फत देण्यात आले होते. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत बाजार समितीच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली होती. मात्र त्यामध्ये वाढ करण्यात आली असून नवीन मतदार यादी जाहीर झाल्यानंतरच निवडणुकीची पुढील प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यासाठी नवीन मतदार यादी तयार करण्याचे कामकाज सुरू करण्याचे सूचना देखील यावेळी देण्यात आल्या आहेत.

राज्यातील विविध बाजार समिती प्रशासनाच्या वतीने बाजार समितीमधील विविध विकास कामे व सुधारणा बाबतचे प्रस्ताव पणन संचालकांकडे दाखल झालेले आहेत. या प्रस्तावांवर मंत्री जय कुमार रावल, पणन संचालक तसेच उपसंचालक आणि इतर अधिकाऱ्यांशी चर्चा करून अंतिम अहवाल सादर करण्याच्या सूचना देखील मंत्री रावल यांनी दिल्या आहेत. त्याचप्रमाणे पणन विभागातील प्रलंबित विषयांयावर देखील साधक-बाधक चर्चा करण्यात आली. विभागातील विविध प्रलंबित विषय तात्काळ मार्गी लावण्याचे आदेश देखील यावेळी देण्यात आले आहे.



पणन मंत्री जयकुमार रावल यांनी बैठक घेत अधिकाऱ्यांना दिल्या सूचना.

**भाजपाच्या आमदारांनीच निवडणूक पुढे ढकलण्याची केली होती मागणी**

सत्ताधारी भाजपच्या आमदारांनीच बाजार समितीची निवडणूक पुढे ढकलावी अशी मागणी केली होती. अशी माहिती समोर आली आहे. सत्ताधारी आमदारांनी ही मागणी केल्याने मुख्यमंत्री व पणन मंत्र्यांना साहजिकच बाजार समितीची निवडणूक पुढे ढकलावी लागलेली आहे. त्यामुळे पणन विभागाचा निवडणूक पुढे ढकलण्यात कोणताही रस नव्हता असे देखील यावेळी सांगण्यात येत आहेत.

**विविध सुधारणा प्रस्ताव पणन विभागाकडे दाखल**

राज्यातील विविध बाजार समितीमधील सुधारणांचे प्रस्ताव पणन संचालक कार्यालयाकडे दाखल झाले आहेत. सोलापूर बाजार समिती मधील देखील सुधारणा प्रस्तावांचा यात समावेश आहे. सादर झालेल्या अशा या विविध प्रस्तावांवर आढावा बैठक घेण्यात आली. सुधारणा आणि विकास कामाचे प्रस्तावांना मंजुरी देण्यात येऊन अंतिम अहवाल सादर करावेत. अशा सूचना आढावा बैठकीत मंत्री जयकुमार रावल यांनी पणन विभागातील अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**मतदारांची संख्या वाढणार तर परवाना रद्द झालेले मतदार कमी होणार**


सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये नवीन मतदारांची संख्या वाढण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. काही नवीन व्यापाऱ्यांना परवाने जारी केल्याने सुमारे ८५ मतदारांची संख्या वाढणार आहे. तर काही व्यापाऱ्यांची परवाने सेस रक्कम अदा केली नसल्याने त्यांची परवाने रद्द करण्यात आली आहेत. परवाने रद्द करण्यात आल्याने त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येतील. त्याच पद्धतीने जिल्हाधिकाऱ्यांनी काही ग्राम पंचायतीमधील सदस्यांचे सदस्यत्व रद्द केल्याने त्यांची नावे देखील मतदार यादीतून वगळण्यात येतील. त्यामुळे नवीन मतदार यादी जाहीर झाल्यानंतर मतदारांची संख्या करणार आहे.


# कर्ज लाटणाऱ्या आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी -**

मजरेवाडी येथील सोलापूर महापालिका हद्दीतील नवीन सिटी सर्वे नंबर १५०/१ब/१अ/१ या मिळकतीच्या मालक म्हणून नाव नसताना सुद्धा बँकेशी संगणमत करून बनावट गहाणखत करून एक कोटीची रक्कम लाटल्या प्रकरणी दाखल गुन्ह्यातील मुख्य आरोपी तोहिद आय्युब शेख (वय ५०, रा. जोडभावी पेठ सोलापूर) याचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा न्यायाधीश जे जे मोहिते यांनी फेटाळला.

यातील फिर्यादीची व त्यांच्या कुटुंबीयांच्या मालकीची मजरेवाडी येथील सोलापूर महापालिका हद्दीतील नवीन सिटी सर्वे नं. १५०/१ब/१अ/१ या मिळकतीमधील पश्चिमेकडील ०.२५.३५ आर इतकी मिळकत मालकी हक्क नसताना यातील आरोपी तोहिद आय्युब शेख यांनी सन २०१३ साली निळकंठ बँकेचे तत्कालीन व्यवस्थापक आरोपी हरीश राधाकिशन सारडा यांना हाताशी धरून संगणमत करून व बनावट उतारा तयार करून त्याद्वारे सोलापूर येथील सह. दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त क्रमांक ३६४/२०१३ ने बनावट जादा गहाणखत केले. त्यापोटी ४० लाख अधिक ३५ लाख अधिक २५ लाख असे एकूण एक कोटी रुपयांचे कर्ज निळकंठ बँकेकडून घेतले. अशाप्रकारे यातील आरोपी तोहिद आय्युब शेख याने बेकायदेशीर





फायद्यासाठी तीऱ्हाईतस विक्री करून मिळालेली रक्कम स्वतःच्या आर्थिक लाभाकरिता वापरून जमीन हडप केली म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यामध्ये अटकेची शक्यता निर्माण झाल्यामुळे यातील आरोपी तोहिद आय्युब शेख याने सोलापूर येथील सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. याप्रकरणी सुनावणी होऊन सरकारी वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. याप्रकरणी सरकारतर्फे सरकारी वकील दत्ता पवार, मूळ फिर्यादीतर्फे अॅड. शशी कुलकर्णी, अॅड. ओंकार बुरकुल व अॅड. देवदत्त बोरगावकर तर आरोपी तर्फे अॅड. कदिर औटी यांनी काम पाहिले.



# पत्रकारांकडून समाजात जागल्याची भूमिका : भालशंकर

**भीमशक्ती आदर्श पत्रकार पुरस्काराचे थाटात वितरण**

**● दैनिक तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे यांचा गौरव**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी -**

पत्रकार हा समाजात जागल्याची भूमिका पार पाडत असतो. लोकशाहीचा तो एक महत्त्वाचा स्तंभ आहे. अजूनही वंचित समाज विकासापासून कोसो दूर आहे. अशा घटकांची व्यथा पत्रकाराने आपल्या लेखणी द्वारे प्रभावीमांडून सामाजिक बांधिलकी जपावी, अशी अपेक्षा सेवानिवृत्त अधिकारी विजयानंद भालशंकर यांनी व्यक्त केली.

बहुजनांच्या न्याय हक्कासाठी धर्मनिरपेक्षतेने लढणाऱ्या भीम शक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने पत्रकार दिनाचे औचित्य साधून शहर जिल्ह्यातील १० पत्रकारांना भीमशक्ती आदर्श पत्रकार पुरस्काराने गौरवण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी विचारपीठावर प्रदेश सरचिटणीस सुबोध वाघमोडे, पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस राजा कदम, शहराध्यक्ष उमेश सुरते, जिल्हा महिला अध्यक्ष प्रमिला तूपलोंढे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष सलीम मुल्ला, सामाजिक कार्यकर्त्या सायरा शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस राजा कदम यांनी प्रास्ताविक केले. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भीम शक्तीच्या नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. अध्यक्षीय मनोगतात सुबोध वाघमोडे यांनी पत्रकारांनी सत्याची कास धरावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. सूत्रसंचालन सिद्धार्थ भडकुंबे यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश सुरते यांनी केले.

**यांचा झाला पुरस्काराने सन्मान**

यावेळी दैनिक तरुण भारतचे उपसंपादक किरण बनसोडे, भरत कुमार मोरे, अरविंद मोटे, आप्पासाहेब पाटील, रोहन नंदाने, उमेश कदम, संतोष चितापुरे, विशाल भागे, अमोघसिद्ध व्होनकोरे, अकबर बागवान यांना सन्मानित करण्यात आले. गौरवचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



**पालखी मूर्ती विधीवत पूजाअर्चा... : सोलापूर : श्री सिध्दश्वरामेश्वर यात्रेनिमित्त थोबडे वाड्यात शनिवार सायंकाळी पालखी मूर्ती विधीवत पूजा थोबडे परिवाराने केली.**



**विधी साहित्य वाटप... : सिद्धश्वरामेश्वर यात्रेचे विधी साहित्य वाटप थोबडे वाड्यात सिध्देश थोबडे व मिलिंद थोबडे यांच्या हस्ते करण्यात आले.** (छायाचित्रे : केवल तिवारी)







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्राचार्यांच्या केबीनमध्ये शिवीगाळ करून भांडण

### संगमेश्वर कॉलेजमधील प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

शहरातील सात रस्ता परिसरातील संगमेश्वर कॉलेजमधील प्राचार्यांच्या केबिनमध्ये शिवीगाळ करून भांडण करणाऱ्या सात जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस हवालदार कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विनायक महेश सुरवसे, नरेंद्र मच्छिंद्र साळुंखे, विवेक महेश सुरवसे, पृथ्वीराज सरवदे, प्रमोद खटके, सर्जेराव श्रीरंग चौगुले, अर्जुन सिध्देश्वर भोसले (रा. जोशी गल्ली, रविवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० जानेवारी रोजी दुपारी तीनच्या सुमारास संगमेश्वर कॉलेज येथील प्रिन्सीपल कॅबिनमध्ये विनायक सुरवसे व इतरांनी बेकायदेशीर जमाव जमवून एकमेकांना शिवीगाळ करून भांडण करून कॉलेजमधील सार्वजनिक शांतता भंग केलेली आहे. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक माडे पुढील तपास करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...

### ९ वर्षाच्या बालकाच्या मृत्यू प्रकरणी चालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

देशमुख वस्ती येथे खेळणाऱ्या ९ वर्षाच्या बालकास धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या कारचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मित उर्फ सोहम मुकेश रजपूत (वय ९, रा. शिवजी नगर तांडा, केगाव, ता. उत्तर सोलापूर) असे मृत बालकाचे नाव आहे. याबाबत मुकेश विठ्ठल रजपूत (वय ४४, रा. शिवाजी नगर तांडा, ता. उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कार क्र. केए २८ एन ९९१५ क्रमांकाच्या चालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ डिसेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास देशमुख वस्ती येथील लाईट टॉवरजवळ मित हा क्रिकेट खेळत होता. त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या कार क्र. केए २८ एन ९९१५ च्या चालकाने कार निष्काळजीपणे चालवून मित यास पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात मित हा गंभीर जखमी होऊन मरण पावला. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

### भद्रावती पेठेत हनुमान मंदिरातून ८ हजारांच्या साहित्याची चोरी

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

शहरातील भद्रावती पेठेतील हनुमान मंदीरात चोरट्यांनी चोरी करून ८ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला.याबाबत नागनाथ गुच्चीविरआ गुंडेली (वय ५२, रा. भद्रावती पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गालीम इसामुद्दीन शेख (वय ४२, रा. कोंडा नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० जानेवारी रोजी भद्रावती पेठेतील हनुमान मंदीरातील दत्तांची पितळी मुर्ती, पितळेचा दिवा आणि रोख रक्कम असा ७ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल गालीम शेख याने चोरून नेला. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक सोनवणे पुढील तपास करीत आहेत.

### शेळगीतील ज्वेलरी दुकानातून ६० हजारांचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

शहरातील शेळगी येथील समर्थ ज्वेलरी या दुकानातून चोरट्याने ६० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेली.याबाबत शुभम दत्तात्रय दिक्षित (वय २९, रा. इंदिरा वसाहत, भवानी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ जानेवारी रोजी शुभम दिक्षित याच्या समर्थ ज्वेलरी दुकानात एक हेल्मेट घातलेला इसम आला व त्याने सोन्याचे दागिने खरेदीचा बहाणा करून हेल्मेट न काढता कानातील फुले पाहिजेत ते दाखवा असे म्हणून दिक्षित याची नजर चुकवून ६० हजार रुपये किंमतीचे ६ ग्रॅमचे कानातील टॉप्स, १२ ग्रॅमचे ८ नग कानातील साखळी असे दागिने चोरून नेले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.




### दुचाकीला धडक देणाऱ्या कारचालकाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

दुचाकीला धडक देऊन दोघांना जखमी करणाऱ्या कारचालकाविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सातप्पा मल्लिकार्जुन कोटे (वय ३७, रा. नंदूर, डोणगाव, ता. उत्तर सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चारचाकी वाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ जानेवारी रोजी सातप्पा कोटे हे त्यांच्या एमएच १३ बीके ०२८८ या दुचाकीवरून आई निलाबाई यांना घेऊन घराकडे जात होते. त्यावेळी वेरणा हॉटेलजवळ पाठीमागून आलेल्या चारचाकी वाहनाने कोटे यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये सातप्पा कोटे व त्यांची आई हे दोघेही जखमी झाले. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस हवालदार राठोड पुढील तपास करीत आहेत.

# श्री. सिद्धेश्वरामेश्वर यात्रा काळात दासोहमध्ये असंख्य भाविक घेतात महाप्रसादाचा लाभ

### ● दररोज शेकडो किलो धान्याच्या माध्यमातून शिजवला जातो महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची यात्रा सुरू झाली आहे. यात्रा काळात संपूर्ण महाराष्ट्रसह आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, राज्यातून भाविक सोलापुरात दाखल होतात. सिद्धरामेश्वर महाराजांच्या अक्षता सोहळ्यास उपस्थिती लावतात. या यात्रा काळात श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीच्या यात्री निवासात विसावा घेतात. तर दासोह मध्ये महाप्रसादाचा लाभ घेतात. या यात्रेच्या काळात श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीच्या दासोहमध्ये महाप्रसाद घेण्यासाठी दररोज सकाळ संध्याकाळ भाविकांची मोठी गर्दी असते.

दरम्यान, यासाठी पंच कमिटीच्या वतीने एक महिना अगोदर पासून या यात्रेसाठी दासोहमध्ये लागणाऱ्या विविध साहित्यांची आणि अन्नधान्याची तयारी केली जाते. यासाठी शेकडो टन धान्य विशेषतः गहू तांदूळ रवा तेल आदींसह पालेभाज्या आणि डाळी यांची गरज असते. श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीच्या वतीने या सर्वांची पूर्तता केली जाते. तर काही दानशूर भाविक भक्त अन्नधान्य भाजीपाला तसेच देणगी स्वरूपात मंदिर समितीला सहाय्य करते. सोलापूर सह आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, अशा विविध ठिकाणाहून आलेल्या भाविकांच्या माध्यमातून देणगी तसेच धान्य मंदिर समितीला प्राप्त होते.

दरम्यान, श्रीसिद्धेश्वर महाराजांच्या अक्षता सोहळ्यापासून ते शोभेचे दारूकाम आणि शेवट वस्त्र विसर्जन या धार्मिक विधी पर्यंत मंदिरात भाविकांची मोठी रेलचेल असते. या काळात मंदिर परिसर भाविकांनी गजबजून जाते. होम मैदान येथे करमणुकीसह आकाश पाळणे आणि विविध खाद्यपदार्थ साहित्याचे स्टॉल्स उभारले जातात. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना या माध्यमातून मनोरंजन तसेच आवडत्या खाद्यपदार्थांची चव, चिमुकल्या बोलगोपळ विविध खेळणी व आवडीचे साहित्य खरेदी करण्यासाठी वाव मिळावा यासाठी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीच्या वतीने सलाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील गड्डा यात्रा भरवली जात आहे.



महाप्रसादाचा लाभ घेताना भाविक

#### हजारोंच्या संख्येने भाविक घेतात महाप्रसादाचा लाभ

श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीच्या वतीने दासोह माध्यमातून भाविकांना महाप्रसाद उपलब्ध केला जातो. त्यासाठी एक महिना अगोदर पासून तयार केली जाते. यासाठी विशेषत्वाने गहू, तांदूळ, विविध प्रकारच्या भाज्या, रवा, तेल अन्नधान्य यांची गरज असते. भावी भक्त देणगी स्वरूपात सहाय्य करतात. उर्वरित पंचकमिटीच्या वतीने महाप्रसादाचे व्यवस्था केली जाते.यासाठी स्त्री-पुरुष कर्मचारी कार्यरत असतात यात्रा काळात दासोहमध्ये महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी आबालवृद्ध भाविकांची गर्दी असते.

**-सिद्धेश्वर बामणी, दासोह प्रमुख**
**श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी**



**सोलापूर : यात्रेनिमित्त संस्कार भारती तर्फे नंदीध्वज अक्षता सोहळा रांगोळी पायघड्यासाठी एक हजार किलो विविध रंगाची पन्नास पोती रांगोळी तयारी करण्यात आली.**

## मकरसंक्रांतीनिमित्त बाजारपेठेत गुळाची आवक

### ▸ गुळाचा गोडवा वाढला! दर पोहोचले पन्नाशीच्या घरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जानेवारी -**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुळाच्या मागणीत वाढ होऊन दरामध्ये देखील वाढ झालेली दिसत आहे. ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रा आणि मकर संक्रांति निमित्त गुळाची मागणी वाढलेली आहे. यात्रा आणि संक्रांतीनिमित्त तिळगुळ, शेंगापोळी, असे विविध खाद्यपदार्थ बनवण्यासाठी गुळाचा वापर केला जात असल्याने सणानिमित्त गुळाची मागणी वाढलेली दिसत आहे. मागणी वाढल्याने दरामध्ये देखील वाढ झाल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, बाजार समितीमध्ये गुळाची १०८ क्विंटल इतकी आवक आली होती. आवक झालेल्या गुळाला मार्केट यार्डत सर्वात कमी ३२९६ रू. सर्वात जास्त ४०३२ रू. तर सर्वसाधारण ३९७६ रू असा घाऊक दर मिळत आहे. त्याचप्रमाणे किरकोळ बाजारपेठेत उच्च प्रतीच्या गुळाला साधारणपणे ४५ ते ५० रुपये प्रतिकिलो असा किरकोळ दर मिळत आहे. सणानिमित्त ग्राहकांमधून गुळाची मागणी वाढलेली आहे. जानेवारी महिन्यात गुळाला सर्वाधिक मागणी असते. संक्रांत तसेच यात्रा निमित्त रेवडी, तिळगुळ, शेंगापोळी, चक्की असे विविध खाद्यपदार्थ बनवले जातात. त्यासाठी गुळाचा सर्वाधिक वापर होतो. त्यामुळे यार्डासह शहरातील विविध किरकोळ दुकानात देखील गुळाची मागणी वाढलेली आहे.



#### सणानिमित्त जानेवारी महिन्यात गुळाला मागणी

मकर संक्रांत तसेच ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराज यांच्या यात्रेनिमित्त विविध खाद्यपदार्थ बनवण्यासाठी गुळाचा सर्वाधिक वापर होतो. त्यामुळे ग्राहकांकडून गुळाची मागणी वाढते. जो ग्राहक पूर्वी एक किलो गूळ खरेदी करायचा, तो आता गुळाची ढेप खरेदी करत असल्याने मागणी वाढून दरामध्ये देखील वाढ झालेली आहे. सध्या उच्च प्रतीचा गूळ किरकोळ बाजारपेठेत ४५ ते ५० रुपये प्रतिकिलो याप्रमाणे विक्री केला जात आहे.

**- केदार कुंभार,**
किरकोळ विक्रेते

## सोलापूर बाजार समितीला तीन दिवस सुट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जानेवारी-**

> सिद्धेश्वर यात्रा आणि मकर संक्रांतीनिमित्त बाजारपेठ राहणार बंद

दरवर्षीप्रमाणे यंदाही संक्रात आणि श्री सिध्देश्वर महाराज यांच्या यात्रा काळातील अक्षदा साहेळ्या निमित्त सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीला अधिकृत सुट्टी देण्यात आली आहे. सोमवार दि.१३ आणि मंगळवार दि.१४ जानेवारी असे दोन दिवस सुट्टी देण्यात आली आहे. या दोन सुद्यांना जोडूनच १२ जानेवारी रविवार आला आहे. त्यामुळे यंदा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सलग तीन दिवस बंद राहणार असल्याची माहिती बाजार समिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

दरम्यान, सलग तीन दिवस सुट्या आल्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीमाल बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आणू नये, असे आवाहन बाजार समितीकडून करण्यात आले. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज यांची यात्रा सुरु असून संक्रात आणि अक्षदा सोहळ्यासाठी बाजार समितीतील सर्व व्यापारी जात असतात. त्यामुळे बाजारपेठ ठप्प असते. तर या दोन सुट्यांना जोडूनच रविवार आला आहे. त्यामुळे सलग तीन दिवस बाजार समिती बंद राहणार आहे.

## अणदूर येथे मंगळवारी दीपस्तंभांचा कृतज्ञता सन्मान सोहळा

### जय मल्हार पत्रकार संघातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ११ जानेवारी-**

धाराशिव जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या जय मल्हार पत्रकार संघाचा मकर संक्रांत १४ जानेवारी रोजी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा व अणदूर येथील दीपस्तंभाचा कृतज्ञता सन्मान सोहळा आयोजित केला असून या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक चंद्रकांत हगलगुंडे यांनी केले आहे.



गेल्या पंधरा वर्षापासून जय मल्हार पत्रकार संघ विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करीत आहे. नारी सक्तीचा सन्मान, नवरत्नांचा सन्मान, हलगी महोत्सव, कोरोना काळात जनजागृती अभियान, अणदूररत्नाचा सन्मान अशा विविध उपक्रम राबवून जिल्ह्यात अग्रेसर ठरलेल्या या पत्रकार संघाचा विविध स्तरातून कौतुक केले जाते. १४ जानेवारी रोजी सकाळी साडेबारा वाजता हुतात्मा स्मारक येथे दिनदर्शिका प्रकाशन सोहळा व अणदूरमधील राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून ९० वर्षे पूर्ण करणाऱ्या दीपस्तंबाचा सन्मान सोहळा आयोजिला असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नीळकंठेश्वर मठाचे मठाधिपती शिवयोगी शिवाचार्य महास्वामी तर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहध्यक्ष सद्गुरु हभप गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते सोहळ्याच्या आयोजन केले आहे.

#### यांचा होणार सन्मान

या विषय सोहळ्यात माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, बाबुराव कुलकर्णी गुरुजी, नीलकंठ नरे गुरुजी, बाबुराव घोडके गुरुजी यांचा सन्मान केला जाणार असून या कार्यक्रमास तुळजापूरचे आ. राणा जगजीतसिंह पाटील, तुळजाभवानी साखर कारखान्याचे चेअरमन सुनील चव्हाण, सरपंच रामचंद्र आलुरे, डॉ. जितेंद्र कानडे, डॉ. नागनाथ कुंभार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जाणून घेतल्या समस्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जानेवारी-**

> सेवानिवृत्तीसह इतर लाभाचे प्रस्ताव सहा महिने अगोदर सादर करण्याच्या दिल्या सूचना

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषदेसोबत निगडित विविध विभागातील कर्मचारी, शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन कर्मचाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या. प्रलंबित पदोन्नती, सेवाज्येष्ठता, कालबध्द पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना यासंदर्भात येत असलेल्या अडचणी मांडण्यात आल्या.

दरम्यान, जिल्हा परिषद आस्थापनेत कार्यरत सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीसह इतर लाभाचे प्रस्ताव सहा महिने अगोदर निवृत्तीवेतनाचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत. त्यामुळे सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन तात्काळ मिळेल. याबाबत जिल्हा परिषद विभागप्रमुखासह पंचायत समिती पातळीवरील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. असे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले.

# सोलापूरची पत्रकारिता उच्चतम दर्जाची

### ● महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार

### आर्यनंदी आदर्श पत्रकार पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

सोलापूरची पत्रकारिता ही उच्चतम दर्जाची आहे. समाजभान आणि समाज हित जोपासणारी विकासात्मक पत्रकारिता आहे. विद्यार्थ्यांचे वाचन कमी झाले आहे. वाचन संस्कृती वृद्धीगत झाली पाहिजे. पत्रकार समाजप्रबोधन करतात. चुकीच्या व चांगल्या गोष्टी समाजासमोर आणतात. सोलापूरला पत्र महर्षी रंगाअण्णा वैद्य यांच्यासह पत्रकारितेची चांगली परंपरा आहे. वृत्तपत्राचे महत्त्व कमी होणार नाही, असे असे प्रतिपादन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले.

आर्यनंदी परिवार संचलित आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था व आर्यनंदी एज्युकेशन ॲन्ड रिसर्च फौंडेशन, सोलापूरच्या वतीने आर्यनदी नागरी सहकारी पतसंस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्ष आणि पत्रकार दिनानिमित्त आर्यनंदी आदर्श पत्रकार पुरस्कार वितरण सोहळा महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी शिवस्मारक सभागृहात थाटात पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आर्यनंदी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले, आर्यनंदी निधीच्या संचालिका डॉ. शिल्पा फडकुले, दैनिक तरूण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, पत्रकार संजय पाठक, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, निवड समिती सदस्य पत्रकार विजय गायकवाड, उपाध्यक्ष बाहुबली दुरूगकर, संस्थेचे संचालक प्रा. प्रेमचंद मेने आदी उपस्थित होते. यावेळी संपादक प्रशांत माने म्हणाले, आर्यनंदी परिवाराने समाज जडणघडणीत मोठे योगदान दिले आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत विविध क्षेत्रात कौतुकास्पद कार्य केले आहे.

प्रास्ताविकात संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले म्हणाले, मागील २५ वर्षापासून ही पतसंस्था कार्यरत असून, स्थापनेपासून ऑडीट वर्ग अ मध्ये आहे. पतसंस्था फक्त आर्थिक क्षेत्रातच कार्यरत न राहता सामाजिक, सहकार, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला व क्रीडा अशा सर्व क्षेत्रात परिवर्तनशील व उल्लेखनीय कार्य करत असल्याचे सांगितले. प्रारंभी प. पू. १०८ आचार्य आर्यनंदी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विजय गायकवाड यांनी पत्रकारितेवर कविता सादर केली. सूत्रसंचालन दिपाली दुरुगकर यांनी तर आभार प्रदर्शन संस्थेचे संचालक प्रा. प्रेमचंद मेने यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे संचालक निलेश एखंडे, मनोहर नारायणकर, प्रविण बुर्से, अनुपमा रणदिवे, सल्लागार सदस्य मोहनदास गुमते, अशोक भालेराव, मंजिरी सवळे, विलास कटके व आर्यनंदी परिवार व पत्रकार कुटुंबीय उपस्थित होते.




#### शहरातील बाजारपेठांची रात्री स्वच्छता

अतिरिक्त आयुक्त रवी पवार पुढे म्हणाले, सोलापुरात महापालिकेच्या वतीने ११७ रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. नागरिकांनी स्वच्छतेसाठी सहकार्य करावे. सोलापूर शहरात स्वच्छता मोहीम सुरूच राहणार आहे. भविष्यात १४० रस्त्यांची स्वच्छता करणार असून भारतात सोलापूर शहर स्वच्छतेमध्ये पहिल्या पाचव्या क्रमांकावर आणण्याचा प्रयत्न आहे. शहरातील २६ बाजारपेठ निवडण्यात आले असून या ठिकाणी रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत स्वच्छतेची कामे हाती घेण्यात येणार आहेत.येत्या सोमवारी त्याचा शुभारंभ होईल. कचरा व प्लास्टिक मुक्त सोलापूर शहर करण्याचा आमचा संकल्प आहे ट असेही पवार म्हणाले.

#### या पत्रकारांचा झाला सन्मान

संजय जाधव, संतोष चितापुरे, रामेश्वर विभुते, काशिनाथ वाघमारे, विजय थोरात, संतोष अचलारे, विशेष गौरव : चंद्रकांत मिराखोर, सादिक इनामदार सन्मानचिन्ह, शाल , पुष्पगुच्छ व भेटवस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



## 'कोहिनूर'मध्ये १५ जानेवारीला प्रदर्शन

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**


नवीन वर्षाचे औचित्य साधून बुधवार दि. १५ जानेवारी रोजी कोहिनूर टेक्निकल इन्स्टिटयूट मध्ये भव्य टेक्निकल प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनासाठी प्रवेश विनामूल्य आहे.

हे प्रदर्शन सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत कोहिनूर टेक्निकल इन्स्टिटयूट, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, पांजरापोळ भवन, एस टी स्टॅन्ड जवळ, सोलापूर येथे भरवण्यात येणार आहे. या प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे असे संस्थेतर्फे आवाहन करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी ९३२४९३४३५८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १००१

**तारिला आजामीळ ।**
**महापापी की चांडाळ ।।**

सर्व चांगल्या गुणांचा संगम असलेला आणि अवगुणांना अजिबात थारा नसलेला जीव संसारात सापडणे तसे कठीण आहे. कारण संसार म्हटला की कळत न कळत मी हा आलाच आणि मी आला म्हणजे थोड्या फार प्रमाणात का होईना ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार, माया, लोभ, स्वार्थ आदि किंवा आदिपैकी कांही हे आलेच. हे सत्य असले तरी जेव्हा जीवाला जीवनातील कोणत्याही पायरीवर देह हा मिथ्या असल्याची जाणीव होते आणि देहामुळे निर्माण झालेले ईर्षा, द्वेष,मत्सर, काम, क्रोध, आदि सुध्दा मिथ्या वाटू लागतात तेव्हा त्याच्याकडून जे कांही घडते ते चांगलेच घडते. चांगल्या वर्तनाची सुरुवात म्हणजे समता, बंधुता, निस्वार्थ प्रेम, कर्तव्य रुपी पांडूरंगाचे त्याच्या जीवनात आगमन होणे होय. महापातकांच्या राशीची जाणीव होऊन सत्याकडे पाऊल उचललेल्या आजमिळाचा जर उध्दार होऊ शकतो, तर संसारात लहान सहान पातक केलेल्यांचा उध्दार होणार नाही काय? या जीवाचाही उध्दार होईल त्यासाठी या जीवाने संत समागम करून सत्याची कास धरावी असे सेनाजींना वाटते. संत सेनाजी म्हणतात,



**तारिला आजामीळ । महापापी की चांडाळ ।।**
**पतित - पावन । करी नाम हे जतन ।।**

चांगल्यांच्या पोटी जन्माला आला म्हणून चांगला आणि वाईटांच्या पोटी जन्माला आला म्हणून वाईट असे होत नाही. अर्थात जन्मत: कोणीही वाईट नसतो. त्याचे चांगुलपण किंवा वाईटपण हे त्याच्यापासून घडणाऱ्या आचार-विचारावर अवलंबून असते. चांगल्या व्यक्तिला वाईटाचा संग लागला तर चांगला व्यक्ति वाईट होऊ शकतो. तसेच वाईट व्यक्तिला चांगल्याचा सहवास लाभला तर वाईट व्यक्ति चांगला होत असतो. पंढरीचा पांडूरंग हा समचरणी उभा राहून समता, बंधुता, निस्वार्थ प्रेम आणि कर्तव्याचा संदेश देतो. या पांडूरंगाचा ज्याला सहवास लाभला किंवा जो पांडूरंगाच्या अपेक्षांची पूर्ती स्वत:च्या वर्तनातून करतो, त्याचा उध्दार होतो, असे सेनाजींना वाटते. पंढरीचा पांडूरंग हे चांगुलपणाचे अत्युच्च टोक आहे. त्याचबरोबर हा पांडूरंग मानवतेचा, माणुसकीचा, प्रेमाचा सागर आहे. या सागरात मन:पूर्वक न्हाण्याचा प्रयत्न करणारा ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, माया, अहंकार, स्वार्थ, लोभ आदिच्या मळीतून मुक्त होतो.

**जय जय राम कृष्ण हरी.**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १२ जानेवारी २०२५ | |
| विक्रम संवत् २०८०-८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४६ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - पौष | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| शु. द्वादशी - (०८.२१) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - शिशिर | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - रोहिणी (१२.२९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - शुक्ल (११.४८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - कौलव (१९.२६) | |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हम खास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# धान्य वाटपात शहराची हॅट्रिक; ग्रामीण भागात मात्र बोजवारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे रेशन दुकानातून गोरगरीब नागरिकांना वेळेत धान्य वाटपात सोलापूर शहर अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाने राज्यात सलग तीन महिने प्रथम येण्याची हॅट्रिक केली आहे. त्या तुलनेने मनुष्यबळ उपलब्ध असतानाही ग्रामीण भागात मात्र धान्य वाटपाचा बोजवारा उडाला आहे.


रेशन प्रणालीतून लाभार्थ्यांना मिळत असलेल्या सकस धान्याची जागरूकता व्हावी याकरिता राज्य शासनाच्या सुचनेनुसार अन्न दिन सप्ताह साजरा केला जात आहे. मागील तीन महिन्यापासून सोलापूर शहरातील अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी धान्य वाटपात सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक पटकावल्याने त्यांच्यावर वरिष्ठांकडून कौतुकाची थाप पडत आहे. पडोळे यांच्या सक्षम कार्यशैलीने पूर्वी हेलपाटे माराव्या लागणाऱ्या नागरिकांना आता वेळेत आणि व्यवस्थित धान्य मिळत आहे. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारींचे प्रमाणही घटले आहे. महिनाभर ग्राहकांची वाट पाहत तर कधी फोन लावून वैतागलेल्या दुकानदारांनी आता आठवडाभरातच धान्य वाटप होत असल्याने समाधान व्यक्त केले आहे.

दुसरीकडे जिल्हा पुरवठा कार्यालयाचे कार्यक्षेत्र मोठे असले तरी जिल्हयात ११ पुरवठा निरीक्षक, अकरा गोदामपाल याव्यतिरिक्त महसूल सहायक, नायब तहसीलदार, तहसीलदार अशा मोठ्या साखळीचे मनुष्यबळ उपलब्ध असतानाही जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाला गेल्या वर्षभरात एकदाही अन्न सप्ताह साजरा करता आला नाही. सोलापूर जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार असोसिएशनने वारंवार विनंती करून व पुणे विभागाच्या पुरवठा उपायुक्तांना लेखी निवेदन देऊनही धान्य वाटपात सुसूत्रता आली नाही. ग्रामीण भागातील दुकानदारांना धान्य वेळेत मिळत नाही. ग्रामीण भागातील दुकानदारांना दुकानात धान्य नसताना किंवा धान्य दुकानात पोहोचूनसुद्धा डाटा उपलब्ध नसतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून मशीन लाईव्ह करण्यासाठी सूचना केल्या जातात. मात्र दुकानात धान्य नसताना किंवा इतर तांत्रिक अडचणीतही ग्राहकांना धान्य न देता फक्त पॉस मशीनवर अंगठे घेतल्यास संभ्रम निर्माण होतो. यामुळे दुकानदारांना विनाकारण ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागते.

शहराप्रमाणे ग्रामीण भागातील दुकानातही धान्य वेळेत मिळावे, दुकानात धान्य पोहचताच विक्री करण्यासाठी डाटा उपलब्ध करून द्यावा अशी मागणी सोलापूर जिल्हा संघटनेने करूनही १ हजार ५५६ दुकानांपैकी केवळ १ हजार ४० दुकानात धान्य पोहोच झाल्याचे कळते. पॉस मशीनवर डाटा उपलब्ध नसल्याने ८५४ मशीन नाममात्र चालू करूनही ४ लाख २२ हजार ६१ कार्ड संख्यापैकी फक्त ६ हजार ८५ लाभार्थ्यांना धान्य वाटप केले आहे. केवळ ३ टक्के धान्य वाटप करत जिल्हा पुरवठा कार्यालयाला समाधान मानावे लागले आहे, ही शरमेची बाब आहे.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

**अलक:- (१८) महासागर**

परम पूजनीय सरसंघचालक नेहमीच म्हणायचे न हिन्दुर्विदेशी भवेत् अर्थात देशातील एकही हिंदू विदेशी नाही. आता तर देश-विदेशातील संघ संमेलनाला वर्तमानपत्र वाले सुद्धा हिंदूमहासागर संबोधतात. वरील घोषणेप्रमाणेच मम दीक्षा हिंदू रक्षा। (माझे ध्येय हिंदू रक्षा) मम मंत्र समानता। (समानता माझा आदर्श) या घोषणा पण प्रचलित आहेत डॉक्टरजी नेहमी म्हणायचे आपल्या शरीरातील दूषित रक्तामुळे अंगावर फोड येतात त्यासाठी रक्त शुद्ध करणारे औषध सिद्ध करावे लागते. तसेच रोज परधर्मीयांकडून होणाऱ्या अत्याचाराच्या कटकटी मिटवण्यासाठी जागृत अनुशासित व स्वाभिमानी हिंदूमहासागर सिद्ध करावा लागेल. आणि त्यासाठीच संघ हीच जीवनगाथा म्हणून प्रत्येकाने अंगीकारावी. भारत माता की जय वंदे मातरम असे नारे देत श्रीनगरच्या लाल चौकात तिरंगा फडकवणारे संघवालेच होते.

**क्रमश:**

# आता संगांयो, श्रावणबाळ योजना लाभार्थ्यांना डीबीटीमार्फत अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा १५०० रुपये अनुदान दिले जाते. सदरचे अनुदान तहसिल स्तरावरुन बँकेत पाठवून निफ्ट-आरटीजीएस व्दारे लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केले जाते. मात्र, आता थेट डीबीटीमार्फत पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान वितरीत केले जाणार आहे.

संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभासाठी यापूर्वी तहसिलकडून संबंधित बँकेत सर्व लाभार्थ्यांची यादी पाठवून त्यानुसार निधी दिला जात आहे. तो निधी बँकेकडून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केला जात आहे. परंतु आता संगायो व श्रावणबाळ लाभार्थ्यांचे अनुदान बँकेच्या खात्यावर थेट डीबीटीमार्फत मिळणार आहे. त्यासाठी संगायो निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचा लाभ घेत असलेल्या पात्र लाभार्थ्यांकडून आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक संकलित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, आपला मोबाईल नंबर आधारशी संलग्न असणे आवश्यक आहे.

संगायो व श्रावणबाळ योजनतील लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र, बँक पासबुक, आधार कार्ड, मोबाईल नंबर इ. आवश्यक कागदपत्रे संबंधित तहसिल कार्यालयाच्या संजय गांधी शाखेत अथवा संबंधित गावचे तलाठी अथवा ज्या बँकेमधून सदर योजनेचा लाभ घेत आहात त्यांचेकडे ३१ जानेवारी २०२५ अखेर पर्यंत जमा करावेत.

# माता रमाईंचा पुतळा बसविण्याचा मार्ग मोकळा

**महाराष्ट्र शासनाच्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञ विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

सोलापूर शहरातील सम्राट चौक नजीकच्या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे माता रमाई यांचा पुतळा बसविण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञ विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

सम्राट चौक परिसरातील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे माता रमाई आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी शहरातील सर्व आंबेडकर अनुयायी,विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष यांची माता रमाई पुतळा बसविण्यासंदर्भात मागणी होती.

त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या पुढाकारातून सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पुतळा ३१४६/ प्र. क्र. ३०८/२९ दि. २ मे २०१७ शासन निर्णय पारित झाला आहे. त्यानुसार सोलापूर महानगरपालिका सर्वसाधारण सभा विषय क्रमांक ६ प्रशासन ठराव दिनांक १३ जून २०२४ च्या अनुषंगाने मुख्य वास्तुशास्त्रज्ञ महाराष्ट्र यांना नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्याकडून माता रमाई यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत चबुतऱ्याच्या आराखड्यास मान्यता देण्याकरिता पत्र सादर करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित विभागास या प्रकरणी सहकार्य करण्याकरता सूचना केल्या. त्यानुसार आज मुंबई येथील बांधकाम भवन या ठिकाणी मुख्य वास्तुशास्त्रज्ञ चेतन आक्रे, उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ अंजली मातोडकर यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांना ना हरकत प्रमाणपत्र सुपूर्द करण्यात आले. पुढील कार्यवाहीस्तव हे ना हरकत प्रमाणपत्र जिल्हाधिकारी सोलापूर व सोलापूर महापालिका आयुक्त यांना पाठविण्यात आले. पुतळा उभारण्यासाठी सर्व परवानगी, ठराव, जागा मालकी हक्काबाबतचे मालमत्ता पत्र, प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, शपथपत्रासह सर्व कार्यालयीन कामकाजाकरिता आयुक्त शितल तेली-उगले, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका आकुलवार, उपअभियंता किशोर सातपुते, उप अभियंता अविनाश वाघमारे, सहाय्यक अभियंता प्रशांत गुंड,आर्किटेक्ट महेश पाटील, महेश केसकर यांचे योगदान लाभले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, उपअभियंता अविनाश वाघमारे, सहाय्यक अभियंता प्रशांत गुंड, धीरज वाघमोडे आदी उपस्थित होते.



# सात रस्ता येथील बस डेपोच्या जागेतील दुकान केले जमीनदोस्त

## डॉ. आंबेडकर चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने सात रस्ता येथील बस डेपोच्या जागेतील दुकान जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त करण्यात आले. तसेच भारतरत्न

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक पर्यंतच्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.



या मोहिमेअंतर्गत आज भूमी मालमत्ता अंतर्गत सात रस्ता येथील बस डेपोच्या जागेतील असलेले दुकान जेसीबीच्या साह्याने जमीन दोस्त करण्यात आले. बस डेपोच्या समोरील बाजूस नवीन पेट्रोल पंप उभारण्यात येत आहे. यामुळे ही कारवाई करण्यात आली. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक पर्यंतच्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत तीन लोखंडी हातगाड्या, लास्टिकसह इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

## केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत शंकरराव निंबाळकर विद्यालयाचे यश


**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. वल्लभ शामराव लोखंडे (पेपर-१ व २), एकनाथ भागवत गुरव (पेपर-१), सूरज प्रकाश जाधव (पेपर-१), ऋषिकेश विष्णू भोसले (पेपर १ व २), मनिषकुमार मोहन शिंदे (पेपर-१ व २), दीक्षा आण्णा पाटील ( पेपर - १), पल्लवी धनाजी पानढवळे (पेपर-१), कलाश्री भगवान पवार (पेपर-१), भाग्यश्री विठ्ठल सुतार (पेपर-१), प्रियंका बाळू लोंमटे (पेपर-१), प्रसाद महादेव जाधव (पेपर-१), केदार अनिल ढगे (पेपर-१). यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार बापू शितोळे, शालेय व्यवस्थापन समिती चेअरमन डॉ. जी. एम. पाटील, सदस्य व्ही. एस. पाटील, प्राचार्य डॉ. डी. पी. गुंड यांनी अभिनंदन केले.

# सोलापुरातील जन्माचा ज्येष्ठांना पश्चाताप

**सोलापूर शहरातील व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी हे कुचकामी ठरत आहेत. जनतेने त्यांना भरभरून मतदान करून निवडून दिले. परंतु, ते स्वत:चच स्वमंगल करून घेत आहेत.**

मग विचार करण्यासारखी गोष्ट आहे आपण यांना मतदान करून निवडून दिलेत हे कशासाठी? लुटून खाण्यासाठी का? जनतेच्या हिताची कामे जर होत नसेल तर ह्यांना घेऊन जाळायचं का? सोलापुरातील जनतेला एक सांगायचं आहे की तुम्ही फक्त यांच्या खोट्या नाट्या आश्वासनाला बळी पडून स्वत:चे व आपल्या मुलाबाळांचे भविष्य अंधारात घेऊन जात आहात यावरून सिद्ध होत आहे. विधानसभा निवडणुकीत आपण घेतलेला अनुभव पाहता असे लक्षात आले की सर्व मिलीभगत आहेत. प्रशासनाच्या बाबतीत सांगायला नको त्यांच्यावर कोणाचेच अंकुश नाही. ते तोऱ्यात वावरत आहेत. जणू काही आम्हीच ह्या शहराचे मालक आहोत, अशा तोऱ्यात फिरत आहेत. देशाचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकार बांधवांनी यांनी प्रशासनाचा मनमानी कारभार, फक्त कागदोपत्री दाखवून शासनाचे करोडो रुपये लाटत आहेत, हे निदर्शनास आणून देऊन त्यांना यांची लायकी दाखवून द्यावी, पण तसे होताना दिसत नाही. सोलापूरच्या आयुक्ता शासन दरबारी पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून आणत आहेत. परंतु खालचे अधिकारी व कर्मचारी हे ठेकेदारांना हाताशी धरून निकृष्ट दर्जाची कामे करून शासनाचा निधी लाटत आहेत हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत आणि फक्त बघतच राहणार का..?



याची अनेक उदाहरण आहेत. ती अशी-

जुळे सोलापूरातील पाण्याची टाकी ते बॉम्बे पार्क जाणारा रस्ता केवळ सहा महिन्यातच उखडून गेला आहे. जागोजागी खड्डे पडलेले आहे. त्यामुळे शासनाचा जवळपास एक करोड दहा लाखाचा निधी अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमत करून निकृष्ट दर्जाचे काम करून अक्षरशः गिळून घेतला. जुळे सोलापुरातील जुना आय.एम.एस. कॉलेजपासून ते सैफुलला जाणाऱ्या रोडची पण तीच अवस्था झाली असून जागोजागी खड्डे पडलेले आहेत. आसरा ब्रिज ते विजापूर रोडला जोडणारा रस्ता तर सांगायलाच नको. एवढे खड्डे पडलेत की महानगरपालिकेच्या बाबतीत सांगायलाच नको सोलापूर शहरातील सात रस्ता असो, नवी पेठ पोलीस चौकी येथे चांगले रस्ते असताना सुद्धा तेथेच वेळोवेळी डांबरीकरण करत आहे. मग जुळे सोलापुरातील आसरा ब्रिज ते विजापूर रोडला जोडणारा रस्ता, सैफुल ते बॉम्बे पार्क जाणारा रस्ता ह्या रस्त्यावर डांबरीकरण का होत नाही..? सोलापूरची जनता संयमी असून त्याचाच फायदा प्रशासन घेत आहे. हे कुठेतरी थांबायला पाहिजे नाहीतर हे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन आपल्या हक्काचा जमा झालेला टॅक्स स्वरूपातला पैसा मिलीभगत करून लुटून खातील हे आपण उघड्या डोळ्यांनी फक्त बघत राहणार आहात काय..? सांगण्याचं तात्पर्य की..अशा भ्रष्टाचारी यांना वेळीच आवर घालून त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी तरच आपल्या सोलापूर शहर व जिल्ह्याचा विकास होईल एवढे मात्र नक्की..

**- अनिल चव्हाण,**
ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते
९८५०६१४०८२



# डॉ. रणशूर यांना 'मृदगंध पुरस्कार' प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

भारतीय मृद विज्ञान संस्था, नवी दिल्ली, शाखा परभणी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्यावतीने सोलापूर येथील विभागीय संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ तथा सहयोगी संशोधक डॉ. नितीनकुमार रणशूर यांना मृदगंध पुरस्कार- २०२४ प्रदान करण्यात आला.

डॉ. रणशूर यांना दिलेल्या मानपत्रात नमूद केले आहे की, मृद विज्ञान विषयात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मृदगंध पुरस्कार-२०२४ च्या प्रित्यर्थ आपणास मानपत्र प्रदान करून सन्मानित करत आहोत.आपण मागील २८ वर्षापासून जमिनीचे भौतिक गुणधर्म, अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन, कोरडवाहू शेती व्यवस्थापन, जैविक खतांचा वापर या सारखे अनेक प्रकल्प मृद विज्ञान विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी जि. अहिल्यानगर येथे राबवून शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक उन्नती होण्यासाठी प्रयत्न केले. मृद विज्ञान या विषयामध्ये विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व आचार्य पदवीसाठी मार्गदर्शन, शोधनिबंध, कृषि विस्तार विषयक मराठी लेख, घडी पत्रिका, पुस्तके व संशोधन शिफारशी अशा विविध माध्यमातून मृद विज्ञान विषयास प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. आपल्या या उल्लेखनीय कार्याबद्दल भारतीय मृद विज्ञान संस्था, नवी दिल्ली, शाखा परभणी आपणास मृदगंध पुरस्कार - २०२४ प्रदान करुन सन्मानित करीत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### राजेशकुमार जगताप यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार प्रदान

**अक्कलकोट, दि. ११ जानेवारी-**

राजेशकुमार जगताप यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय पत्रकार भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. हा सन्मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि पत्रकार हल्ला कृती समितीच्या वतीने पिंपरीतील ग. दि. माडगूळकर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात देण्यात आला. यावेळी प्रसंगी एबीपी 'माझा'च्या संपादक सरिता कौशीक, सिने अभिनेते किरण माने आणि आमदार अमित गोरखे, पद्मश्री गिरीश प्रभुणे, संपादक सचिन जवळकोटे, उद्योजक संजय कलाटे, यशवंत भोसले, वसंत मुंडे प्रदेशाध्यक्ष, विश्वासराव आरोटे सरचिटणीस, संजय भोकरे संघटक, इरफान भाई सय्यद शिवसेना उपनेते यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी वैभव विधाटे, प्रदेश उपाध्यक्ष नितीन शिंदे, शहर अध्यक्ष अतुल क्षीरसागर, उपाध्यक्ष महादेव मासाळ माजी शहर अध्यक्ष, पराग कुंकूलोळ, प्रदेशाध्यक्ष पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती गोविंद वाकडे पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती महिला शहर अध्यक्षा मनीषा थोरात, सचिन चपळगावकर, गौतम वाघमारे, संतोषी वाघमारे, सागर वाघमारे, आनंद चौगुले पत्रकार संघ सदस्य उपस्थित होते. स्वागत नितीन शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन अश्विनी सातव यांनी केले. आभार अतुल क्षीरसागर यांनी मानले.




### शिवसेनेच्या आ. मनिषा कायंदे यांचा अक्कलकोट कामगार सेनेतर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि. ११ जानेवारी-**

सोलापूर येथे शिवसेनेच्या आमदार मनिषा कायंदे यांचा अक्कलकोट तालुका शिवसेना कामगार सेना व अक्कलकोट शहर शिवसेना महिला आघाडीच्या वतीने सत्कार करण्यात आला. शिवसेनेच्या आमदार मनीषा कायंदे या बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथे शिवसेना महिला आघाडीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या महिला संवाद मेळाव्यासाठी आल्या होत्या. यावेळी शिवसेना कामगार सेना अक्कलकोट तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे, अक्कलकोट शहर शिवसेना महिला आघाडी प्रमुख वैशाली हावनूर, शिवसेना कामगार सेना जिल्हाप्रमुख सायबाण्णा तेगेळी, कामगार सेना सचिव शिवानंद कट्टीमनी, वर्षा म्हेत्रे कामगार सेना शहर उपप्रमुख आकाश बबलाद, गंगाबाई स्वामी उपस्थित होते.



### बारामतीतील महिला रुग्णालयास फुले यांचे नाव देण्याची मागणी

**नातेपुते, दि. ११ जानेवारी-**

बारामती येथील शासकीय महिला रुग्णालय चालू होऊन बरेच दिवस झालेले आहे व ते रुग्णालय महिलांसाठी वरदान ठरले आहे. सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीचे औचित्य साधून बारामती महिला रुग्णालयास सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे,अनिकेत मोहिते, मन्सूर शेख, निलेश जाधव यांच्या वतीने बारामती तहसीलदार गणेश शिंदे यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन केली आहे. महिला शासकीय ग्रामिण रुग्णालय बारामती ऐवजी सावित्रीबाई फुले महिला शासकीय ग्रामिण रुग्णालय बारामती असे नामकरण करण्याची मागणी सदर निवेदनात केली आहे.



### कुर्डूवाडीत बीबी फातिमा शेख यांना अभिवादन

**कुर्डूवाडी, दि. ११ जानेवारी-**

कुर्डुवाडी काँग्रेस अल्पसंख्यक विभाग यांच्या वतीने सावित्री बाई फुले यांच्या शाळेत घडलेली पहिली मुस्लिम महिला शिक्षिका बिबी फातेमा शेख यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अॅड. दत्तात्रय लोंढे, काँग्रेस अल्पसंख्यक शहर अध्यक्ष हमिद शिकलकर, मॅनेजर किशोर हजारे, शाबिर शिकलकर, काँग्रेस युवक नेते रितेश त्रिंबके, उमाकांत पारखे व आदी कार्यकर्ते उपस्थीत होते. शेवटी संयोजक हमीद शिकलकर यांनी आभार मानले.

# राजू शेट्टी, सदाभाऊ खोत एकत्र यावेत

## सागर खोत यांची भावना; मोडनिंब येथे रयत क्रांती संघटनेची पत्रकार परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ११ जानेवारी-**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खा. राजू शेट्टी आणि रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी एकत्र यावं, अशी ईच्छा रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांचे सुपुत्र तथा रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सागर खोत यांनी व्यक्त केली.



मोडनिंब (ता. माढा) येथील पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सागर खोत बोलताना म्हणाले की, सोशल मीडियामुळे शेतकरी चळवळी,शेतकरी संघटना यावर परिणाम झाला. शेतकरी चळवळी दुभंगल्यामुळे शेती प्रश्नांचे आतोनात नुकसान झाले. भविष्यात दुभंगलेल्या शेतकरी चळवळी व शेतकरी नेते एकत्रित आल्यास शेतकरी लढ्यास यश येईल. ऊसदर वाढ आंदोलन आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाष्यकरत लक्ष्य वेधले. यावेळी राज्यप्रवक्ते प्रा. सुहास पाटील यांनी युवा शेतकर्यांनी शेतकरी चळवळीत योगदान देण्यासाठी पुढे आलं पाहिजे. शेतकऱ्यांचे प्रश्न रस्त्यावरील आंदोलने करण्यापेक्षा प्रशासनाकडून, राजकीय व्यवस्थेकडून सोडवणूक करून घेण्यासाठी शेतकरी चळवळीत सहभागी झाले पाहिजे असे सांगितले. यावेळी रयत क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष नागेश गायकवाड, मोडनिंबचे शिवाजी सुर्वे यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. रयत क्रांती संघटनेचे सागर खोत, प्रा. सुहास पाटील यांच्या वतीने मोडनिंब प्रेस क्लबच्या नूतन अध्यक्षपदी निवडीसाठी प्रथमेश पवार यांचा सत्कार करण्यात आला. सचिव बाळासाहेब ओहोळ यासह पत्रकार बांधव आणि नूतन कार्यकारणीचा सत्कार करण्यात आला.

### राजगुरुंच्या स्मारकासाठी उदासिनता

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील थोर पुरूषांचे योगदान आहे. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत पुणे जिल्ह्यातील खेड-राजगुरूनगरचे शिवराम राजगुरू यांनी हौतात्म्य पत्करले. त्यांचे स्मारकही गेल्या साठ वर्षात एकाही सरकारने बांधले नाही. अशा बेपर्वाईने वागणाऱ्या राजकीय नेत्यांना खऱ्या अर्थाने धडा शिकवण्याची गरज आहे. पंजाबमध्ये भगतसिंग यांची जन्मभूमि राष्ट्रीय स्मारक म्हणून पर्यटनस्थळ तयार करून ऐतिसिक विचारांच्या वारसांची जोपासना केली आहे.

## कुर्डू येथे चार घरफोड्या; पावणेदोन लाखांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ११ जानेवारी-**

कुर्डू येथे अज्ञात चार चोरट्याने चार जणांच्या घरी चोरी करून सुमारे पावणे दोन लाखांची चोरी केल्याची घटना १० जानेवारी गुरुवारी पहाटे ३ च्या सुमारास आज घडली या घटनेची फिर्याद प्रशांत राजाराम दळवी रा. कुई वय २७ यांनी कुईवाडी पोलीस ठाण्यात दिली असून अज्ञात चोरट्या विरुद्ध कुडूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

खडखड केल्याचा आवाज येत असल्याने मी उठुन आमचे घरातील पाठिमागील खोलीत जावुन पाहिले त्यावेळी चार अनोळखी इसम आमच्या घरातील पेटीतील व इतर सामान विस्कटत होते. त्यावेळी त्यांनी माझेजवळ येवुन ओरडलास तर तुला जिवे मारतो आसा दम देऊन त्यांचेपैकी एक जणाचे जवळ हत्यार होते त्यामुळे मी आरडाओरड केली नाही मी जागीच उभा होतो. त्यावेळी त्यांनी आमचे घरातील पत्याची पेटी घेवुन अंधाराचा फायदा घेत पळून गेले. त्यांनी १,६४,००० रुपये किंमती चे सोन्याचे दागिने चोरीला गेले. आमचे गावातील हिंमत हमजान शेख, रामचंद्र विठ्ठल हांडे, भारत दशरथ झुंडरे (सर्व रा. कुर्डू, ता. माढा) व सुनिता कुंदन लोंढे, सुजाता मधुकर गायकवाड (दोघे रा. कुर्डूवाडी-करमाळा रोड, कुडूवाडी) यांच्या ही घरातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याचे समजले. घटनास्थळाला पोलिसांनी ठसे तज्ज्ञासह भेट देऊन पाहणी केली.

## करमाळामधून जिजाऊ जन्मोत्सवासाठी सिंदखेडराजा येथे हजारो कार्यकर्ते जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ११ जानेवारी-**

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ जन्मोत्सवासाठी १२ जानेवारी होणाऱ्या जयंतीनिमित्त मातृ तीर्थ सिंदखेडराजा येथे करमाळा तालुक्यातील हजारो कार्यकर्ते सिंदखेडराजा येथे जाणार आहेत.



मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे आंतरराष्ट्रीयस्तरावरील जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन मराठा सेवा संघाद्वारे जिजाऊ सृष्टी मात्तृतिर्थ सिंदखेडराजा जिल्हा बुलढाणा येथे १२ जानेवारी रोजी ४२७ वा भव्य आंतरराष्ट्रीय जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन केले आहे. १२ जानेवारी सकाळी ६ वाजता महापूजा (राजे लखुजीराव जाधव यांचा वाडा) सकाळी ७ वाजता भव्य पालखीसह वारकरी दिंडी राजवाडा ते जिजाऊ सृष्टी, सकाळी ९ वाजता शिवधर्म ध्वजारोहण, सकाळी ९ ते १.३० शाहिरांचे पोवाडे, नवोदित वक्ते, सांस्कृतिक कार्यक्रम, विशेष सत्कार, प्रकाशन सोहळा, सिंदखेडराजा येथे भव्य स्वरूपात साजरी होत आहे. देश-विदेशातून जिजाऊ भक्त सर्व जाती-धर्मातील लोक उपस्थित असतात. यावेळी नितीन खटके, सचिन काळे, सुहास पोळ, बाळासाहेब झोळ, अतुल निर्मळ, प्रफुल्लकुमार गोडसे, गणेश कुकडे, संदीप रोडगे, राज झिंजाडे, भीमराव लोंढे, पिंटू जाधव, हेमंत शिंदे, धन्यकुमार गारुडी, निलेश पाटील, पांडुरंग घाडगे, योगेश मोहिते, सौरभ कर्चे, आजिनाथ माने, अजित उपाध्ये, बाळासाहेब तोरमल आदी उपस्थित होते.

## कन्हेरगांव जि. प. शाळेत भरला बाल गोपाळांचा बाजार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ११ जानेवारी-**

माढा तालुक्यातील कन्हेरगांव येथे जिल्हा प्राथमिक शाळेच्या प्रांगणात इयत्ता पहिली ते सातवीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी बाल आनंद बाजार भरविण्यात आला होता. हा बाजार भरविण्याचा मुख्य उद्देश म्हणजे मुलांना व्यावहारिक ज्ञान संभाषण कौशल्य, धीटपणा तसेच कोणत्याही प्रकारचा व्यावसाय करण्यासाठी धाडस प्राप्त व्हावे, यासाठी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्गाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी बाजार भरवला असल्याचे शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा पूनम कांबळे यांनी सांगितले.



या बाजारात विविध प्रकारच्या पालेभाज्या, फळे, कडधान्ये, वडापाव, भजी, कच्ची दाबेली, पाणी पुरी, दालच्या राईस, भेळ, चिक्की, बेकरी पदार्थ, समोसा, पापड्या अशा विविध प्रकारच्या पालेभाज्या सह खाद्य पदार्थांचे स्टॉल मुलांनी लावले होते. यावेळी केंद्रप्रमुख मनोज पवार, कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, सरपंच श्रीकांत बनसोडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा पुनम कांबळे, ग्रामपंचायत सदस्या पद्मजा मोरे, सदस्या अनिता माने, वनिता डोके, वर्षा टिंगरे, राणी बनसोडे, सुजाता मोरे, पूनम हांडे, मोहिनी डोके, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संजय डोके पाटील, आप्पासाहेब लोखंडे, विजय डोके, जालिंदर केदार, बाबुराव डोके, भाऊराव डोके, संजय डोके, नवनाथ ताटे, सदस्य सागर धोत्रे, दादा डोके, अश्विनी घाडगे, प्रवीण खोचरे, कृष्णदेव केदार, बजरंग मोरे, तुषार सरडे, विकास डोके, नागनाथ पाटील, विकास पाटील, उमेश डोके, समाधान डोके, नितीन डोके, रतिलाल केदार, अतुल डोके, एकनाथ माने, मंगेश ताटे, मल्हारी चव्हाण, गणेश जाधव, सुधीर डोके, नाना पाटील, सिद्धेश्वर नलवडे, योगेश माने, नामदेव मोरे उपस्थित होते. या बालआनंद बाजारसाठी केंद्रप्रमुख मनोज पवार, मुख्याध्यापक महादेव जठार, नागनाथ शिंदे, प्रमोद शिंदे, जोतीराम केदार, सतीश शहापुरे, विनोद पलसे, शिवकन्या खोचरे, सविता साळुंखे, इंदुमती गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

### २०० चिमुकल्यांचा सहभाग

या बालआनंद बाजारसाठी जिल्हा परिषद शाळेतील सुमारे २०० चिमुकल्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी पंधरा ते वीस हजार रुपयांची उलाढाल बाजारातून झाली. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

## सोजर स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सोजर इंग्लिश स्कूल, प्राथमिक विभागाचे ३० वे वार्षिक स्नेहसंमेलन यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न झाले.




उद्घाटन लेखक सचिन वायकुळे, नंदकुमार माढेकर, पालक प्रतिनिधी डॉ. प्रिया तोरड, उमाकांत राऊत, मोहन लोहार यांनी केले. प्राथमिक विभागासाठी यावर्षी नव्याने संस्कृत विषय सुरु करण्यात आला. त्या अनुषंगाने संस्कृत शिक्षक प्रसाद सहस्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी सादर केलेल्या संस्कृत श्लोक पठणाने विविध गुणदर्शनाच्या कार्यकमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर गणेश वंदना, भारुड, धनगर नृत्य, तांडव नृत्य, देशभक्ती नृत्य, लावणी, रिमिक्स, रेट्रो डान्स, थीम डान्स, राम आयेंगे, आरंभ है प्रचंड यासारखे बहारदार नृत्याविष्कार सादर करण्यात आले. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, युवा उद्योजक अर्जुनसिंग बारबोले, संस्था प्रतिनिधी उमाकांत राऊत, मोहन लोहार, संस्थेच्या सचिवा कल्पनाताई बारबोले, संदीप पोळ आणि मुख्याध्यापिका रिटा नेटके यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. विविध प्रकारच्या स्पर्धेतील विजेते, स्टुडंट ऑफ द इयर (संज्योत मुसळे), बेस्ट स्पोर्ट पर्सन (हुजैफ पठाण) अत्यंत मानाचा समजला जाणारा पूर्व प्राथमिक विभागाचा सोजर बेस्ट बेबी (तेजस्वी कानडे) आणि बेस्ट बॉय (वेदांश ठोंगे) या पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले. तर हाऊस ट्रॉफीचे मानकरी ठरलेल्या दीपाली देशमुख, चैताली पुराणिक यांच्या ब्ल्यू स्टार या ग्रुपला हाऊस ट्रॉफी देवून गौरवण्यात आले. सूत्रसंचालन प्रसाद सहस्रबुद्धे, तुषार गदगी आणि चैताली पुराणिक यांनी केले तर सोनाली नष्टे यांनी आभार मानले.

## माळेगावच्या महामाता रोकडाई यात्रेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ११ जानेवारी-**

संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या व नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्ध असलेल्या माढा तालुक्यातील माळेगावच्या प्रसिद्ध ग्रामदैवत महामाता रोकडाई देवीच्या यात्रेला आज रविवार १२ जानेवारी पासून भव्य प्रारंभ होत आहे.



ही यात्रा १२, १३ व १४ जानेवारी अशी तीन दिवस चालणार आहे.ही रोकडाई देवीची यात्रा शांकभरी पौर्णिमेस पासून सुरू होते.यावेळी देवीचा छबिना व पालखीची मिरवणूक काढण्यात येते.या यात्रेत विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. देवीची मुर्ती स्वयंभुपाषाणी महिषासुर मर्दिनी आहे कृतयुगात महिषासुर मर्दिनीचे युध्द करतानाचे देवीचे युध्द क्षेत्रावरील स्वरूप दाखविण्यात आलेले आहे.महामाता रोकडाई नवसाला पावणारी देवी अशी ख्याती असल्यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यातून व परराज्यातून भाविक मोठ्या प्रमाणात यात्रेला येतात. मातेच्या स्नान कुंडात अंघोळ केल्याने अनेक त्वचारोग बरे होतात अशी आख्यायिका आहे.भाविक रोकडाई मातेची साडी, चोळी, खण व वाणाने ओटी भरून मातेचा आर्शिवाद घेऊन पुण्य प्राप्त करतात.रोकडाई मातेचे मंदीर स्वंयभू हेमाडपंथी व पश्चिममुखी आहे. मंदिरात १९५२ साली संत गाडगे महाराजांनी भजन किर्तन केले होते. मंदिरावर अकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रोकडाई यात्रेनिमित्त ग्रामपंचायत, यात्रा पंचकमिटी व ग्रामस्थांच्या वतीने पिण्याच्या पाण्याची, दर्शन रांग, विजेची व पार्किंगचे नियोजन चांगल्या प्रकारे केले जाते. यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पथक तैनात करण्यात आले आहे. तसेच कुर्डूवाडी आगाराकडून टेंभुर्णी येथून यात्रा स्पेशल बसची सुविधा पुरविली आहे. यात्रेनिमित्त माळेगाव ग्रामस्थांच्या वतीने जंगी कुस्त्याही ठेवण्यात आल्याचे पंच कमिटी कडून सांगण्यात आले आहे.

# मोडनिंब येथील संजीवन विद्यालयाच्या आनंद बाजारात लाखांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ११ जानेवारी-**

मोडनिंब (ता.माढा) येथील संजीवन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात बालआनंद बाजार मेळावा उत्साहात पार पडला. शाळेतील पहिली ते दहावी विद्यार्थ्यांनी २७१ स्टॉल भाजीपाल्यासह खाद्य पदार्थाची विक्री केली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही यात सहभाग नोंदवला. या बाजारात सुमारे एक लाखांच्या आसपास उलाढाल झाली.



बाल आनंद बाजार मेळाव्यात विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारच्या भाज्या,फळभाज्या व फळे विक्रीसाठी होत्या.खवय्यासाठी खास मेजवानी 'खाऊ गल्ली' म्हणून पाणीपुरी, पॅटीस, चिवडा, पावभाजी,वडापाव,भेळ, ढोकळा, मसाला पापड, फ्रुटी, चहा व मसाला दूध विविध प्रकारचे पदार्थ होते. ओरिसातील जगन्नाथ पुरी येथील स्पेशल मेनू म्हणून खाजा हा पदार्थ या बाल आनंदी बाजारवेळी अनेकांना चव चाखण्यासाठी मिळाला. स्टेशनरी, नित्योपयोगी वस्तू, शालेय वस्तू होत्या. यावेळी पोपट दोभाडा, मोहन पावणे, बाबूराव सुर्वे, दिग्विजय कांबळे, राजू निंबाळकर, राजन सावंत, नितीन गडधरे, मुबारक शेख, निलेश गिड्डे, शिवाज्ञा फायनान्सचे राज पाटील, युवा उद्योजक प्रज्वल बाबर, स्वप्नील गायकवाड, सागर सुर्वे, यश पाटणे, सौरभ माने, वंदना कांबळे, प्राचार्य रणदिवे, मुख्याध्यापक सरडे, प्रा. मुजावर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. सुभाष रणदिवे यांनी केले तर सूत्रसंचालन बंडू लोखंडे यांनी केले. आभार नीलकंठ पवार यांनी मानले.

### विक्रीसाठी संक्रातीचे वाण; ऑनलाईन व्यवहार

बालआनंद बाजार मेळाव्यात विद्यार्थ्यांनी संक्रांतीचे विशेष वाण विक्रीसाठी आणले होते. यामध्ये संक्रातीची भाजी ज्वारीचे, कणीस, गाजर, घेवडा, वांगी, ऊस, बोर, डहाळा, तीळ, बाजरीचे पीठ, तिळगुळ या खरेदीसाठी महिलाची मोठी गर्दी दिसून आली. सर्व प्रकारच्या भाज्या, फळभाज्या व फळे विक्रीसाठी होत्या. संकुलातील बाजारामध्ये क्यूआर कोडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाईन व ऑफलाईन व्यवहाराचे अवगत होण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने व्यवहार सुरू होते.



### गौडगांव येथील जिल्हा परिषद शाळेत चिमुकल्यांचा आनंद बाजार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

तालुक्यातील गौडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.

आनंद बाजाराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते राहुल भड यांनी केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संपतराव भड उपस्थित होते. या बालआनंद मेळाव्यात भेळ, पाणीपुरी, इडली-सांबर, डोसा, पोहे, भजे, समोसे, शेंगदाणा लाडू , सुखी भेळ, चिवडा, क्रीम रोल इत्यादी तोंडाला पाणी सोडणाऱ्या पदार्थाचे तसेच भाजीपाल्याचे स्टॉल लावण्यात आले होते. तसेच चहाचे स्टॉल, स्वहस्ते तयार केलेल्या वस्तू आनंद बाजारमध्ये ठेवण्यात आल्या होत्या. वस्तूंचा भाव करणे, स्वच्छता, दर्जा, ग्राहकांचे समाधान आदी ज्ञान तसेच आनंद व समाधान मुलांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. आनंद बाजारात सुमारे २० ते २१ हजार रुपयांची उलाढाल झाली. यावेळी काकासाहेब भड, अनिल यादव, दत्ता भड, नाना पैकेकर, मोहन काजळे, दिपक पाटील, दत्ता कणेकर, लाला सुतार उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक प्रकाश कुलकर्णी, सुवर्णा साठे, जयश्री डोके, दत्तात्रय पाटील आणि रंगनाथ घोगंडे गुरुजी उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तलाठ्यांच्या संपामुळे गावगाड्यातील कामकाज ठप्प

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ११ जानेवारी-**
संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील तलाठी आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवारपासून संपावर गेले आहेत. यामुळे गावगाड्यातील कामकाज ठप्प झाले आहे.

तलाठ्यांनी लोकसभा निवडणुकीत काम केलेल्या तलाठ्यांना अद्यापही भत्ता मिळाला नाही, मागील पाच वर्षापासून तलाठ्यांना नवीन लॅपटॉप व प्रिंटर मिळालेला नाही, त्या तलाठ्यांना ताबडतोब लॅपटॉप व प्रिंटर मिळावा, चालू वर्षातील सिनेरिटी लिस्ट प्रसिद्ध करा, यासह इतर मागण्यांसाठी तलाठ्यांनी कामकाज बंद आंदोलन पुकारले आहे. आज त्याचा सहावा दिवस आहे. पण शासनाने अद्यापही यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही. गेल्या दोन वर्षापासून तलाठी आपल्या मागण्या जिल्हा प्रशासनाकडे करीत आहेत. पण जिल्हाधिकारीस्तरावर याची दखल न घेतल्यामुळे संपावर जाणणचा निर्णय घेतला आहे. जिल्हा प्रशासनाने याची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन करु असा इशारा तलाठी संघटनेने दिला आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील ५६५ तलाठी तर ११६ मंडल अधिकारी सहभागी झाले आहेत. यामुळे तलाठी व मंडलाधिकाऱ्यांविना गावगाड्यातील कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे. शेतकरी व इतर नागरिक, विद्यार्थ्यांना या संपाची मोठी झळ पोहचली आहे.



## संक्षिप्त वृत्त...




### जिद्द हीच दौलत : महारूद्र परजने

**नातेपुते, दि. ११ जानेवारी-**
जीवन संघर्षमय आहे. कोणत्याही कार्याला मनाची तळमळ लागते अपयशाने खचू नका. परिस्थितीवर मात करा. आई वडील गुरूजन यांचे उपकार विसरू नका. स्वतःवर चांगले संस्कार करा. थोरा-मोठ्यांच्या आदर्शाचे अनुकरण करा. वेळेचा सदुपयोग करा. स्वतःचे ध्येय निश्चित करा. त्या दिशेने प्रयत्न करा. जीवन अनमोल आहे. जिद्द हीच दौलत आहे,ण असे प्रतिपादन सपोनि महारूद्र परजने यांनी केले. नातेपुते येथील अक्षय शिक्षण संस्था संचलित, चंद्रकांत घुगरदरे प्रशाला व ज्युनियर कॉलेज नातेपुते येथे गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. या प्रसंगी महारूद्र परजने, उद्योजक राजेंद्र पांढरे, संस्थेचे विश्वस्त हनुमंत धालपे, अभिजीत घुगरदरे, डॉ. नरेंद्र कवितके, पालक प्रतिनिधी नितीन जठार, उमेश पोतदार, रविंद्र पोतदार, सूर्यकांत सोरटे, मुख्याध्यापक रविंद्र चांगण या मान्यवरांच्या शुभहस्ते इ.१ली ते १२ वी प्रथम ३ क्रमांक व इंटरमिजीट चित्रकला परीक्षेत उतीर्ण विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. समारंभाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रविंद्र चांगण यांनी केले. सूत्रसंचालन सुखदेव वलेकर, स्मिता आवळे यांनी केले. आभार प्रदर्शन सिकंदर मुलाणी यांनी केले.



### बार्शीत पत्रकारांचा सन्मान

**बार्शी, दि. ११ जानेवारी-**
बार्शीत वृत्तपत्र संपादक संघ व डिजीटल मिडीया प्रेस यांच्यावतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ पार पडलेल्या पत्रकार दिनाच्या कार्यक्रमात पत्रकारांच्या सन्मान सोहळा पार पडला. तहसीलदार एफ. आर. शेख, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, उद्योजक विनय संघवी, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, माजी नगराध्यक्ष ॲड. असिफ तांबोळी, श्यामसुंदर मुळे, ॲड. प्रशांत शेटे, लेखक तथा सामाजिक कार्यकर्ते सचिन वायकुळे, विक्रम सावळे, वृत्तपत्र संघाचे अध्यक्ष योगेश लोखंडे, काँग्रेस शहराध्यक्ष विजय साळुंखे, वसीम पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील ज्येष्ठ पत्रकार प्रशांत काळे, रमेश गायकवाड, भ. के. गव्हाणे, प्रभुलिंग स्वामी, एन. आर. कुलकर्णी, सचिन अपसिंगकर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संघटनेचे कार्याध्यक्ष अभिषेक काकडे, सचिन अशोक काकडे तसेच रियाज पठाण, ॲड. सुहास कांबळे, प्रशांत गायकवाड, जमीर शेख, आजम बागवान, किरण नान्नजकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन राहुल झोंबाडे यांनी केले तर योगेश लोखंडे यांनी आभार मानले.



### निवृत्त बँक कर्मचाऱ्यांचा विविध मागण्यांसाठी विजयपुरात मोर्चा

**विजयपूर, दि. ११ जानेवारी-**
पेन्शन रिव्हिजन करण्यात यावे यासह विविध मागण्यांसाठी सेवानिवृत्त बँक कर्मचाऱ्यांनी धरणा सत्याग्रह केला व त्यानंतर आंबेडकर सर्कल, बसवेश्वर सर्कल, मध्यवर्ती बसस्थानक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन त्यांनी मागण्यांचे निवेदन अतिरिक्त जिल्हाधिकारी सोमलिंग गेन्नूर यांच्यामार्फत केंद्रीय अर्थमंत्र्यांना दिले. निवृत्त बँक कर्मचारी विजयपूर जिल्हा अध्यक्ष विठ्ठल काळे, सरचिटणीस अशोक उपाध्याय यांची भाषणे झाली आणि सर्व मागण्या मान्य होईपर्यंत संघर्षासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. संघटना सचिव महादेव हलल्ली, जगदीश मोटगी, पी. एस. पुराणिक, व्ही आर कुलकर्णी, ईरण्णा चिम्मलगी, एस. ए. कुलकर्णी यांच्यासह विजयपूर, बागलकोट, कलबुर्गी, बेळगावी जिल्ह्यातील सुमारे २५० सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते.



### आगळगाव येथील लोकसेवा विद्यालयाचे यश

**बार्शी, दि. ११ जानेवारी-**
कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या संस्थांतर्गत कुस्ती स्पर्धेत आगळगाव येथील लोकसेवा प्रशालेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत असे यश संपादन केले. प्राथमिक गट- ३३ किलो वजनी गट- समर्थ पवार- प्रथम क्रमांक, सत्यजित गिराम- द्वितीय क्रमांक. ३८ किलो वजनी गट-विराज लंगोटे -प्रथम क्रमांक. खुला गट आसफ मुजावर द्वितीय, माध्यमिक गट ४४ कलो वजन गट सौरभ तावरे प्रथम क्रमांक. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक सचिन उकिरडे यांनी अभिनंदन केले.

## गुरुवारवारपासून माढा महोत्सव

### सहकार महर्षी गणपतराव साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजन; विद्यार्थ्यांच्या कलेची मिळणार मेजवानी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ११ जानेवारी-**
सोलापूर जिल्ह्याचे पहिले सहकार महर्षी कै.गणपतराव धोंडीबा साठे यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त शहर आणि परिसरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी माढा महोत्सव २०२५ चे आयोजन केले असल्याची माहिती पत्रकार परिषदेत संयोजक दादासाहेब साठे व नगराध्यक्षा ॲड. मीनलताई ताई साठे यांनी दिली.



महोत्सवांतर्गत गुरुवारी १६ जानेवारी रोजी रोजी सकाळी ८ वाजता सहकार महर्षी गणपतराव साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोभायात्रेमध्ये सहकार महर्षी यांच्या प्रतिमेची शहरातून मिरवणूक काढली जाणार आहे. याचबरोबर शहरातील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांच्या घोड्यावरून विविध वेशभूषेतील सहभाग , विद्यार्थ्यांचे लेझीम पथक, झांजपथक, विविध पथनाट्य, पर्यावरणपूरक संदेश देणारे पथनाट्य आदीचा समावेश असणार आहे. शुक्रवारी १७ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय माढा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सायंकाळी ७ वाजता सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानावर विविध गुणदर्शन सोहळा आणि विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण आयोजित केले आहे.

शनिवारी १८ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे भव्य क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे. रविवारी १९ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता सहकार महर्षी गणपतराव साठे यांच्या सहकार चळवळीला गतिमान करण्यासाठी रन फॉर को ऑपरेटीव्ह मूव्हमेंट ही टॅग लाईन वापरत राज्यस्तरीय भव्य खुल्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी २० जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता कला व वाणिज्य महाविद्यालय येथे सहकार महर्षींच्या छायाचित्राचे प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

सहकार महर्षी गणपतराव साठे प्रतिष्ठान, बहुउद्देशीय मंडळ माढा, प्रियदर्शनी महिला विकास मंडळ, जगदंबा बहुउद्देशीय विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित माढा महोत्सवांतर्गत सर्व उपक्रमांचा लाभ घेत माढा महोत्सव २०२५ यशस्वी करण्याचे आवाहन संयोजक दादासाहेब साठे, नगराध्यक्षा ॲड. मीनलताई साठे यांनी केले आहे.

पत्रकार परिषदेस पाणीपुरवठा सभापती नितीन साठे, आरोग्य सभापती विकास साठे, क्रांती साठे मंडळाचे अध्यक्ष उमेश साठे, हनुमंत राऊत, लक्ष्मण राऊत, गणेश जोशी, प्रकाश जाधव, धनाजी वसेकर, नितीन साठे, प्रा. अशोक लोंढे, कृष्णा राऊत, प्रवीण घाडगे, श्रीकांत काशीद, मनोज वारगड, धनाजी कांबळे, गोटू शहाणे, अजय चव्हाण उपस्थित होते.

#### स्पर्धा परीक्षा, करिअरवरही मार्गदर्शन

सोमवारी २० जानेवारी रोजी ११ वाजता तुळजाभवानी मंगल कार्यालय माढा येथे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा आणि करियर मार्गदर्शन कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी दापोली जिल्ह्याचे प्रांताधिकारी अजित थोरबोले, पोलिस उपअधीक्षक रत्नाकर नवले, पुण्याचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक किशोर लवटे, पोलीस उपनिरीक्षक अनघा गोडगे यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आलेले आहे.

## अवैध वाळू वाहतुकीवर महसूलची कारवाई

### तहसीलदार सचिन लंगुटे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ जानेवारी-**
अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल पथकाने भीमा नदीपात्रात अवैध वाळू उपसा व वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे एक जेसीबी, एक टिपर तसेच अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो जप्त करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.




पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. चंद्रभागा नदी पात्रात जुन्या दगडी पुलाजवळ अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक करणारा अशोक लेलँड कंपनीच्या टेम्पो तसेच मौजे गुरसाळे (ता. पंढरपूर) येथील भीमा नदी पात्रालगत एक जेसीबी व एक टिपर अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करण्यात येत असल्याची माहिती महसूल प्रशासनास मिळाली. सदरच्या दोन्ही कारवाई महसूल पथकाने पहाटे ५.०० ते सकाळी ८ वाजताच्या दरम्यान केली. सदर कारवाई मधील वाहने शासकीय धान्य गोदाम येथे जमा करण्यात आली आहेत. या दोन्ही कारवाईमध्ये मंडळ अधिकारी विजय शिवशरण, बाळासाहेब कदम, राजेंद्र वाघमारे, ग्राम महसूल अधिकारी प्रमोद खंडागळे, महेशकुमार सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे रविकिरण लोखंडे, पी. पी. कोईगडे, आर. बी. खंदारे, राहुल गुटाळ व पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस हवलदार हनुमंत शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल आवटे, सूर्यवंशी व पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

## सोलापूर-पुणे महामार्गावर खड्डे

### स्वच्छतागृहे सुरू करण्यासाठी शिवआरोग्य सेनेचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ११ जानेवारी-**
सोलापूर-पुणे महामार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असून सदर खड्यामुळे टू व्हीलर व मोठ्या गाड्यांचे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे अनेकांना आपले प्राणही गमवावे लागले आहेत.



अनेक ठिकाणी चढ उताराणे अपघात होतं आहेत.रस्ता समतल नसल्याने अशा प्रकारचे खड्डे झाले आहेत ते तात्काळ दुरुस्त करण्यात यावे.टोल नाक्यावर बंद अवस्थेतील स्वच्छतागृह सुरू करावी, अन्यथा आंदोलन करुन सावळेश्वर आणि वरवडे दोन्ही टोल प्लाझावरील टोल वसुली विरोधात टोलवसुली बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिव आरोग्य सेनेचे जिल्हा समन्वयक दीपक सूर्वे यांनी दिला. यावेळी शिवआरोग्य सेनेचे कार्याध्यक्ष डॉ. किशोर ठाणेकर, राज्य समन्वयक जितेंद्र संपकाळ, सचिव डॉ. अजित पाटील यांच्या मान्यतेने सदर मागण्याचे निवेदन देण्यात आले.अनेक वर्षापासून खड्डयांची परिस्थिती जैसे थे असून याबाबत विविध संघटनांनी, तसेच पक्षांनी लेखी निवेदन देऊन कळविलेले असूनही त्यास केराची टोपली दाखविण्यात येत आहेत. तसेच त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. तरी तात्काळ या मार्गावरील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावे. तसेच सध्या जे खड्डे बुजविले गेले आहेत त्या खड्याची लेव्हल नसल्याने उतार अशा प्रकारचे खड्डे झाले आहेत. तसेच वरवडे येथील टोल प्रशासन येथील स्वच्छतागृह वांरवार सांगूनही बंद ठेवण्यात आले आहे.यावेळी डॉ. शुभा राऊळ डॉ. श्री. किशोर ठाणेकर व दीपक सूर्वे आदी उपस्थित होते.

## बार्शी नगरपरिषदेच्या ट्रॅक्टरची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जानेवारी-**
नगरपरिषदेकडील डास फवारणीसाठी वापरला जाणारा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर चोरीला गेला असल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी रोहित बापू लगंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा ट्रॅक्टर गाडेगाव रोडवरील चांदणी फिल्टर येथे लावण्यात आला होता.

९ जानेवारी रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत ट्रॅक्टरची फवारणी करुन वाहन चालक रुपेश लोंढे याने ट्रॅक्टर ठरलेल्या ठिकाणी लावला होता. मात्र, १० जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता तेथे ट्रॅक्टर न दिसल्याने चोरीचा संशय बळावला. सदर प्रकरणी रोहित लगंडे यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. गेल्या काही महिन्यात बार्शी नगरपालिकेच्या साहित्यांची चोरीच्या प्रमाणात वाढ झाली असून २२ ते २४ जुनच्या दरम्यानही चांदनी फिल्टर येथे लावण्यात आलेल्या नगरपालिकेच्या टिप्परच्या बॅटरीची चोरी झाली होती. यानंतर आता चक्क येथे लावण्यात आलेल्या ट्रॅक्टरवरच चोरट्यांने डल्ला मारल्याने नगरपरिषदेची साहित्यांच्या सुरक्षा हा चिंतेचा विषय बनला आहे.

## भक्तांनी निस्वार्थी भावनेने सेवा करावी

### श्रीपाद लिंबेकर : अभ्यासपूर्ण निरुपणाने श्रोते मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ११ जानेवारी-**
श्री चौडेश्वरी पौष पौर्णिमा उत्सवानिमित्त करकंब येथे प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या नारदीय कीर्तन महोत्सवात आज चौथे कीर्तन पुष्प गुंफण्यात आले. प्रथम श्री चौंडेश्वरी मातेचे पूजन, दिपप्रज्वलन श्रीपाद लिंबेकर व ईतर मान्यवरांच्या हस्ते झाले.



पूर्वरंगामध्ये हभप श्रीपाद लिंबेकर यांनी संत तुकाराम महाराजांच्या भक्त ऐसे जाणा जे देही उदास या अभंगावर निरुपणात भक्त कसा असावा, भक्तांची लक्षणे सांगताना भक्त आशा पाशात न अडकता देवाची आणि समाजाची सेवा करण्यातच धन्यता मानतो. त्याच श्रध्देने सातत्यपूर्ण भक्ती केली किंवा समाजसेवा केली तर त्याला भगवंत ही सहाय्यभूत होतो. यावर अनेक दृष्टांत दिले. खरे भक्त देहाबाबतीत उदासीन असतात. त्यांच्या जीवनाचा विषय फक्त परमात्मा असतो. त्यामुळे ते भक्त लौकिक गोष्टींमध्ये अडकत नाहीत. सुंदर निरुपण व तितक्याच गोड आवाजात अभंग सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध होत होते. उत्तररंगामध्ये संतश्रेष्ठ लाखा कोल्हाटी यांचे भावपूर्ण चरीत्र ऐकताना श्रोते ब्रह्मानंदात तल्लीन झाले. भगवंत भक्तांचा भाव बघत असतो. कितीही कष्ट असले तरी नामस्मरण आणि निष्ठा असेल तर भगवंत तारुण नेतो असे सांगितले. आर्या, साकी, दिंडी, अभंग गोंधळ आदी संगीतप्रकाराने कीर्तनाला अधिकच रंग भरला. त्यांना संगीत साथसंगत हार्मोनियम गंगाधर देव, तबला ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ माऊली पिसे यांनी दिली. आदर्श रसिक कसा असावा ते करकंबला येऊन जाणवले असे लिंबेकर बुवांनी आवर्जून सांगितले.

## चांदापुरीतील ओंकार साखर कारखान्याचा काटा अचूक

### शासनाच्या वैधमापनशास्त्र विभागाकडून तपासणी

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ११ जानेवारी-**
माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याच्या काट्याची महाराष्ट्र शासनाच्या वैधमापनशास्त्र विभागाकडून तपासणी करणयात आली. या तपासणीमध्ये सदरच्या कारखान्याचा काटा एकदम अचूक असल्याचा अहवाल सदर विभागाने दिला.

चालू २०२४२५ च्या गळीत हंगामात सदरच्या विभागाने अचानक कारखान्याच्या काट्याची ऊस उत्पादक शेतकरी व ऊस वाहतूक करणाऱ्या ड्रायव्हर यांच्यासमोरच जिल्हा नियंत्रक अ. श. गेटमे व अकलूज विभागातील अं. थ. इंगोले यांनी उसाने भरलेल्या वाहनाचे व रिकाम्या वाहनाचे वजन केले. तसेच वजनाची पाहणी केली असता या कारखान्याच्या काट्यात कोणत्याही प्रकारची अजिबात तफावत आढळून आली नाही. यावरुन या कारखान्याचा वजन काटा एकदम अचूक असल्याचे सांगण्यात आले. यामुळे या कारखान्याबाबत शेतकऱ्यांचा विश्वास असल्याचे दिसून येते. कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनीही गळीत हंगाम सुरु करतानाच शेतकऱ्यांनी कोणत्याही खासगी काट्यावरुन वजन करुन या कारखान्यास ऊस घालावा असे जाहीर आवाहन केले होते. यावेळी शेतकरी जगन्नाथ नागणे, शांतीलाल काटकर, रामचंद्र मगर उपस्थित होते. शेतकऱ्यांनी ऊस ओंकार साखर कारखान्यासच द्यावा, असे आवाहन संचालक प्रशांत बोत्रे-पाटील यांनी केले आहे.

> ओंकार साखर कारखान्याच्या काट्याची आमच्या समोरच अधिकाऱ्यांनी तपासणी केली. यावेळी काटा अतिशय अचूक निघाला. यामुळे मला शेतकऱ्यांना अभिमान आहे की योग्य कारखान्याला मी ऊस घातला आहे.
>
> **-जगन्नाथ नागणे-पाटील, ऊस उत्पादक शेतकरी**



## वाचन संकल्पसाठी करा कृतीनिश्चय

### प्रा. प्रबुद्धचंद्र झपके : नगर वाचन मंदिरमध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ जानेवारी-**
एखाद्या गोष्टीसाठी संकल्प केला म्हणजे विशिष्ट हेतूने विशिष्ट कालावधीत एखादे काम पार पाडायचे असे ठरवले, निश्चय केला, निर्धार केला आणि त्याप्रमाणे वागले की तो संकल्प तडीला जाईल याची खात्री असते. पण नुसत्याच संकल्पाने सिद्धी प्राप्त होत नाही. त्याचप्रमाणे वाचन संकल्प करा व आजपासून वाचन करायचे या मनाशी बांधलेल्या खूणगाठीशी इमान राहायचे असा कृतनिश्चय करा तरच वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचा हेतू साध्य होईल असे प्रतिपादन प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी केले.

नगर वाचन मंदिर सांगोला येथे आयोजित वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमामध्ये ते बोलत होते. यावेळी योगगुरू मिलिंद पत्की, साहित्यिक शिवाजी बंडगर, नगर वाचन मंदिरचे उपाध्यक्ष डॉ. प्रभाकर माळी, सहसचिव शंकरराव सावंत, संचालक दादासाहेब खडतरे, सानेगुरुजी कथामलेचे अध्यक्ष भीमाशंकर पैलवान, सांगोला विद्यामंदिरचे प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते.

यासाठी नगर वाचन मंदिरचे संचालक शुभांगी घोंगडे, सुनील भोरे, प्रा. शिवशंकर तटाळे, ग्रंथपाल रणजित भंडारे, सहाय्यक ग्रंथपाल शामकांत सावंत, लिपिक रमेश कोकरे, कर्मचारी अनंत ढोले, विद्यामंदिरचे सूर्यकांत कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. धनाजी चव्हाण यांनी तर नगर वाचन मंदिरचे सचिव मिलिंद फाळके यांनी शेवटी आभार मानले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पोलिस उपनिरीक्षकपदी निवड; माजी आ.सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

**परंडा, दि.११ जानेवारी -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झालेले परंडा तालुक्यातील सर्वश्री राजकुमार नरूटे (पिठापूरी), विराज गाढवे (देऊळगाव), सुदर्शन पाटील (भोंजा) व सोहन हजारे (परंडा) यांनी मा.आ.सुजितसिंह ठाकूर यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. ठाकूर यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. हे चौघेही ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी कुटुंबातील आहेत.





## संक्षिप्त वृत्त...



### इंदिरा प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मांडला बाल आनंद बाजार

**मंगरुळ, दि.११ जानेवारी -**

विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबर व्यावहारिक ज्ञान अवगत व्हावे यासाठी तुळजापूर तालुक्यातील मौजे मंगरुळ येथील इंदिरा माध्य. व उच्च माध्य.विद्यालय यांनी गावातील मुख्य बाजार चौकात बाल आनंद बाजार मांडला या आनंद मेळाव्याचे उद्घाटन गावातील उपस्थित नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. मंगरुळच्या रहिवाशांनी आपल्याच गावातील विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणलेला माल खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले बाजार आनंद बाजारात जवळपास वीस हजार रुपयांची उलाढाल विद्यार्थ्यांनी केली. बाल आनंद मेळाव्यासाठी मुख्याध्यापक सुदर्शन शिंदे, जब्बार शेख, बालाजी डोंगरे, बंडू डोंबाळे, चव्हाण, बालाजी गुरव, बनसोडे, करपे, माशाळकर, शेख यांच्यासह प्रशालेच्या कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### उपळाई शाळेत बालआनंद मेळावा

**धाराशिव, दि.११ जानेवारी -**

प्राथमिक शाळा उपळाई येथे बाल आनंद मेळावा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी जि.प धाराशिव माध्यमिक विभागाचे विस्तार अधिकारी येरमूनवाड, चिलवडी केंद्रप्रमुख नागले, येरमाळा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी संतोष माळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्ता मुंढे सरपंच बापू मुंढे, माजी पं.स.सदस्य राम हारी मुंढे माजी सरपंच विठ्ठल मुंढे सर्व सदस्य, शाळा समिती सदस्य, ग्रामस्थ शिक्षणप्रेमी विद्यार्थी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक येळंबकर यांनी केले.



### अपशिंगे मिलिटरी शाळेत बालबाजार

**जळकोट, दि.११ जानेवारी -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अपशिंगे मिलिटरी येथे मुलांच्या बालबाजार भरवण्यात आला होता. या बालबाजाराचा उद्देश विद्यार्थ्यांमधील व्यवहार ज्ञान, गणिती क्रियांचे उपयोजन, संभाषण कौशल्यांचा विकास व्हावा, त्यांच्यात सभाधीटपणा वाढावा, त्यांना समाजातील शेतकरी, कामगार वर्ग, छोटे मोठे व्यावसायिक, स्वतःचे आई वडील यांचे कष्ट, मेहनत कळावी, प्रत्येक गोष्टीचे मोल समजावे म्हणून हा बालबाजार आयोजित करण्यात आला होता. प्रासंगिक वस्तूंचे, खेळण्यांचे स्टॉल लावले होते.

# तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखडा मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे सादर

**दोन हजार शंभर कोटींचा आहे आराखडा... लवकरच मान्यताही मिळेल; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य सरकारने एक हजार ३२८ कोटी रुपयांचा निधी छत्रपती संभाजी नगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत जाहीर केला होता. तो आराखडा आता अंतिम करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार दोन हजार १०० कोटी रुपयांचा परिपूर्ण अंतिम विकास आराखडा राज्य शासनाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी आज मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. आता लवकरच या अंतिम विकास आरखड्यास मंजुरी मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.



तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र वैश्विक दर्जाचे करण्यासाठी आपण मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहोत. जगभरातील भाविक तुळजापुरात यावे आणि त्यातून मोठ्या प्रमाणात अर्थकारणाला बळकटी मिळावी, त्यातून हजारोंची रोजगार निर्मिती व्हावी हे त्यामागील उद्देश आहे. संकल्पित आराखड्याचे दि.३१ मार्च २०२३ रोजी जनतेसमोर सादरीकरण करून त्यांच्या हरकती व सूचना मागवल्या होत्या. आपल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर १६ सप्टेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत एक हजार ३२८ कोटींचा निधी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी महायुती सरकारने मंजूर केला होता. त्यानंतर २८ जुलै २०२४ रोजी परिपूर्ण विकास आराखडा तयार करण्यासाठी संकल्पना स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी रीतसर निविदाही प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार सहभागी झालेल्या विविध वास्तुविशारद कंपन्यांनी अधिक परिपूर्ण असे सादरीकरण केले. त्यातून गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात आलेल्या संकल्पनेचा अंतिम आराखड्यात समावेश करण्यात आला असल्याचे चित्र आ.पाटील यांनी सांगितले. तुळजाभवानी देवीचे क्षेत्र वैश्विक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित व्हावे यासाठी सर्वसमावेशक प्रक्रियेचा अंगीकार करण्यात आला आहे. २० जून २०२४ रोजी आराखड्याचे पुन्हा एकदा सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर १५ जुलै २०२४ रोजी आराखड्याची माहिती संस्थानच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. शहर आणि परिसरातील नागरिकांच्या सूचना व हरकती मागवून घेण्यात आल्या. नागरिकांच्या सूचना, आक्षेप जाणून घेण्यासाठी २० जुलै रोजी शहरवासीयांसोबत बैठक घेतली. आलेल्या सूचनांवर निर्णय घेण्यासाठी अति. जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन केली. पुजारी, भाविक व शहरवासीयांच्या सूचनांचा अभ्यास करुन योग्य आक्षेप व सूचनांचा आरखड्यात नव्याने अंतर्भाव करण्यात आला. त्यामुळे प्रस्तावित आरखड्याची प्रकल्प किंमत रु.१३२८ कोटींवरून रु.२१०० कोटी एवढी झाली असल्याची आ.पाटील यांनी सांगितले.

### भूसंपादनासाठी प्रचलित दराच्या कैकपट मावेजा

तुळजापूर शहरातील नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेऊन भूसंपादन प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रचलित दाराच्या कैकपटीने विकास आराखड्यासाठी जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. त्यासाठी सादर करण्यात आलेल्या या अंतिम विकास आराखड्यात तब्बल ५०० कोटी रुपयांची तरतुद केवळ भूसंपादन प्रक्रियेसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांची जागा तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या विकासासाठी संपादित केली जाणार आहे त्यांना समाधानकारक मावेजा मिळणार आहे. सर्वांच्या सहमतीने आणि सर्वांना विश्वासात घेऊन, तसेच जमिनीचा चांगला मोबदला देऊन आई तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

### दर्शन मंडपात विविध सुविधा

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये मुख्य दर्शन मंडप व तेथील अनुषंगिक सुविधा, घाटशिळ व हडको येथे भाविक सुविधा केंद्र, शहरात व शहराच्या प्रमुख रस्त्यावरील प्रवेशद्वारावर आकर्षक कमान, वृंदावन गार्डनप्रमाणे आधुनिक उद्यान, वृध्द व दिव्यांगाकरिता लिफ्ट, ट्रॅव्हलेटर आदी बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच विकासकामांसाठी आवश्यक भूसंपादनाकरिता देखील निधीची तरतूद ठेवण्यात आली आहे. भूसंपादन व शासकीय करापोटी आवश्यक असणारे शुल्क तसेच विकासकामांसाठी लागणारा निधी असा एकूण दोन हजार शंभर कोटी रुपयांचा अंतिम आराखडा प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

## उद्योजकता एस समिट २०२५ : उद्योजक, महिलांनी सहभाग नोंदविण्याचे ॲड.आकांक्षा चौगुले यांचे आवाहन

**उमरगा, दि.११ जानेवारी -**

ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्था, उमरगा, ग्रामऊर्जा फाउंडेशन, अंबाजोगाई, युथएड फाउंडेशन, पुणे यांच्या विद्यमाने जिल्ह्यात प्रथमच उमरगा येथे उद्योजकता एस समिट-२०२५, मकर संक्रातीनिमीत्त महिलांसाठी भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. १२ डिसेंबरपर्यंत हा कार्यक्रम श्रीराम मंगल कार्यालय, उमरगा येथे संपन्न होणार आहे. उद्योजकांना आपली उद्योग विषयक कल्पना सादर करण्यासाठी व्यासपीठ, गुंतवणूकदार, मार्गदर्शक आणि प्रमुख व्यक्तीशी ओळख, राष्ट्रीय एस समिट बेंगलोर येथे जाण्याची संधी, आपल्या उद्योगासाठी पैसे/भांडवल मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यास विजेते प्रमाणपत्र, उद्योजक प्रशिक्षण संदर्भात ७ दिवसीय बुटकॅम्प, व्यवसाय विकासासाठी लागणारे मार्गदर्शन, राष्ट्रीय एस समिट मध्ये थेट प्रवेश, जिल्हास्तरीय व्यवसायिक मार्गदर्शकांशी ओळख आदी लाभ मिळणार असून सहभागी होण्याचे आवाहन ॲड.आकांक्षा चौगुले यांनी केले आहे.

## लवकर न्याय मिळावा; देशमुख कुंटूंबियांची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील सोमनाथ सोमवंशी प्रकरणी शनिवारी धाराशिव शहरात सर्वपक्षीय जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख यांनी लवकर न्याय मिळावा आणि या प्रकरणातील आरोपींना मदत करणाऱ्यांना सहआरोपी करावे, अशी मागणी केली.



या जन आक्रोश मोर्चात मोठ्या संख्येने धाराशिवसह बीड जिल्ह्यातील नागरिक सहभागी झाले होते. संतोष देशमुख व सोमनाथ सोमवंशी यांच्या कुटुंबियांनीही या मोर्चात सहभाग घेतला.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी मंत्री धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप करत त्यांच्यावर एकेरी भाषेत टीकास्त्र सोडले आहे. ते म्हणाले, धनंजय मुंडे आपल्या गुंडांच्या टोळीच्या माध्यमातून ओबीसीचे पांघरूण घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे मराठा समाजाने सावध होण्याची गरज आहे. मुंडेंनी गुंडांचा माज थांबवावा आणि समाजाविरोधात ओबीसींना उभे करण्याचा प्रयत्न केला, तर त्याचे परिणाम भोगावे लागतील. जरांगेंनी मुंडेंचा उल्लेख धन्या मुंडे असा करत त्यांच्या वर्तनावर जोरदार हल्ला चढवला. पण ज्या दिवशी या लोकांनी धनंजय देशमुख यांना धमक्या दिल्या, त्याच दिवशी मुंडेंच्या विरोधात उभा राहिलो. एकदा पाठ सोडत नाही, हे माझे धोरण आहे, असे जरांगे म्हणाले.

## श्री क्षेत्र तुळजापुरात पाचव्या माळेनिमित्त हजारो भाविकांनी घेतले आई तुळजाभवानी देवीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जानेवारी -**

कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या शाकंभरी नवरात्र उत्सवानिमित्त आज दि.११ जानेवारी शनिवार रोजी पाचव्या माळे निमित्त देवीला पारंपारीक शिवकालीन दागदागिन्यांचा साज सजवण्यात आला त्यानंतर देवीस भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली, तत्पूर्वी जलयात्रा दुपारी बारा वाजता मंदिरामध्ये आल्यानंतर पापनास तीर्थ येथून सुहासिनी कुमारी का आणि महिलांनी कलश आंब्यांची पाने व त्यावर श्रीफळ ठेवून तो कलश आपल्या मस्तकी घेऊन आलेल्या पवित्र जलाने तुळजाभवानी देवीच्या गाभाऱ्यापासून ते भवानी शंकर पर्यंत संपूर्ण मंदिर धुवून घेतले. तुळजाभवानी देवींच्या अभिषेकास



सुरुवात झाली. जलयात्रेमुळे उशिरा चालू झालेल्या अभिषेक साधारण तीन वाजेपर्यंत चालू होते. अभिषेक आणि नित्योपचार पूजा आरती झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांची चांदीची मुर्ती भवानी तलवार स्वीकारतानाचे ऐतिहासिक क्षण येथे आकर्षक रूपात साकारले होते. देवीचे भवानी तलवार रूपातील दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती

यावेळी देवीला फिकट गुलाबी रंगाचा कलाकुसर बुट्टेदार शालू नेसविण्यात आला होता. शिवाजी महाराज यांच्या काळातील महाराजांनी तुळजाभवानी देवीस अर्पण केलेले दागिने यांमध्ये हिरे, मोती, पांचु, रत्नजडीत अलंकार असलेले दागिने घालून भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांना आई तुळजाभवानी मातेनी प्रसन्न होऊन धर्मरक्षणासाठी आणि स्वराज्य स्थापनेसाठी भवानी तलवार देवून आशिर्वाद दिला होता. देवीसमोर छत्रपती शिवाजी महाराजाची चांदीची प्रतिमा ठेवली जाते व भवानी तलवार अलंकार महापूजा अशा स्वरुपात महापुजा मांडतात. तत्पूर्वी शुक्रवारी चौथ्या माळेला सायंकाळी अभिषेकाची घाट झाल्यानंतर देवीचे यथासांग नित्य अभिषेक पूजाविधी पार पडले.त्यानंतर धुपारती होऊन अंगारा काढण्यात आला.प्रक्षाळ पूजेदरम्यान मंदीरातील गाभारा पाण्याने धुण्यात आला. प्रक्षाळ मंडळाच्या सर्व देवीभक्तांनी गाभारा धुऊन प्रक्षाळपूजा संपन्न केली.रात्री देवीची प्रक्षाळपूजा करण्यात येऊन देवीला पानाचे घर लावण्यात आले. सायंकाळच्या पूजेस देवीला फुलांचा मुकुट आणि पानाचे घर घातल्याने देवीचे सुंदर आणि आकर्षक रूप दिसून येते. प्रक्षाळ पूजा चालू असताना मंदिर परिसरात देवीचा छबिना सिंह वाहनावरून काढण्यात आला. देवीच्या छबिण्यासाठी भाविक भक्त, पुजारी, महंत मंदिर कर्मचारी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उंडरगाव येथील शाळेत बाल आनंद मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**

तालुक्यातील उंडरगाव येथील जि.प. प्राथमिक शाळेत कौशल्य विकासअंतर्गत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रंगनाथ जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. युवराज तोडकरी व भरत गंगणे यांच्या कडून प्रत्येकी २५० रुपये पारितोषिक देण्यात आले. या मेळाव्यात तब्बल २५००० हजाराची उलाढाल होऊन मुलांनी १३००० हजार रुपयांचा नफा मुलांनी मिळवला तसेच यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्र प्रमुख विश्वजीत चंदनशिवे तर व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष बालाजी माने, शाळेचे मुख्याध्यापक राजकुमार माळवदकर, शाळेतील शिक्षक, इस्माईल तांबोळी, आशिफा सय्यद, जयश्री वाघमारे, विकास घोडके, पोलीस पाटील नीलकंठ कोठावळे, ज्ञानेश्वर गंगणे, श्रीकृष्ण गंगणे, युवराज तोडकरी, प्रदीप ढोबळे, विश्वास ढोबळे, गावचे उपसरपंच हिराचंद मोरे, हरी पवार, नेताजी सूर्यवंशी, बालाजी सूर्यवंशी यांच्यासह गावातील महिला पालक सर्व शिक्षण प्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## बाल महोत्सवातुन बालकांच्या सुप्त गुणांना वाव : न्यायमुर्ती वसंत यादव



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जानेवारी -**

चाचा नेहरू बाल महोत्सव हे अनाथ, निराधार ,निराश्रीत बालकांसाठी संपन्न होत असुन,त्या बालकांसाठी त्यांचे पालक बनुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.हे चाचा नेहरू बाल महोत्सव हे बालकांच्या सुप्त गुणांना वाव देणारे महोत्सव आहे. त्यासाठी बालकांनी मजा,मस्ती करुन आनंदोत्सव साजरा करावा असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्यायमुर्ती वसंत यादव यांनी केले.

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील आपलं घर बालगृह येथे आयोजित केलेल्या महिला व बाल विकास विभाग, जिल्हा व महिला बालविकास अधिकारी कार्यालय यांच्या वतीने १० ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित केलेल्या जिल्हा स्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषणात वसंत यादव बोलत होते.

यावेळी महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे, बालकल्याण समितीचे अध्यक्ष विजयकुमार माने, सदस्य दयानंद काळुंके, सदस्या ॲड.दिपाली जहागिरदार, ॲड. मैना भोसले, ॲड.सुजाता माळी, जिल्हा परिविक्षा अधिकारी रेहाना जमादार, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे, जिल्हा परिविक्षा अधिकारी व्यंकट देवकर, अरविंद थोरात, भुजंग भोसले, ॲड.शशिकांत पाटील, पंढरीनाथ घोडके, क्रिडा परिक्षक, गोरख जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. या महोत्सवाचे जंगी उद्घाटन आकाशात फुगे सोडून व हिरवा झेंडा दाखवून मोठ्या थाटात करण्यात आले.

# सौर, पवन ऊर्जा प्रकल्प उभारणी प्रक्रियेत येणार पारदर्शकता

**राज्य सरकारला सादर करणार कार्यपणाली प्रारूप : आ.राणाजगजितसिंह पाटील**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**



जिल्ह्यातील एकूण भौगोलिक परिस्थिती सौर आणि पवन उर्जा निर्मितीसाठी पूरक आहे. त्यामुळे या परिसरात सैर ऊर्जा आणि पवन ऊर्जा प्रकल्पांना मोठा वाव आहे. त्यामुळेच अनेक प्रतिथयश कंपन्यांकडून या परिसरात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जात आहे. ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी जमिन विकत अथवा भाडे तत्वावर घेतली जात असताना शेतकऱ्यांना योग्य व समाधानकारक मोबदला मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी आपण कार्यप्रणाली बाबत एक प्रारूप तयार करून शासनाला पाठविणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार धाराशिव जिल्ह्यात प्रथमतः पवन व सौर ऊर्जा प्रकल्पासंबंधित जमीन व्यवहार व कार्यपद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी सुयोग्य कार्यप्रणालीचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे ठरले आहे. त्या अनुषंगाने आपण केलेल्या सूचनेनुसार शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांच्यासह जिल्हा पोलिस अधिक्षक, संजय जाधव, अपर पोलिस अधिक्षक गौहर हसन आणि जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपविभागीय पोलिस अधिकारी, महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकारणाचे अधिकारी व पवन उर्जा कंपनीचे प्रतिनिधीही उपस्थित होते. विकास प्रकल्प राबविताना शेतकऱ्यांच्या व्यापक हिताला प्राधान्य ही आपली कार्यपद्धती आहे. शेतकरी बांधवांचे हित जोपासणे ही प्रशासनाची प्राथमिकता असायला हवी. जिल्ह्यात पवन उर्जा प्रकल्पासाठी जमीन खरेदी व भाडे करार तसेच रस्त्याच्या अनुषंगाने झालेल्या व्यवहारातील अनियमितता व गैरप्रकार रोखण्यासाठी एक सुयोग्य पारदर्शक कार्यपद्धती निश्चित करणे आता आवश्यक झाले आहे. त्यामुळे या बैठकीत त्यावर सविस्तर चर्चा करून कार्यप्रणालीचे प्रारूप तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. सदरील प्रारूप शासनाकडे सादर करण्यात येणार असून त्याद्वारे अंतिम कार्यपद्धती निश्चित केली जाणार आहे.

जमीनमालक, प्रकल्पधारक व शासनाचे विविध विभाग यांच्यामध्ये समन्वय ठेवून शेतकऱ्यांना न्याय व गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींचा यामध्ये समावेश करण्याचे आपण सूचित केले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. जिल्ह्यात जवळपास ३०० दिवस स्वच्छ सूर्यप्रकाश व ऊर्जा निर्मिती प्रकल्पास पूरक वातावरण आहे. त्यामुळे सौर उर्जा व पवन उर्जा प्रकल्प धाराशिव जिल्हा आणि परिसरात येत आहेत. पुढील काळात आणखीन मोठ्या प्रमाणात प्रकल्प येणार आहेत. त्यामुळे एकूण कार्यपद्धतीत पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे. ती आणण्यासाठी व शेतकऱ्यांच्या हिताचे पूर्ण रक्षण करण्यासाठी सुयोग्य कार्यप्रणालीचा अहवाल तयार करून पुढील आठवड्यात शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले.

# माळटेकडी पुलाच्या खाली युवकाचा खून

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ जानेवारी**

शहरातील माळटेकडी पुलाच्याखाली एका खुन झाल्याची घटना आज दिनांक ११ जानेवारी रोजी उघडकीस आली. या प्रकरणी मयताच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरूद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शहरातील माळटेकडी म्हाळजा येथील शेख सिद्दीक शेख सादीक व त्याचे कुटुंबीय दि. १० जानेवारी रोजी एका नातेवाईकाच्या कार्यक्रमासाठी मिर्झा फंक्शन हॉल येथे गेले होते. रात्री ८.३० च्या सुमारास ते घरी परतले परंतू शेख सिद्दीक हा उशीरा येणार असल्याचे सांगून तिथेच थांबला. दरम्यान दि.११ जानेवारी रोजी शेख सिद्दीक याचा मृतदेह माळटेकडी पुलाच्या खाली आढळून आला. मयत शेख सिद्दीक याच्या छातीवर तिक्ष्ण हत्याराने वार केल्याचे आढळून आले. फंक्शन हॉल येथून परत येत असताना अज्ञात आरोपीने त्याचा खुन केला अंदाज वर्तविण्यात येत आहे. या प्रकरणी शेख अमीर शेख सादीक यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**माळटेकडी पुल परिसर बनला गुन्हेगारांचा अड्डा**

दरम्यान माळटेकडी पुल व परिसर गुन्हेगारांचा अड्डा बनत चालला आहे. यापुर्वीही पादचाऱ्यांना तसेच वाहन धारकांना लुटण्याच्या घटना देखील घडल्या आहेत. याच ठिकाणी अनेक गुन्हेगार बसून दारू रिचवतात तर अंधाराचा फायदा घेत नागरीकांना लुबाडण्यात येते. अशा अनेक घटना घडत असताना विमानतळ पोलीस मात्र यावर कुठलाच प्रतिबंध घालत नसल्याचे दिसून येत आहे.

# आ. कोहळीकर यांच्या उपस्थितीत सलग ७ तास चालली पाणीटंचाईची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ११ जानेवारी**

हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेस आगामी उन्हाळ्यात पाणी टंचाईची कमतरता भासू नये तसेच पाण्याअभावी एकाही कुटुंबाचे स्थलांतर होता कामा नये तसेच इतर कोणत्याही कार्यालयातील जनतेचे काम वेळेत पूर्ण व्हावे अश्या कडक शब्दात प्रशासनास खडे बोल सुनावत पंचायत समिती अंतर्गत आयोजित केलेल्या पाणीटंचाई, आम सभा व जनता दरबारच्या आढावा बैठकीत प्रतिपादन आ. कोहळीकर यांनी केले असून तब्बल ७ तास चाललेल्या या बैठकीत आमदार




पदी निवड होताच पहिल्यांदाच जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाला कडक सूचना, आदेश देत आपल्या कार्याची चूक पहिल्याच सभेत दाखवून दिल्याची चर्चा नागरिकांमधून होत आहे.

पंचायत समिती कार्यालय अंतर्गत पाणीटंचाई आढावा, आमसभा व जनता दरबारच्या बैठकीच्या आयोजन आ. कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली असून आ. कोहळीकर यांनी तालुक्यातील प्रत्येक गावातील ग्रामसेवकाकडून सद्यस्थितीत व पुढील फेब्रुवारी ते मार्च महिन्यात पाणीटंचाईचा प्रश्न उद्भवू नये यासाठी काय करावे लागेल याची सविस्तर माहिती घेतली तसेच याही व्यतिरिक्त आणखीन काही मागणी असतील तर ते सुद्धा जाणून घेतल्या. आगामी उन्हाळ्यात नागरिकांना पाण्याची टंचाई भासू नये यासाठी प्रशासनाने सुद्धा तत्पर असले पाहिजे तसेच काही अडचण असल्यास तात्काळ सांगावे जेणेकरून मी माझ्या परीने ती अडचण दूर करत नागरिकांना पाण्याची टंचाईचे चटके बसता कामा नये.

यावेळी अनुपस्थिती असलेल्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांची चांगलीच खरडपट्टी आ. कोहळीकर यांनी काढली यावेळेस ही पहिलीच बैठक असल्याने सध्या तरी कोणतेही क्शन आता घेणार नाही मात्र पुढच्या बैठकीच्या वेळेस माफी भेटणार नाही अशा कडक शब्दात अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले.

यावेळी व्यासपीठावर माजी खा. सुभाष वानखेडे, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, तहसीलदार , गट विकास अधिकारी, अनिल पा. बाभळीकर, बाळासाहेब कदम, गोपाल सारडा, संदेश पा. हडसणीकर, आबा वानखेडे, बबनराव कदम, मंचक कदम यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी ,तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, कृषी विभाग इतर कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, सरपंच यांच्यासह पत्रकार बांधव महिलावर्ग व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तालुका सचिवपदी दिलीप पोतरे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ११ जानेवारी**



मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ७ वे तालुका अधिवेशन पक्ष कार्यालय भोकर येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या अधिवेशनास किसान सभेचे केंद्रीय कमीटीचे सदस्य तथा पक्षाचे भोकर प्रभारी कॉ. अर्जून आडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कामगार नेते तथा सिटूचे जिल्हा कमिटी सदस्य कॉ. दिलीप पोतरे यांची सर्वानुमते एकमताने माकपा भोकर तालुका सचिव पदी निवड या अधिवेशनात करण्यात आली. कॉ. अर्जून आडे यांनी अधिवेशनास उपस्थित प्रतिनिधीनां सविस्तर मार्गदर्शन केले तर पक्षाचे मावळते तालूका सचिव तथा जिल्हा कमीटी सदस्य कॉ. शिवाजी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. सदरील अधिवेशनात तालुका कमिटी सदस्य म्हणून कॉ. शिवाजी गायकवाड कॉ. दिलीप पोतरे कॉ. अनिल कराळे कॉ. भिमराव जाधव कॉ. लक्ष्मण राव आदींची निवड करण्यात आली.

## पद्मशाली समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध: आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ११ जानेवारी**

किनवट माहूर मतदारसंघातील पद्मशाली समाज नेहमीच माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला आहे या समाजाचे माझ्या नेतृत्वाप्रती असलेले प्रेम मी कदापिही विसरणार नाही. पद्मशाली समाजाचे प्रश्न आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहील असे मत आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केले आहे.

दुसऱ्यांदा आमदार झाल्याबद्दल पद्मशाली समाज संघटना किनवट च्या वतीने ११ जानेवारी रोजी मार्कंडेय मंदिरात आमदार भीमराव केराम यांचा नागरी सत्कार व ऋणनिर्देश सोहळा आयोजित केला होता त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पद्मशाली समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रकाश दासरवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पद्मशाली समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीधर सुंकरवार,राज्य अध्यक्ष प्रल्हाद सुरकुटवार लक्ष्मीकांत गोणे, भाजप नेते सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,अशोक नेम्मानीवार,अनिल तीरमनवार, बाबुराव केंद्रे, संदीप केंद्रे, दत्ता आडे, श्रीनिवास नेम्मानीवार, पाळवदे सर, श्रीनिवास सातुरवार,चंद्रकांत नेम्मानीवार,विठ्ठलराव मच्छरलावार,रमेश दारमवार, पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ. केराम म्हणाले की पद्मशाली हा समाज किनवट माहूर तालुक्यात संख्येने कमी असला तरी कायम माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला आहे. माझ्या कार्यावर व नेतृत्वावर विश्वास ठेवून या समाजाने मला निवडणुकीत आशीर्वाद दिले. त्यांचे हे प्रेम व जिव्हाळा मी विसरनार नाही. आमदार या नात्याने पद्मशाली समाजाचे प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन असे ते म्हणाले.

यावेळी पद्मशाली समाजाकडून आमदार भीमराव केराम यांना शाल श्रीफळ देऊन तसेच भव्यपुष्पहार घालून नागरि सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास पद्मशाली समाज संघटनेचे विनोद सुंकरवार, प्रा.विजय उपलेंचवार,नागभूषण येब्बरवार, संतोष कुंकलवार, ईस्तारी पत्तीवार, संतोष ताडेवार, सुनील मच्छेवार, शिवा क्यातमवार, किरण कस्तुरवार, मनोज म्याकलवार, मारोती मुलकेवार, मार्कंडेय सिरमवार, मार्कंडेय अंगारवार, नरसिंग क्यातमवार, आशिष ताडेवार, सुरेश आलचेट्टीवार, प्रभाकर दासरवार, राजु ताटीकुंडलवार, गणेश कत्तूलवार, संजय ताटीकुंडलवार, विद्या पेरालावार आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### विद्यापीठाचे प्रा. तौर यांना राष्ट्रपतींकडून प्रजासत्ताक दिनासाठी विशेष निमंत्रण

**नवीन नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांना महामहिम राष्ट्रपती यांच्या कडून दिल्ली येथील २६ जानेवारी च्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. नांदेड च्या पोस्ट (डाक) विभागाने त्यांना हे निमंत्रण पत्र वैयक्तिक आणून दिले. हे निमंत्रन माझ्यासाठी आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी अभिमानास्पद असून नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्या पार्श्वभूमीवर हे निमंत्रण आमच्या साठी मोठी उपलब्धी असल्याची भावोत्कट प्रतिक्रिया प्रा. डॉ. तौर यांनी व्यक्त केली. डॉ. पृथ्वीराज तौर हे मराठी भाषेचे अभ्यासक, लेखक आहेत. त्याचबरोबर त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभाग घेतला आहे. साहीत्य क्षेत्रातील अनेक पुरस्कार त्यांना मिळाले असून ३० (तीस) पेक्षा अधिक ग्रंथ, कविता संग्रह अशी लेखन संपदा आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर डॉ. तौर यांना भारतीय लेखक म्हणून इजिप्तची राजधानी कैरो येथे आयोजित साहित्य महोत्सवात आमंत्रित करण्यात आले होते. तसेच चीनमध्ये आयोजित ब्रिक्स देशातील लेखकांच्या संमेलनात त्यांनी मराठी भाषेचे प्रतिनिधित्व केले. ऑक्टोबर २०२४ मध्ये अंताल्या, तुर्की येथे आयोजित जागतिक बालसाहित्य परिषदेत त्यांनी बीजभाषण केले.

### पांडूरंग रहाटकर यांचा षटकोनी मित्रमंडळाच्या वतीने सत्कार



**लोहा**-तालुक्यातील जनतेला दैनिक वृत्तपत्रांच्या माध्यमातून अनेक वर्षे हा व्यवसाय करणारे बाबु सावकार रहाटकर यांच्या कडुन यांचे जेष्ठ चिरंजीव पांडुरंग राहाटकर यांनी परंपरा जपुन वाचन संस्कृती रुजविण्याचे काम वर्तमानपत्रे व अनेक धार्मिक ग्रंथ व शैक्षणिक पुस्तके विकणारे राहाटकर कुटुंबातील स्व.अंनतराव नागापूरकर उत्कृष्ट वृत्तविकृत्ता पुरस्कार प्रधान केला या पुरस्काराबदल षट्कोन मित्रमंडळानी सत्कार केला. यावेळी खरेदी विक्री संघाचे संचालक भिमराव पाटील शिंदे,माजी नगरसेवक उत्तम महाबळे,तुकाराम दाढेल, गोविंद वड,केतन खिल्लारे, फिरोज मणियार,रेश्माजी दांगटे,सगर, दाढेल,कापुरे,मारोती कांबळे आदी मित्रमंडळाची उपस्थित होती.शहरात नव्याने षटकोनी मंत्रमंडळाची स्थापना झाल्याने सामाजिक व राजकिय वर्तुळात चर्चाला उदान आले आहे.

### बोरवाडीच्या भूमिपुत्राला राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार जाहीर

**नांदेड**-भोकर तालुक्यातील मौजे बोरवाडीचे भूमिपुत्र गंगाधर यशवंतराव वानोळे हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. गावाच्या



सर्वांगीण विकासासह तालुक्यातही समन्वयकाची भूमिका निभावत शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यातही गेली १७ वर्षे सक्रिय असल्याने त्यांना मराठवाड्यातील मातृभूमी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झालेला असून आज १२ जानेवारी रोजी बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. बंजारा आणि आदिवासी बहुल गारगोटवाडीला 'माझा गाव सुंदर गाव' योजनेत सहभागी करून ग्रामीण विकासात पुढे नेणे असो की संपूर्ण आदिवासी समाज बोरवाडीची 'डॉक्टरांचे गाव' म्हणून ओळख निर्माण करणे असो, भोकर येथे आदिवासी वस्तीगृह बांधकाम असो की जिल्हा परिषद,आश्रम शाळेची गुणवत्ता वाढ असो. अशा शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. आदिवासी समाज शिष्टमंडळाच्या माध्यमातून समाजातील विविध समस्या शासन प्रशासन स्तरावर मांडून समन्वयक या नात्याने त्याचा निपटारा करण्यातही वानोळे नेहमी कार्यशील असतात. सामाजिक विषयावर त्यांचे अनेक लेख प्रकाशित झालेले आहेत. यापूर्वीही त्यांना शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार व आदिवासी सेवक पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे.

### युवा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनाच्या प्रतिक्षेत

**नांदेड**-मुख्यमंत्री योजने अंतर्गत येथील राज्य परिवहन महामंडाळाच्या नांदेड आगारात युवा प्रशिक्षणार्थी म्हणून रुजू झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना मागील तिन महिन्यापासून विद्यावेतन मिळाले नाही. विद्यावेतन तातडीने मिळवून द्यावे अशी मागणी युवा प्रशिक्षणार्थ्यांनी एका निवेदनाव्दारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. माहे ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२४ या कालावधीत या प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन मिळाले नसल्याने ते अडचणीत सापडले आहेत. आर्थिक परिस्थिती बिकट त्यातच हे प्रशिक्षणार्थी दुरवरून ऑटोरिक्षाने ये-जा करतात. त्यामुळे त्यांचा दररोजचा खर्च ५० ते १०० रुपये असून हा खर्च देखील त्यांना इतरांकडून उसनवार करावा लागत असून, शासनाने तातडीने विद्यावेतन अदा करावे अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाव्दारे केली आहे.

## गजानननगर येथे महिला-पुरुष बचतगट

**नांदेड**-महिला व पुरुषांच्या घरगुती व किरकोळ गरजांसाठी अनेकदा सावकारा कडून कर्ज घ्यावे लागते त्याला पर्याय म्हणून गजानन नगर येथे गंगाधर निवृत्ती घुले व सुरेश राठोड यांच्या संकल्पनेतून महिला व पुरुष बचत गट स्थापन करून एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून बचत गटातील सदस्यांना छोट्या रकमांची कर्ज वाटप करण्यात येणार आहेत.

## शास्त्री महाविद्यालयात हिवाळी पदवी परीक्षा सुरळीत

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. ११ जानेवारी**

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत घेण्यात येणारी हिवाळी पदवी परीक्षा महाविद्यालयाचे प्रा.डॉ.कमलाकर कनसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडत आहे.

विद्यापीठाच्या वतीने दि.२६ नोव्हेंबर पासुन घेण्यात येणारी हिवाळी परीक्षा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कमलाकर कनसे यांच्या मार्गदर्शनाखाली व परीक्षा विभागप्रमुख डॉ. सुनीलचंद्र सोनकांबळे, सहाय्यक परीक्षा विभागप्रमुख प्रा. रामराव शेवलीकर यांच्या निरीक्षणाखाली कॉपीमुक्त सीसीटीव्हीच्या नजरेत सुरळीत पार पडत आहेत. परीक्षा सुरळीतपणे पार पडण्यासाठी मारुती डेबेकर, व्यंकटेश पालकृतवार, माधव मिरदोडे, राजेश गोविंदलवार, नारायण आडेराव, श्रीनिवास गोरजे, राजेश कोत्तावार बालाजी गंठोड इत्यादीचे सहकार्य लाभत आहे.

## जि. प. प्राथमिक शाळेसमोर गतीरोधक टाकण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ११ जानेवारी**

शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर गतिरोधक टाकण्यात यावे यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचे मुख्याधिकारी यांना निवेदन. मुख्य रस्ता झाल्यामुळे वाहणानांची राहादारी वाढली आहे त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून नगरपरिषदेने जिल्हा परिषद शाळेसमोर लवकरात लवकर गतिरोधक टाकण्यात यावे अशी मागणी काँग्रेस पक्षाने निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळे समोरिल रस्त्यावर वाहणांच्या रहदारीत मोठी वाढ झालेली आहे या रस्त्यावरून दोन चाकी, तीन चाकी आणि चार चाकी वाहने वेगाने धावत असतात त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही शाळा सुटल्यानंतर गेटमधून विद्यार्थी धावत बाहेर पडतात त्यामुळे अपघात होऊ शकते अपघात टाळण्यासाठी शाळेसमोर गतिरोधक टाकून अपघात टाळावे यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी कैलास गोडसे, गिरीष कोत्तावार , मुजीब पठाण,सूर्यकांत चौदंते, अतिक अहेमद, राधेश्याम ढगे, संतोष चमकुरे, अविनाश चौदंते , राजरत्न क्षीरसागर, या कार्यकर्त्यांसह आदींची निवेदनात स्वाक्षऱ्या आहेत.

## लोहा शहरात भाजप सदस्य नोंदणीला प्रचंड प्रतिसाद : सुर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ११ जानेवारी**

शहरात भाजप सदस्य नोंदणीला सुरुवात केली आहे. 'एक है तो सेफ है' चा नारा देत सदस्य नोंदणीला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे असे माजी लोकायुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी प्रतिपादन केले.

शहरात भाजपा सदस्य नोंदणी अभियान मोठ्या उत्साहात सुरू झाले आहे . देऊळ गल्ली येथून भारतीय जनता पार्टीने सदस्य नोंदणी अभियानाला प्रारंभ केला असुन भाजपा सदस्य नोंदणी अभियानाचे उद्घाटक गजानन सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी माजी नगरसेवक बबनराव निर्मले, माजी.नगरसेवक संदीप दमकोंडवार, अमोल व्यवहारे,युवराज वाघमारे, नगरसेवक नबी शेख, वैभव हाके, सचिन सुर्यवंशी, यशपाल निर्मले, बालाजी आईनवाडीकर, संजय चव्हाण, हनुमंत



लांडगे,लक्ष्मी फुलवरे,पिनू चुडावकर,संजय रहाटकर,दिलीप रहाटकर,विनय चंदलवाड,रेश्माजी दांगटे, संतोष मुंडे,गुलाम नबी, बाळू चुडावकर, शाहरुख शेख,सारंग बुजुर्गे, यांच्यासह कार्यकर्ते, लाडक्या बहिणी उपस्थित होत्या. यावेळी भाजपा सदस्य नोंदणी अभियानास प्रचंड मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असुन अनेक महिला, पुरूष, युवकांनी सदरील भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सहभाग नोंदविला.भाजपाचे सदस्य होण्याकरिता ८८००००२०२४ या क्रमांकावर आपल्या मोबाईलवरुन मिस्ड कॉल देऊन सदस्य नोंदनी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# बोंडगव्हाण आणि पडसा येथे वाळू चोरी करणारे दोन ट्रॅक्टर पकडले

### तहसीलदार यादव यांच्या मार्गदर्शनात नायब तहसिलदार जेठे यांची मध्यरात्री धडक कारवाई; आतापर्यंत ३२वाहने जप्त

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ११ जानेवारी**

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तसेच तहसीलदार किशोर यादव यांचे मार्गदर्शनाखाली महसूल विभागात अवैध धंदे विरोधात महाकाल म्हणून फेमस असलेले अवैध गौण खनिज उत्खनन,चोरी व वाहतूक करणाऱ्यांचा कर्दनकाळ ठरत असलेले नायब तहसीलदार कैलास जेठे यांची वाळू तस्करांविरोधात धडक मोहीम सुरच असून, त्यांनी दि.१० जानेवारी रोजी मध्यरात्री माहूर तालुक्यातील मौजे बोंडगव्हाण व पडसा येथून वाळू चोरी करणारे दोन ट्रॅक्टर पकडून तहसील कार्यालयात जमा केल्याची आणखी एक जबरदस्त यशस्वी कारवाई केली आहे. वाळू तस्कर महाकालच्या धसक्याने अंधार रात्रीचा फायदा घेत वाहनांचे लाईट बंद करून वाळू चोरी करत असल्याचा सुगावा लागताच महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे हे एखाद्या टीव्ही चॅनलवरील अवैध धंद्यावरील



शोध मालिका अथवा शोध चित्रपटातील नायकाप्रमाणे विविध प्रकारचे वेषांतर करून जायमोक्यावर पोहचत यशस्वी कारवाया करत असल्याने आतापर्यंत वाळूतस्करांची तब्बल ३२ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत.

तालुक्यातील विविध ठिकाणी वाळू तस्करांची याआधी ३० वाहने जप्त करून तहसीलदार किशोर यादव, नायब तहसीलदार तथा महाकाल कैलास जेठे, नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड यांनी गौण खनिज उत्खनन व चोरी करून वाहतूक करणाऱ्या चोरट्यांमध्ये कमालीचा जरब निर्माण केला असतानाच दि.१० रोजी मध्यरात्री छुप्या पद्धतीने तसेच लाईट बंद करून विना नंबरच्या वाहनाद्वारे दोन वाळू चोरी करणारी वाहने पकडल्याने वाळू तस्करात जबरदस्त दहशत निर्माण झाली असून, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी तहसीलदारांना अग्नीशस्त्र दिल्यास वेळ प्रसंगी वाळू तस्करांना गोळ्या घालण्यासही मागे पुढे पाहणार नसल्याचा गंभीर इशारा त्यांनी याआधीच दिला आहे. तरीही निर्ढावलेले काही तस्कर नदीपात्रातून विना नंबरच्या वाहनांचे लाईट बंद करून वाळू चोरी करत असल्याची माहिती मिळाल्याने महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी वेशांतर करून मौजे बोंडगव्हाण आणि पडसा येथून चोरीची वाळू घेऊन वाहतूक करणारी आणखी २ वाहने पकडल्याने वाळू तस्करी करणारी जप्त वाहनांची संख्या आता तब्बल ३२ वर जाऊन पोहोचली आहे.माहूर तहसीलदार किशोर यादव व ना.त.देठे आणि ना.त.डॉ.राठोड या माहूर तहसीलच्या त्रिमूर्तीकडून चोरीची वाळू व वाहतूक करणारे वाहनांच्या धरपकडीचा जबरदस्त धसका घेऊन आता वाळू तस्करांनी आपापली वाहने बिळात लपवून ठेवत स्वतः भुमिगत होण्याच्या मार्गावर असल्याच्या चर्चा ऐकायला मिळत आहेत.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी वाळू तस्करी करणाऱ्यांवर 'मोक्का' अंतर्गत कारवाई करण्याची परवानगी देत वाळू तस्करावर तडीपारची कार्यवाही करावी अशी मागणी पर्यावरणप्रेमी नागरीकांमधून होत असून सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या आदेशानुसार तहसीलदार किशोर यादव यांनी तयार केलेल्या पथकात महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे ,एस. के. साळसुंदर मंडळ अधिकारी, ओमप्रकाश तवर, ओंकार धनवे , प्रदीप कदम, सुमीत नैताम,अभिजीत कुडमते, साहेबराव गावंडे, तलाठी, ग्राम महसूल अधिकारी तसेच महसूल सेवक दिपक लोखंडे व सागर हिवाळे यांचेसह कोतवाल आणि कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

## राष्ट्रवादीच्या कंधार महिला शहराध्यक्षपदी आम्रपाली केकाटे

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ११ जानेवारी**

येथील सामाजिक कार्यक्रत्या सौ.आंम्रपाली राजकुमार केकाटे यांची आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नियुक्ती पत्र देऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला कंधार शहराध्यक्ष पदी निवड केली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना.अजित दादा पवार,प्रदेशाध्यक्ष मा.खा.सुनिल तटकरे,राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षा सौ.रुपालीताई चाकणकर,मा.आ.विक्रम काळे यांच्या आदेशानुसार लोहा-कंधार विधानसभेचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नांदेड येथील बैठकीत सौ. आंम्रपाली केकाटे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला कंधार शहराध्यक्ष पदी निवड केली. सौ.आंम्रपाली केकाटे ह्या घर संसार सांभाळत सतत सामाजिक तसेच राजकिय कामात सहभागी राहुन आग्रेसर होतात त्यांनी महिला संघटन करत कोरोणा काळात मोलाची भूमिका बजावली.

## पहिला पती असतांना दुसरा पती करणे पत्नीला पडले महागात

**• न्यायालयाच्या आदेशावरून पत्नीसह अकरा जणांविरूध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर ,दि. ११ जानेवारी**

पहिल्या पतीसोबत संसार सुरू असतांना पती सोबत बेईमानी करून दुसऱ्या पुरूषाशी विवाह करणे पत्नीला चांगलेच महागात पडले आहे. या प्रकरणात पहिल्या पतीने दिलेल्या तक्रारीवरून पत्नीसह अकरा नातेवाईकांविरूध्द न्यायालयाच्या आदेशाने अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, प्रकरणात फिर्यादी मनोहर सुरेश तरटे यांचा विवाह सन २०१९ साली झाला होता. लग्नानंतर मनोहर यांना एक अपत्य झाले, तो मुलगा आज तीन वर्षाचा आहे. या दोघांचा संसार सुरू असतांना त्यांची पत्नी यांनी तीन वर्षाचा मुलाल घेऊन मनोहरच्या घरातून पलायन केले. तिकडे मनोहर तरटे यांनी आपली पत्नी आणि मुलाचा सर्वत्र शोध घेतला. परंतू ते त्यांना कुठेही आढळून आले नाही. दरम्यान तरटे यांची पत्नीने अंकुश सांडू शिंदे रा. हट्टी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांच्याशी दुसरा विवाह केला. याबाबत अनेक वेळा अर्धापूर पोलीस ठाण्यात तक्रार देवूनही आरोपी विरूध्द कसल्याही प्रकारची कारवाई झाली नाही. शेवटी तक्रारकर्ते मनोहर सुरेश तरटे यांनी न्यायालयाची दारे ठोठावली.



या प्रकरणी फिर्यादी मनोहर तरटे यांच्याकडुन ॲड. शेख आमेर शेख सगीर यांनी अर्धापुर न्यायालयात भक्कम पुरावे देत बाजु मांडल्यामुळे आरोपी पत्नी हिने पहिल्या पतीसोबत बेईमानी करून दुसऱ्या व्यक्तीसोबत दुसरा विवाह केल्यामुळे फिर्यादीची पत्नी व तिच्या नातेवाईकांवर गुन्हा दाखल करण्याची न्यायालयासमोर विनंती केली. यात फिर्यादीचे वकील ॲड. शेख आमेर शेख सगीर यांनी केलेल्या भक्कम युक्तीवादानंतर अर्धापूर न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायाधीश क्यु. आर. सय्यद यांनी आरोपी पत्नीसह इतर ११ नातेवाईकांविरूध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.

अर्धापूर न्यायालयाच्या या आदेशानुसार फिर्यादी मनोहर सुरेश तरटे यांच्या तक्रारीवरून आरोपी पत्नी, दुसरा पती अंकुश सांडू शिंदे. रा. हट्टी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर, भिमराव जालिंदर भोसले, देवशाला भिमराव भोंसले, दिपाली अभिमान भोसले, अभिमान पि. मचिंदर भोसले, जालिंदर सदाशिव भोसले, देवकाबाई जालिंदर भोसले, रा. कोताळा ता. मानवत जि. परभणी, सुरेश सांडू शिंदे, कांताबाई सांडू शिंदे, आजोबा सांडू बारकू शिंदे रा. हट्टी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर या एकूण ११ इतर नातेवाईकांविरूध्द फिर्यादी मनोहर सुरेश तरटे यांच्या तक्रारीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून या प्रकरणी पुढील तपास जमादार बोदमवाड हे करित आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रविवार दि १२ जानेवारी रोजी ११ ते २ आस्थीरोग तपासणी

## मनके व सांधे बदली शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रविवार १२ जानेवारी रोजी ११ ते २ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.

या शिबीरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजार रुपये व पुढील खर्चात गुणवत्तापूर्ण इन्प्लांटसह, आर्थोस्कोपी निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. शिबीरात आस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. आज पर्यंत हजारो अस्थिरोग असणार्या रुग्णांवर उपचार करुन असंख्य रुग्ण या आजारापासून मुक्त झालेले आहेत. आस्थीरोग शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे.

रविवार १२ जानेवारी रोजी ११ ते २ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉ.रोहन धोत्रे व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील आस्त्रीरोग रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीडचे विश्वस्त व समस्त जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# रोटरीच्या पुढाकारातून महारक्तदान शिबीर

## पंधरा संघटनांचा सक्रीय सहभाग; आज होणार शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

राष्ट्रीय युवा दिन, राजमाता जिजाऊ साहेब जयंती तसेच स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून रोटरी परिवार बीड व विविध सामाजिक संघटनेच्या वतीने बीडमध्ये ऐच्छिक महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि.१२ जानेवारी रोजी सकाळी ९ ते १ या वेळेत श्री.गुरुनानक मंदिर, श्री.स्वामी समर्थ मंदिराजवळ, सह्योग नगर येथे हे शिबीर होणार आहे.

बीड मध्ये प्रथमच सर्व सामाजिक संघटना यांनी एकत्रित येऊन या महा रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले आले आहे. गत काही काळापासून जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत पुरेसा साठा उपलब्ध नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. ही बाब लक्षात घेवून हे शिबीर आयोजीत करण्यात आले असून यामध्ये शहरातील नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ बीडचे अध्यक्ष – रो.मेघराज पिंगळे, रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे अध्यक्ष – रो.नितीन गोपन, रोटरी क्लब ऑफ बीड सिटीचे अध्यक्ष – सौ.संध्या मिश्रा, बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष – भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष – अशोक शेटे, बीड डिस्ट्रिक्ट कन्सल्टिंग इंजिनीअर्स असोसिएशन चे अध्यक्ष – दिपक कुलकर्णी, माहेश्वरी प्रगती मंडळ चे अध्यक्ष – सुरेंद्र कासट, बीड शहर व्यापारी संघटनाचे अध्यक्ष – प्रकाश कानगावकर, डेंटल असोसिएशन बीडचे अध्यक्ष – डॉ.उमाशंकर विश्वेकर, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष – ॲड. रोहिदास येवले, भारतीय जैन संघटना बीडचे अध्यक्ष – निलेश ललवाणी, क्रेडाई संघटना बीडचे अध्यक्ष – संतोष जाधव, स्वराज्य मुद्रा सामजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष – सौ अनिताताई भोसले, बीड जिल्हा सीए व टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सीए भानुदास जाधव, पतंजली योग समिती बीडचे प्रांतप्रभारी ॲड.श्रीराम लाखे, योग प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष ॲड.प्रशांत माने यांनी केले आहे. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी रो.अक्षय शेटे, रो.बालाजी घरत, रो. नितीन भोसले, रो.गणेश मैड, डॉ.अनिल थोरात हे परिश्रम घेत आहेत.

# संघर्षातूनच दिव्यत्व प्राप्त होते – ना.पंकजा मुंडे

### स्वामी विवेकानंद यांनी भारतीयांचे आत्मभान जागृत केले – प्रा.अभय भंडारी

### दीनदयाळ बँकेची युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ जानेवारी**

दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी प्रसिद्ध व्याख्याते प्रा.अभय भंडारी यांनी 'स्वामी विवेकानंद आणि भारतीय राष्ट्रवाद' या विषयावर आपले मौलिक चिंतन मांडले. व्याख्यानमालेचे उद्घाटन बँकेच्या संचालिका तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता, स्वामी विवेकानंद, पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. बँकेच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तर यावेळी बँकेचे संस्थापक प्राचार्य राजाभाऊ धाट यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख व्याख्याते प्रा.अभय भंडारी, भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा, बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे सचिव धनराज सोळंकी, छत्रपती राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष राजू मोरे आणि दीनदयाळ बँकेचे संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, सर्व संचालक श्री इंजि.बिपीन क्षीरसागर, मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, प्रा.अशोक लोमटे, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, डॉ.विवेक दंडे, चैनसुख जाजू, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी, महादेव ईटके व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, संघर्षातूनच दिव्यत्व प्राप्त होते. याची प्रचिती स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यातून पुढे येते. आज राष्ट्र महासत्तेकडे वाटचाल करीत असतानाही त्यांचे विचार दिशादर्शक ठरत आहेत. प्रत्येक युगात एक युगपुरूष जन्माला येत असतो. त्याचे विचार हे चिरकाल जगाला मार्गदर्शक ठरत असतात.



स्वामी विवेकानंद यांचे विचार युवकांना कायम प्रेरणादायी ठरणारे आहेत. असे सांगून त्यांनी दीनदयाळ बँक व्याख्यानमालेच्या माध्यमातून प्रबोधनाची चळवळ अखंडितपणे राबवित असल्याचे कौतुक ही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.मुंडे यांनी केले. तर प्रथम पुष्प गुंफताना 'विवेकानंद– आणि भारतीय राष्ट्रवाद' हा विषय अतिशय समरसतेने गुंफताना प्रा.अभय भंडारी (विटा जि. सातारा) यांनी सांगितले की, स्वामीजींनी भारतीय स्वातंत्र्याचा आणि आर्थिक सबलीकरणाचा पुरस्कार केला. राष्ट्र हेच ईश्वर माना असा मौलिक संदेश दिला. स्वामीजींच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव संबंध जगावर पडला. ज्ञान आणि साधना हे मार्ग स्वामीजींनी दाखवले. त्यांनी आत्मबलाचे महत्त्व पदोपदी विषद केले. १२०० वर्षे गुलामगिरी अनुभवलेला भारतीय समाज मानसिकदृष्ट्या खचला होता. तेव्हा स्वामी विवेकानंद यांनी देशभर भ्रमंती करून अस्थिपंजर झालेल्या भारतीयांशी संवाद साधला. त्यांना जाणून घेतले. त्यांचे मनोबल वाढविले. अमेरिकेच्या शिकागो येथील जागतिक धर्म परिषदेत ७ हजार प्रतिनिधींसमोर हिंदू धर्म व संस्कृतीचे दर्शन घडविले. हिंदू धर्माचे चिंतन मांडले. कर्म सिध्दांत सांगितला. चारित्र्य, राष्ट्रप्रेम यांचा पुरस्कार केला. युवकांनी सत्य आणि निर्भयता आत्मसात करावी असा विचार मांडला. आत्म्याची शुध्दता, पावित्र्य, सकारात्मक विचार, सत्याचा आग्रह धरला. विविध उदाहरणे देत प्रा.भंडारी यांनी तत्कालीन भारतीय जनतेचे आत्मभान जागृत करण्याचे काम स्वामी विवेकानंद यांनी केले असे प्रतिपादन केले. प्रा.भंडारी यांनी तपशीलवार, मुद्देसूद, प्रवाही व अभ्यासपूर्ण चिंतन मांडले. त्यामुळे उपस्थित रसिक – श्रोत्यांना प्रा.भंडारी यांचे व्याख्यान मनापासून भावले, आवडले. म्हणून रसिक – श्रोत्यांनी ही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुरूवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय संचालक इंजि.बिपिन क्षीरसागर यांनी करून दिला. सुत्रसंचलन संचालक मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार तज्ज्ञ संचालक ॲड.अशोकराव कुलकर्णी यांनी मानले. वैशालीताई विडेकर यांनी पद्य सादर केले. तर संचालिका शरयूताई हेबाळकर यांनी पठन केलेल्या शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी अंबाजोगाईतील विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, युवक, रसिक श्रोते उपस्थित होते. आयोजित व्याख्यानमालेत शनिवार, दि.११ जानेवारी रोजी प्रकाश पाठक (धुळे) यांचे 'पंचप्रण' – सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर व्याख्यान होईल. बँकेच्या वतीने दि.११ जानेवारी रोजी सहकार भारती स्थापना दिवस ही साजरा करण्यात येईल. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा – संविधान' या विषयावरील व्याख्यानाने होईल. तसेच १२ जानेवारी रोजी युगपुरूष स्वामी विवेकानंद यांची जयंती बँकेच्या वतीने साजरी होईल. अंबाजोगाई शहर व परिसरातील रसिक, श्रोते, नागरिक, माता, भगिनी आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिमुर येथे होणार्या शिक्षकेत्तर महामंडळाच्या ५२ व्या राज्यस्तरीय अधिवेशनास कर्मचार्यांनी उपस्थित रहावे– जिल्हाध्यक्ष संजय डावकर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर महामंडळाचे ५२ वे राज्यस्तरीय अधिवेशन चंद्रपुर जिल्ह्यातील चिमुर येथे १९ जानेवारी रोजी होत आहे. या अधिवेशनास जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर यांनी केले आहे.

शिक्षकेत्तर महामंडळाच्या अधिवेशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनासाठी संपूर्ण राज्यातून हजारो शिक्षकेत्तर बंधु-भगिनी उपस्थित राहणार असल्याची माहिती शिक्षकेत्तर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी दिली असुन माध्यमिक शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचार्यांचे अनेक प्रलंबित प्रश्न महामंडळाच्या माध्यमातून या पुर्वी सोडवण्यात आले असुन उर्वरित प्रलंबित प्रश्न देखील लवकरात लवकर महामंडळाच्या माध्यमातून सोडवण्यात येतील. या अधिवेशनास जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाउपाध्यक्ष शेख मोहसीन, नंदकुमार शिंदे, सचिव नामदेव वाघ, सहसचिव दत्तात्रय आगवान, कार्याध्यक्ष अविनाश कळंबकर, कोषाध्यक्ष सतिष महाजन आदिंच्या वतीने करण्यात आले आहे.



# स्थानिक गुन्हे शाखा–बीड उल्लेखणीय कामगिरी

## पुणे येथील कोयता गँग मधील कुख्यात फरार असलेला मुख्य आरोपी गोरख सातपुते जेरबंद




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ जानेवारी**

नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंदे व शस्त्र बाळगणाऱ्या विरुध्द कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंदे व शस्त्र बाळगणारे इसमांची गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी अधिनस्त अधिकारी यांना सुचना दिल्या आहेत. त्यावरुन दिनांक १०/०१/२०२५ रोजी स्थागुशा येथील पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे हे त्यांचे पथकासह गेवराई उपविभागात पेट्रालिंग करीत असतांना पोना/ विकास वाघमारे यांना गुप्त बातमी मिळाली की, म्हाडा कॉलनी जवळ रस्यार*वर एका रिक्षामध्ये दोन इसमांकडे तलवार व कोयता आहे अशी खात्री लायक बातमी मिळताच सदर माहिती पो.नि.श्री. उस्मान शेख यांना कळवुन त्यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पथकाला दिले त्यावरुन स्थागुशा पथक तात्काळ बातमी ठिकाणी रवाना होवुन सदर इसमाचा शोध घेण्यात सुरवात केली असता म्हाडा कॉलनी जवळ रस्यार*वर सापळा लावला सदर इसम हे पथकाला बघुन टोरिक्षामधुन पळुन जाण्याचे बेतात असतांना त्यांचेवर झडप घालुन स्था.गु.शा. अधिकारी व अंमलदार यांनी पकडले. त्यांची नावे १) गोरख प्रमुख सातपुते वय २९ वर्ष रा. काळेवाडी फाटो, थेरगाव ,जि.पुणे, २) तात्याराव उर्फ वैभव विजय पहाडे वय २८ वर्षे रा. रहाटी फाटा, अमरदिप कॉलनी, पुणे असे सांगितले . त्यांचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता , एक लोखंडी तलवार, एक लोखंडी चाकु व गुन्हयात वापरलेली रिक्षा असा एकुण १,०४,०००/– रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सफौ/तुळशिराम जगताप यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्याद वरुन नमुद दोन्ही आरोपीतां विरुध्द पो.स्टे.गेवराई येथे भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील दोन्ही आरोपी हे पुणे येथील कोयता गँगचे सदस्य असुन कुख्यात असुन पो.स्टे.काळेवाडी (पिंपरीचिंचवड) गुरनं १०/२०२५

हाफ मर्डर च्या गुन्हयामध्ये फरार आरोपी आहेत. दोन्ही आरोपीतांना स्था.गु.शा.पथकाने पो.स्टे.गेवराई यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन पुढील तपास पो.स्टे.गेवराई करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री. नवनीत काँवत पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, सफौ / तुळशिराम जगताप, पोह/कैलास ठोंबरे, मनोज वाघ, विष्णु सानप, राहुल शिंदे, पोना/ विकास वाघमारे व चालक सुनिल राठोड यांनी मिळुन केली आहे.

# शासकीय रेखाकला परीक्षा (इंटरमेजिएट,चित्रकला) २०२४ च्या परीक्षेत खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील चैत्राली करपुडेचे राज्यस्तरावर यश

## खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचा १००% निकालाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ जानेवारी**

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागामार्फत कला संचालनालय मुंबई तर्फे घेण्यात येणा-या शासकीय ग्रेड परीक्षा (चित्रकला) २०२४ चा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून यात चैत्राली करपुडे इ.९वी या विद्यार्थिनीने महाराष्ट्रात पन्नासावा क्रमांक पटकावला आहे.जिल्हा परिषद केंद्र १३१००२ या केंद्रावर ७६ विद्यार्थी या परीक्षेस प्रविष्ट झाले होते.त्यापैकी – ग्रेड मध्ये २६,आदित्य कावळे,अमृता हेडे,अनिकेत गित्ते,अंजली पांचाळ,अनुष्का बिंरगे,अरूधंती देशपांडे, धनश्री बडे,गार्गी चाटे,गौरव जैन,जयश्री केंद्रे,कौस्तुभ मातेकर,क्षितीजा धायगुडे, लावण्या देशपांडे,माहेश्वरी भताने,परिक्षीत पाखरे,प्रिया माळी,प्रियल जोशी,साक्षी जाधव,संस्कृती कापसे,श्रेया दिंडोरे,श्रीकृष्ण माने,सुमेधा शेप,स्वराली महाजन,तनस्वी चौरे,वेदिका कदम इ ग्रेड मध्ये २३ तर उ ग्रेड मध्ये २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयाचा शेकडा निकाल १००% लागला आहे.वरील विद्यार्थ्यांना कला शिक्षक उमेश डोंगे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. वरील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्षडॉ.अतुल देशपांडे,मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे,शालेय समितीचे सर्व सदस्य,उपमुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे, पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## ‘दयानंद’ला इस्रोचे नोडल सेंटर म्हणून मान्यता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयास इस्रो अंतर्गत इंडियन इंस्टिट्यूट ऑफ रिमोट सेन्सिंग देहरादूनमार्फत विविध विषयावर आधारित अभ्यासक्रम ऑनलाईन व ऑफलाईन चालवले जातात. सदरील केंद्रामार्फत शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारची अट नसून कुठलाही विद्यार्थी,प्राध्यापक अथवा शिक्षक अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन नोंदणी करू शकतो.

दयानंद शिक्षण संस्थेने अनेक समाजाभिमुख उपक्रम राबविले असून आता ह्या केंद्रास मिळालेली मान्यता ही विद्यार्थ्यांसाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार विविध विषयावर शिक्षण घेण्याची संधी प्राप्त करून देईल,असा विश्वास दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी व्यक्त केला. तसेच विद्यार्थ्यांच्या आंतरिक गुणांना वाव मिळावा व त्यातून विद्यार्थी एक सुजाण नागरिक बनावा त्याबाबत संस्था नेहमीच आग्रही राहिलेली आहे. सदरील केंद्राची मान्यता ही लातूर जिल्ह्यासाठी एक विशेष बाब होय,असे मत संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी व्यक्त केले. इस्रोमार्फत मान्यता प्राप्त झालेले दयानंद विज्ञान महाविद्यालयातील असे केंद्र हे मराठवाड्यातील एकमेव केंद्र असून ह्याचा लाभ जास्तीत- जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा,असे आवाहन दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे ह्यांनी विद्यार्थ्यांना केले.ह्या केंद्रासाठी नोडल ऑफिसर म्हणून संस्थेचे ट्रेनिंग एंड प्लेसमेंट ऑफिसर राहुल आठवले ह्यांची निवड केली असून,विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देऊन इस्रो व अनेक नामांकित कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी प्राप्त होण्यासाठी अशा वैविध्यपूर्ण अभ्यासक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांना नक्की होईल असा विश्वास राहुल आठवले यांनी व्यक्त केला.

### संक्षिप्त वृत्त...

## अधिकारी, कर्मचाऱ्यांचे श्रमदान जिल्हा परिषदेत केला उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** निरोगी राहण्यासाठी आपले कार्यालय, परिसर, गाव नेहमी स्वच्छ राहणे आवश्यक आहे. स्वच्छता मोहिमेस अधिक गती मिळावी म्हणून जिल्हा परिषदेच्या परिसराची शुक्रवारी स्वच्छता करण्यात आली. विशेषतः अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदान करीत परिसराची स्वच्छता केली.

यावेळी जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, बाळासाहेब वाघ, कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, व्ही.जी. चिटगोपकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, मोहन अभंगे, उपअभियंता कुलकर्णी, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, गटविकास अधिकारी संतोष माने, प्रशासन अधिकारी बादणे, रामकिशन फड, सचिन कुलकर्णी, जगताप, उद्धव फड यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. अतिरिक्त सीईओ तडवी म्हणाले, स्वच्छता, संस्कार महत्त्वाचे आहेत. नागरिकांनी शौचालयाचा वापर करावा. स्वच्छता राखल्यास साथीचे आजार पसरणार नाहीत. डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजारांपासून गाव मुक्त होईल.

## रस्त्यावर वाहन उभे करून अडथळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** सार्वजनिक रस्त्यावर वाहन उभे करून वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याची घटना बार्शी रोड पीव्हीआरनजीक घडली. याबाबत वाहन (एमएच २४ एटी ५३५८) चालकाविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सार्वजनिक रस्त्यावर स्वतः च्या व इतरांच्या जीविताला धोका होईल, अशा स्थितीत वाहन उभे केले. यामुळे रहदारीलाही अडथळा निर्माण झाला, असे पोलिस हेड कॉन्स्टेबल मयूर मुगळे यांनी एमआयडीसी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार ऑटो (एमएच २४ एटी ५३५८) चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ. मुळे करीत आहेत.

## प्रजासत्ताकदिनी खासदारांच्या घरापुढे हलगी नाद आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर पायात पादत्राणे घालून जाणाऱ्या खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी करणारे निवेदन युवा भीम सेनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. प्रजासत्ताकदिनी त्यांच्या घरापुढे हलगीनाद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

२४ डिसेंबर २०२४ रोजी येथील आंबेडकर पार्कवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यास गेलेल्या खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना त्यांच्या पायात चप्पल तशीच ठेवली. त्या डॉ. काळगे यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, त्यांचे भत्ते बंद करावेत, शासकीय योजनांचा लाभही बंद करावा, अशी मागणी आहे. निवेदनावर युवा भीम सेनेचे जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे, उमा आदमाने, नीलेश मस्के, अजय कांबळे, अनिकेत सोनवणे, प्रशांत काळे, इंदूबाई आदमाने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## केजीएनच्या शिबिरात ६२० जणांची मोफत तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** येथील डॉ. रजिया शेख यांच्या स्मरणार्थ केजीएन टेस्ट ट्यूब बेबी हॉस्पिटल व नोबल सामाजिक विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिबिरात ६२० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. याचे उद्घाटन डॉ. अब्दुल हमीद चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात लातूरमधील तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. त्यात डॉ. अमीर शेख, डॉ. असद खान, डॉ. चाँद पटेल, डॉ. जियाउद्दीन सिद्दिकी, डॉ. राघवेंद्र देशमुख, डॉ. मन्सूर भोसगे, डॉ. अजीम मशायक, डॉ. सादिया शेख, डॉ. नाजिया शेख व डॉ. अब्दुल खय्यूम यांनी रुग्णांची तपासणी केली. त्यांना औषधोपचारही करण्यात आले. डॉ. रजिया शेख यांचा समाजसेवेचा वसा सुरू ठेवण्यासाठी केजीएन हॉस्पिटल प्रयत्न करेल, असे डॉ. अमीर शेख यांनी यावेळी सांगितले.

## सोयाबीन हमीभाव खरेदीला मुदतवाढ द्यावी

### भाजपाचे आ. रमेश कराड यांची पणनमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**



**लातूर, दि.११ जानेवारी -** शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महायुती शासनाने खरीप हंगामातील सोयाबीन पिकाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी सुरू केलेल्या केंद्रांना मुदतवाढ देऊन सोयाबीन खरेदी केंद्रांवर गरजेनुसार बारदाना उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भाजपचे नेते तथा ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

लातूर जिल्हा हा सोयाबीन उत्पादक जिल्हा असून जिल्ह्यातील बहुतांशी शेतकरी सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात घेतात. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महायुती शासनाने हमीभावाने सोयाबीनची खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्र सुरू केली आहेत. जिल्ह्यात जवळपास ५० सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झाले. त्यापैकी सहा खरेदी केंद्रांच्या माध्यमातून ग्रामीण मतदारसंघातील शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी केली जात आहे. सोयाबीन खरेदीची मुदत १२ जानेवारी २०२५ रोजीपर्यंतच असून बहुतांशी शेतकऱ्यांचे सोयाबीन अजूनही घरातच आहे. खरेदी केंद्रांवर नोंदणी केलेल्या केवळ दहा ते पंधरा टक्केच शेतकऱ्यांनी आतापर्यंत खरेदी केंद्राला सोयाबीन दिले आहे. यावर्षी पाऊस मुबलक झाल्याने सोयाबीन पिकातील ओलावा, रब्बी हंगामाची लगबग, तूर व इतर पिकांतील फवारणी यामुळे सोयाबीनच्या राशी करण्यास विलंब झाला. सोयाबीन खरेदी केंद्र बरेच दिवस बारदाण्याअभावी बंद होते. अनेक केंद्रांवर बारदाण्याचा तुटवडा असल्याने शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागला. प्रत्येक सोयाबीन खरेदी केंद्रास गरजेनुसार बारदाना उपलब्ध करून द्यावा, खरेदी केलेल्या सोयाबीनसाठी गोडाऊन उपलब्ध करावे, शिल्लक सोयाबीन खरेदीसाठी शासनाने सोयाबीन खरेदी केंद्रास मुदतवाढ देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आमदार कराड यांनी मुख्यमंत्री फडणवीस व पणन मंत्री रावल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.





## लातुरात तिसऱ्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** महाराष्ट्र नवनिर्माण सेना लातूर व कृषी नवनिर्माण ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी, नरवटवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या परिसरात दि. ७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान कृषी नवनिर्माण २०२५ या राज्यस्तरीय तिसऱ्या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे उपस्थित राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे प्रदेश अध्यक्ष संतोष नागरगोजे यांनी पत्रकार भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

गेल्या ५ ते ७ वर्षापासून मराठवाडयातील शेतकरी कधी कोरड्या तर कधी ओल्या दुष्काळाला सामोरा जात आहे. सततच्या हवामानातील बदलामुळे कधी पाऊसच नाही तर कधी जास्तीचा पाऊस अशी विचित्र परिस्थिती झाल्याने कोणतेच पीक मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या हाती लागायला तयार नाही. त्यामूळे मराठवाडयातील शेतकरी कर्जबाजारी होऊन वैफल्यग्रस्त झाला आहे अशा बिकट परिस्थीतीमुळे मराठवाडयातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत. या दुष्काळी परिस्थीतीत शासन मात्र शेतकऱ्यांना कसलीही मदत किंवा दुष्काळवरील उपाययोजना करावयास तयार नाही त्यामुळे कमी पावसात पाण्याचे व्यवस्थापन करुन आधुनिक तंत्रासह शेती कशी करावी शेतीला जोडधंदयाची जोड देऊन शेतकऱ्यांना शेतीक्षेत्रात स्वावलंबी होता यावे शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीपद्धतीतून बाहेर पडून आधूनिक शेतीची कास धरुन त्यांचे उत्पन्न किमान दुपटीने वाढावे, प्रदर्शनातील व्यापक प्रबोधनातून शेतक-यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारु नये, जागतीक दर्जाचे नवे शेतीतंत्र शेतीतील साधन सामग्री अत्याधुनिक शेती अवजारे कृषीतील नवनविन तंत्रज्ञान शेतकऱ्यांना माहीती व्हावे या उदात्त हेतूने या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.

या कृषीप्रदर्शनात ३०० पेक्षा अधिक स्टॉल्स असणार आहेत या प्रदर्शनात कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र, आत्मा पणनमहामंडळ, पशूसंवर्धन विभाग, कृषी उत्पन्न बाजार समिती मत्स्य संवर्धन विभाग, रेशीम शेती विभाग, वखार महामंडळ या सर्व शासकीय विभागांचा सहभाग असेन या प्रदर्शनास शासनाच्या शेती संदर्भातील विविध योजना व धोरण या विषयांवर कृषी तज्ञानी थेट संवाद साधता येणार आहे.

या प्रदर्शनात शेतीतील विविध क्षेत्रातील विषयतज्ञ आणि शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञानी व्याख्याने ठेवली आहेत.या प्रदर्शनात खते, बि-बियाणे, औषधे, शेती औजारे सौरउर्जा कृषी विषयक पुस्तके, महीला बचत गट यांचे स्टॉल असतील या प्रदर्शनासाठी प्रवेश निशुल्क असेन या प्रदर्शनासाठी भव्य पार्कीगची व्यवस्था, २४ तास जनरेटर, व्यवस्थापन कार्यालय सभागृह, टॉयलेटस, फायर स्टेशन या सर्व बाबींची व्यवस्था असणार आहे.

## लातुरात ठप्प झालेली सोयाबीन खरेदी पूर्ववत होण्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** माजी आमदार धिरज देशमुख यांच्या मागण्यांची सरकारने तातडीने दखल घेतली असल्याने बारदाण्याचा तुटवडा दूर होण्यास सुरूवात झाली आहे.

लातूर जिल्ह्यातील १६ नाफेड केंद्रावर ३५ हजार बारदाना उपलब्ध झाला आहे. शिवाय, सोयाबीन खरेदीस सरकारने ८ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ देण्याबरोबरच शेतकऱ्यांकडील सुस्थितीतील बारदाना स्वीकारण्याचेही सरकारने आदेश दिले आहेत.

लातूरसह राज्यातील सोयाबीन खरेदीसाठी उघडण्यात आलेल्या बहुतांश खरेदी केंद्रावर गेल्या तीन आठवड्यांपासून बारदाण्याचा तुटवडा असल्याने सोयाबीन खरेदी पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यामुळे खरेदी केंद्रावर दररोज चकरा मारण्याची वेळ शेतकरी बांधवांवर आली आहे. त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे माजी आमदार धिरज देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र राज्य कृषी व पणन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक (पुणे) यांना पत्र पाठवून या विषयाकडे त्यांचे लक्ष वेधले.

सोयाबीन खरेदी बंद असल्याने माल वाहतूक करणाऱ्या वाहनांचे अतिरिक्त भाडे शेतकऱ्यांना भरावे लागत आहे. अनेक शेतकऱ्यांना आर्थिक, मानसिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने यात हस्तक्षेप करून तातडीने बारदाणा उपलब्ध करुन द्यावा अथवा शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या बारदाण्याला मंजुरी देऊन सोयाबीनची तात्काळ खरेदी सुरु करावी तसेच नोंदणीसाठी व खरेदीसाठी मुदत वाढवून द्यावी, याही मागण्या देशमुख यांनी केल्या होत्या.

## विद्यार्थी केंद्रबिंदू मानून ज्ञानदान करावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** आजचे विद्यार्थी हे देशाचे उद्याचे भविष्य आहेत. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून देशाला बलशाली बनवावे, असे आवाहन आमदार विक्रम काळे यांनी केले.

अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्यावतीने लातूर येथे आयोजित मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय दोन दिवशीय शैक्षणिक संमेलनानिमित्त क्रीडा संकुल येथून लोकनेते विलासराव देशमुख नगरी, थोरमोटे लॉन्स, लातूर या संमेलनस्थळापर्यंत शुक्रवारी सकाळी शोभायात्रा काढण्यात आली. उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून आमदार काळे बोलत होते. शोभायात्रेत विविध शाळांमधील



जवळपास दीड हजार विद्यार्थी विविध महापुरुषांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते.

यावेळी शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष सुधाकर तेलंग, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, राज्य मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष रावसाहेब आवारे, राज्याध्यक्ष के. एस. डोमसे, संमेलनाध्यक्ष बाबूराव जाधव, कार्याध्यक्ष हणमंत साखरे, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश देशमुख, संस्थाचालक संघटनेचे कोषाध्यक्ष तथा शोभायात्रेचे संयोजक प्राचार्य डी. एन. केंद्रे, वसंत पाटील, बजरंग चोले, शिवराज म्हेत्रे, सहायक संचालक दत्तात्रय मठपती, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे, मदन धुमाळ, शिवकांत वाडीकर आदींची उपस्थिती होती.

## एक विद्यार्थी ; पाच वृक्ष चळवळ ही काळाची गरज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय येथे भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार विजेते वृक्ष मित्र सुधाकर देशमुख यांचे गीत संवाद कार्यक्रम व व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त रेहमान सय्यद, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. अच्युत भरोसे, डॉ. सारिका भालेराव व डॉ. भास्कर आगलावे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले कि एक पेड माँ के नाम, एक पेड पिता के नाम, एक पेड गुरू के नाम, एक पेड दोस्त के नाम और एक पेड खुद के नाम म्हणजेच एक विद्यार्थी: पाच वृक्ष चळवळ प्रत्येक शाळा व महाविद्यालयात राबविणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, देशी प्रजातीच्या जंगली वृक्षांची रोपे लागवड व संवर्धन करून हवानाम बदल अनुकूल पर्यावरण निर्मिती होण्यास मदत होते. शत कोटी वृक्ष लागवड चळवळीत कृषि महाविद्यालय, लातूर व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूरचा गत एक दशकांपासून सक्रीय सहभाग राहिला आहे असे ते यावेळी म्हणाले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## आमदार देशमुखांच्या सूचनेनुसार अष्टविनायक पोलीस चौकी सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी गुरुवारी सकाळी शहरातील शिवाजीनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्याशी फोनवरून संवाद साधून शिकवणी परिसरातील बंद असलेली अष्टविनायक मंदिराशेजारील पोलीस चौकी पुन्हा सुरू करावी, यासह अन्य सूचना केल्या होत्या. यानुसार ही पोलीस चौकी पुन्हा सुरू करण्यात आली आहे.



अत्यंत रहदारीचा परिसर असलेल्या शिकवणी परिसरात हाणामारी, टवाळखोरांचा नाहक त्रास विद्यार्थ्यांना होऊ नये यासाठी चार्लीची गस्त वाढवावी, दामिनी पथक रात्री-अपरात्री कायम ठेवावे, शिकवणी परिसरात ड्युटीवर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे मोबाइल नंबर शिकवणी चालकांना द्यावेत, या चौकीला पुरुष व महिला कर्मचारी कायमस्वरूपी नेमावेत, अशी सूचना आमदार देशमुख यांनी पोलीस निरीक्षक सागर यांना केली होती. या संदर्भात पोलीस निरीक्षक सागर यांची काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी भेट घेऊन शिकवणी परिसरातील प्रश्नासंदर्भात चर्चा केली. या सूचनांची तत्काळ अंमलबजावणी करण्यात येईल, अशी ग्वाही पोलीस निरीक्षक सागर यांनी दिली. यावेळी माजी महापौर डॉ. स्मिता खानापुरे, माजी नगरसेवक राजकुमार जाधव, राजू मोटेगावकर, धर्मराज जांभळे, महेश नागलगावे, सुवर्णा खानापुरे, शीतल जयगावकर आदी उपस्थित होते.

## उसाच्या शेतातून गाय घेऊन गेल्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** तू माझ्या उसाच्या शेतातून गाय घेऊन का जात आहेस, असे विचारले असता आरोपीने शिवीगाळ करून फिर्यादीस व त्यांच्या पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना मसलगा शिवारात घडली.

फिर्यादीच्या उजव्या हाताच्या बोटाला दाताने चावा घेऊन जखमी केले. तू जर परत मला या शेतातून गाय घेऊन जाताना आढळलास तर तुला व तुझ्या पत्नीला खल्लास करून टाकतो, असे म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली, असे नामदेव नारायण चामे (रा. मसलगा, ता. निलंगा) यांनी निलंगा पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार विजयकुमार नारायण चामे (रा. मसलगा, ता. निलंगा) याच्याविरुद्ध गुन्हा नोंद आहे.

## वाहनासह ११ लाखांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ जानेवारी -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वाहनासह १० लाख ८४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करून एकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात पथक तयार करून अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, एका वाहनातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करण्यासाठी ते निटूर ते लातूर अशी वाहतूक होणार आहे, अशी माहिती शुक्रवारी सदर पथकाला मिळाली. पथकाने लोदगा गावाजवळ सापळा लावून गुटख्याची वाहतूक करणारी ईर्टिका





एम.एच. २४, बी. आर. ८५४९ या क्रमांकाची कार ताब्यात घेतली. कारची झडती घेतली असता, त्यामध्ये प्रतिबंधित केलेला विमल नावाचा गुटखा व सुगंधित तंबाखूचे पोते आढळून आले. गुटखा व वाहन असा एकूण १० लाख ८४ हजार ३२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुटखा व सुगंधित तंबाखूची वाहतूक करणारा श्रीकांत व्यंकटराव नरके (वय ३७, रा. सारोळा रोड, श्रीनगर, लातूर) याच्याविरुध्द औसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास औसा पोलीस करीत आहेत.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार रियाज सौदागर, मनोज खोसे, साहेबराव हाके, राहुल कांबळे, नितीन कठारे यांनी ही सेवा बजावली.